# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० ७ माहे जुलै सन १८७८ इसवी. | अंक २७

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## वसूल.

| | रु.आ.पै. |
|---|---|
| रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम.ए. हे. मा. हाय स्कूल उमरावती | ६–८ |
| रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे | १–१२ |
| मे० बिलंदखा हबीबखा मक्तेदार | ९ |
| रा. रा. गणेशसिंग दलसिंग रजपूत | ६–८ |
| ,, ,, शिवलाल गुलाबचंद साहू | ६–८ |
| ,, ,, साहेबराव जानराव देशमुख | ६–८ |
| ,, ,, चिमणाजी पाटील पाटखेडकर | २–८ |
| ,, ,, देवराव आनंदराव देशमुख | २०–६–८ |
| ,, ,, लक्ष्मण शिवराव देशपांडे | ६–८ |

## जाहिरात.


COMEDY OF ERRORS.

### कामेडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्सपियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमच छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.


## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

तो वार्ता पसरे जगीं जन ह्मणे,
जी स्वर्गलोकांगना,
तो जयपूरपाल सुकृतें
साधी, असे ये मना ॥
संकोचा विसरोनि सत्वर जगत्-
शिंग प्रभू हर्षुनी,
प्रेषी भृत्य, अलंकृती सुवसनें
मेघापरी वर्षुनी ॥ १३० ॥

आर्या.

तें त्या वधूवरांच्या
इत्कुंडीं यौवनेंहि आधान ।
केलें होतें विरहा-
ग्नीचें पावावया समाधान ॥ १३१ ॥
धाव्याख्य मंत्र त्याला
पेटाया जाहली विवाहाची ॥
वार्ता, तो अनळ तिनें
बहु पेटुनि त्या वधूवरा जाची ॥१३२॥
इतुक्यांतचि सचिव जगत्-
शिंगाचे ते उदेपुरा जवळ
कन्यावरणासाठीं
देते झाले अनीकसहित तळ ॥१३३॥
तो भीमशिंगहि जगत्-
शिंगाच्या मागणीस मान्य करी
परि होय तें विफळ कीं
ईशकरीं सफलता न अन्य करीं १३४
सर दार स्वर्गाचें
करिती वाटे प्रतापि सैन्यींघे ॥
सरदार पेशव्याचे
शिंदा होळकर नाम ते दोघे १३५
राजपुतान्यामाजी
करिते झाले चहूंकडे दंगा
रजपूत लोक त्यांच्या
शकले नाहीं करावया भंगा १३६
ते दोघे हूणांशी
झगडत होते ह्मणोनि रजपूत
व्हावे सहाय अपुले
प्रेषिति यास्तव तयांकडे दूत १३७
याचि समयीं विवाहीं
कृष्णच्या जाहला प्रवृत्त पिता ॥
झाला दुरंत तो कीं
कोणी दैवा न आड ये कुपिता ॥१३८॥
भृत्य जगत्‌शिंगाचे
ते कृतकार्यत्व मानुनि निघाले ॥
जाया जयपूराप्रति
इतुक्यांतचि दुष्ट शकुन त्या झाले १३९
जो मारवाड देशीं
राजा तो मानसिंग कृष्णेतें ॥
मागे दूतमुखानें,
विषयसुखाच्या धरोनि तृष्णेतें ॥१४०॥
द्यावी कुमरी मजला
कीं हा मी जोतपूरचा राजा ॥
मागें बहुमानानें
आहे यालाच योग्य ही भाजा ॥१४१॥
जो या नृपासनावरि
होता पूर्वीं तयासही द्यावी
ऐसा निश्चय असतां
त्यातें मोडुनि अकीर्ति नच घ्यावी १४२
गादीच्या उद्देशें
कन्या देती नृपाल नृपतीतें ॥
त्या गादीवर आतां
आहे मी ह्मणुनि मागतो तीतें ॥१४३॥

श्लोक.

जरि न मजला देतां
अन्यास द्याल कुमारिका।
तरिहि तुमचा होतो
जाणा मनोरथ तो फिका ॥
हरिल तुमच्या राज्या
माझी चमू चतुरंगती ।
प्रिय यश जिचे योद्धे
प्रेमें रणीं बहु रंगती ॥ १४४ ॥
तो शिंदा धनकाम होउनि जगत्
शिंगास मागे धना
झाली त्या न मनोरथा सफलता,
शिंद्यास ती वेदना ॥
साहेना, ह्मणुनी हटास धरुनी
तो भीमशिंगा वदे
कन्येला वर मानशिंगचि बरा
वाटे म[illegible]- त्यास दे ॥ १४५ ॥

( पुढें चालू. )

## महामारीवर रामबाण औषध.

रा. रा. रामचंद्र भास्कर गोरे वैद्य सातारकर यांणीं केलेल्या गोळ्या.

### अनुपानाचा प्रकार.

१. प्रथमतः दोन गोळ्या सहा मासे आल्याचे रसांत किंवा सुंठ उगाळून त्याचे सहा मासे वलकांत उगाळून द्याव्या.

२. नंतर तासा तासाने एक एक गोळी तीन मासे आल्याचे रसांत अगर सुंठ उगाळून तींत वांती व ढाळ बंद होईपर्यंत द्यावी.

३. गोळ्या दिल्यावर पाणी मागितल्यास थंड द्यावें, व तें देण्यापूर्वीं तांदुळाची कणेरी द्यावी. ज्या ज्या वेळेस आजारी मनुष्य पाणी मागेल त्या त्या वेळेस सदर्हू प्रमाणें कणेरी देऊन पाणी द्यावें. व न मागितलें तरी कणेरी देण्याचा क्रम सुरू ठेवावा.

४. रोगी कणेरी खाण्यास फार मागेल तर न देतां थोडी थोडी अर्ध अर्ध अगर पाव पाव तासानें द्यावी.

५. वांती होत असल्यास मोहऱ्या वाटन त्यांत पाणी घालून त्याचा लेप एका कागदाचे तुकड्यावर देऊन तो तुकडा लेप दिलेल्या बाजू कडून बेंबीवर ठेवून द्यावा, व सोसेनासा झाला ह्मणजे काढावा हातापायास गोळे आले तर जेथें जेथें गोळे येतील तेथें तेथें सदरीं लिहिल्या प्रमाणें मोहऱ्यांचे लेप द्यावेत.

६. सदरील गोळ्या एका पासून तीन रेच होण्याच्या पूर्वीं दिल्यास गुण तावडतोब येतो.

७. फार वेळ झाला असल्यास रेच व वांति बंद होण्यास बराच वेळ लागतो, तरी धैर्य न सोडतां सदरीं लिहिल्याप्रमाणें क्रम सुरू ठेवावा; कारण अशा प्रकारच्या आजाऱ्यांसही गुण आले आहेत.

८. रेच कशापासूनही झाला असला तरी गोळी द्यावी त्यापासूनअपाय न होतां गुणावह होईल.

☞ ह्या गोळ्या वऱ्हाडसमाचार आफिसांत रुपयाला १६ विकत मिळतील.


वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ शुद्ध ८ शके १८००


## दासीपुत्र व त्याचा हक्क.

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन जातींत दासीपुत्रास वारसा नाहीं; परंतु शूद्र ज्ञातींत औरस पुत्र असून दासीपुत्रही असेल तर औरस पुत्राचे अंशाचा निमे अंश दासीपुत्रास मिळतो, हें बहुधा आमचे वाचकांस माहित असेलच. मात्र दासीपुत्र ह्मणजे कोणता याजविषयीं ह्या प्रांतांत बरीच गैरसमजूत आजपर्यंत असावी असें आह्मास वाटतें. याजकरितां नुकताच एक ठराव मे. बेल साहेब जुडिशियल कमिशनर यांनीं केला आहे त्याचे आधारें दासीपुत्राची व्याख्या आह्मी आपले वाचकांच्या व प्रांतांतील इतर लोकांच्या माहितीसाठीं देतों.

एकादि बटीक किंवा रांड ठेवून तिच्या पोटीं संतती झाल्यास ती दासीची संतती असें बहुधा लोक समजतात; परंतु असें नाहीं. ज्या स्त्रीचें मुळींच लग्न झालें नाहीं. व कोणा मनुष्यापाशीं फार दिवस राहून तिला त्या मनुष्यापासून संतती होईल तर ती, किंवा ज्या स्त्रीचा नवरा मेला आहे व वैधव्यांत ती कोणाजवळ वरप्रमाणें राहून तिला संतती होईल तरती, मात्र दासीची संतती ह्मणावयाची. एकादि स्त्री आपले लग्नाचे किंवा पाटाचे नवऱ्यास सोडून त्याचे जिवंतपणी व्यभिचार करून तिला एकाद्यापासून संतती झाल्यास किंवा नवऱ्यास सोडून दुसऱ्यापाशीं कायमची राहून तिला संतती झाल्यास त्या संततीस शास्त्राप्रमाणें दासीची संतती ह्मणतां येत नाहीं. व अशी संतती अंशास अधिकारी नाहीं.

हा शास्त्राचा नियम लक्षांत ठेवण्याजोगा आहे. उमरावती जिल्ह्यांतील एका श्रीमंत कुणब्याचे मिळकतीवर हक्क सांगणारे–एक दासीपुत्र, एक मुलगी, व एक दुसऱ्या मुलीचा मुलगा असे तिघे होते. उमरावती जिल्ह्यांत दासीपुत्रास अंश मिळाला परंतु अपिलांत [अपील नंबर ३० सन १८७८] मेहेरबान जुडिशियल कमिशनर साहेबांनीं शास्त्राच्या मुद्याचा फार बारकाव्यानें विचार करून वरील भेद काढिला. व त्या दाव्यांतील दासीपुत्र ह्मण

विगाऱ्या मुलाची आई आपला लग्नाचा नवरा जिवंत असतां त्याची सोडचिठी घेतल्यावाचून ह्या श्रीमंत गृहस्थापाशीं कांहीं दिवस राहिली होती व त्या योगानें तिजला मुलगा झाला आहे, यास्तव या मुलास शास्त्राप्रमाणें दासीपुत्र ह्मणतां येत नाहीं, व तो अंशाचा अधिकारी नाहीं, असा ठराव केला.

हा ठराव आह्मास फार मानवला. एक तर शास्त्राचा अर्थ झाला ह्मणून, दुसरें, अनीतीचे मार्ग दिवसेंदिवस वाढत आहेत त्यांचा अंशतः मोड होण्यास हें एक प्रकारचें कारण झालें ह्मणून. हा ठराव लोकांनीं लक्षांत आणून आपलें वर्तन ठेवावें व शास्त्राचे भलते अर्थ करून द्रव्याची नासाडी करूं नये असें आह्मी ह्मणतों.

---

## हिंदुस्थानचा व्यापार.

ज्या देशाचें परदेशासीं जितकें दळणवळण अधिक तितकी त्या देशाची थोरवी मोठी; व देशाचे थोरवीला व्यापार सरळपणानें विस्तृत होणें अधिक चांगलें आहे. तो व्यापार अलीकडे इंग्लिश राज्य झाल्यापासून आमचे देशचा वाढत चालला आहे हें सुचिन्ह होय यांत संशय, नाहीं. तरी इंग्लिश सरकारचें राज्य इकडे झालेलें असल्यामुळें केवळ त्यांच्या एका देशाशीच आमचे देशाचा व्यापार चालून राहिला आहे असें नाहीं, ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. आमचा व्यापार ग्रेटब्रिटनासी आहे, फ्रान्स देशासी आहे, रशियासी आहे, चिनासी आहे, व दुसरे कित्येक देशासी आहे. तथापि ग्रेटब्रिटनासी सर्वांहून अधिक आहे. मार्च अखेर नुकतेच संपलेले सालांतील व्यापाराच्या रकमेचे अंक आह्मास समजले आहेत ते असेः—

हिंदुस्थाचा माल गुदस्त सालीं परदेशांत एकंदर ६३,१३,३९,०१९ रुपयांचा गेला. त्या पैकीं ग्रेटब्रिटनांत २९,३०,११,३९४ रुपयांचा चिनांत १०,१६,९४,६६६ रुपयांचा, फ्रान्स देशांत ५,९६,३०,५७४ रुपयांचा गेला. आतां रशिया कडील आमच्या देशाच्या व्यापाराचें चालू दळणवळण अलीकडे नें बिघडत चाललें तें पाहून मोठें आश्चर्य वाटतें. सन १८७५।७६ सालीं रशिया देशांत इकडील माल सारा पांच लक्षांचा गेला. तिगस्त सालीं आठ लक्षांचा व गुदस्त सालीं पुन्हा पांच लक्षावर मजल आली! आतां रशियांतून हिंदुस्थानांत या तीन वर्षांत जो माल आला त्याच्या संख्येकडे पाहून तर विक्षलण आश्चर्य वाटतें. सन १८७५।७६ सालीं रशियांतून २९,६४० रुपांयचा माल हिंदुस्थानांत आला व तिगस्त सालीं आणि गुदस्त सालीं ० रुपयांचा माल आला.

याचें कारण रशियाची तुर्कस्थानासी लढाई हें असावें. व यावरून लढाईचे योगानें देशांतील व्यापाराला कसा धक्का बसतो हें वाचकांच्या लक्षांत येईल. व याच धोरणानें आह्मी विशेष संतोष मानितों कीं, आमचे इंग्रज सरकार व रशियन सरकार यांजमध्यें युद्ध होण्याचा प्रसंग आला होता तो टळला. हें राज्य उद्योगाचें, कलाकुशलतेचें व शांतीचें आहे. सबब आमचे सर्व लोकांनीं याच कामीं भरीं भरून देशाचा व्यापार वाढवावा. व तो अंगें करावा. आमचे नेटिव लोकांच्या व्यापारी कंपन्या परदेशाशी व्यापार करण्याकरितां उभारल्या गेल्या पाहिजेत, व त्या जितक्या अधिक होतील तितकें आमचे देशचे व्यापारास व संपत्तीस अधिक फल होणार आहे. ईश्वराचे कृपेनें आमचे देशांत कापूस, तेलबीजें लाकुड व धान्य, विपुल उत्पन्न होतें व विलायती यंत्रावर कापड व सूतही इकडे निघूं लागलें आहे. तेव्हां तो माल पर देशांत खपवून तिकडील माल या देशांत जो अगत्याचा आहे तो आणुन देशाचें दळणवळण वाढवितील अशा कंपन्या उत्पन्न झाल्या पाहिजेत व त्या होण्यास भांडवल पाहिजे, आणि तें आमचे देशांतील राजे, संस्थानीक, जाहागीरदार, व साहू सावकार यानीं एकमेळानें व काळजीनें जमविलें पाहिजे व तें होण्याकरितां आमचे विद्वान व देशहितेच्छु लोक यांनीं निरालस्यपणें झटलें पाहिजे, तरच हें कार्य साधल्यास साधणार आहे. कृपाळु परमेश्वर आमचीं इच्छा सफळ करो.

---

**दुष्काळ कमिशन**— हिंदुस्थान सरकारानें दुष्काळाची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमिलें आहे- तें कोणत्या प्रकारची चौकशी करणार त्याचें बीज बाहेर पडलें आहे. त्यांनीं कांहीं प्रश्न काढिले आहेत. त्यांचीं उत्तरें त्या त्या भागांतील माहितगार सरकारी कामदाराकडून मिळण्याकरितां इलाख्याच्या सरकारा मार्फत ते प्रश्न त्यांजकडे रवाना होणार आहेत. सदर्हू प्रश्नांचे ४ भाग आहेत. पहिल्या भागांत लोकांची व देशाची स्थिति याजविषयीं प्रश्न आहेत· दुसऱ्या भागांत, आरंभी पाऊस पडण्याचें चिन्ह दिसलें नाहीं त्या बरोबर लोकांस कोणते सहाय मिळालें याविषयीं प्रश्न आहेत. तिसऱ्या भागांत दुष्काळानें गांजलेल्या विपत्तिग्रस्तांस मजुरीचें व धर्मार्थ अन्न देण्याचें वगैरे कस कसें सहाय मिळालें याजविषयीं विचारलें आहे. व चवथ्या भागांत, पुढें दुष्काळाची दहशत राहूं नये याजविषयीं काय तजविजी योजिल्या आहेत व विशेषें पाट बंधाऱ्याचीं कामें कोठें कोठें काय काय सुरू करण्याची तजवीज केली त्याविषयीं प्रश्न आहेत.

---

**शूद्रकमलाकर**— या नावाच्या संस्कृत ग्रंथाचें मूळासहीत भाषांतर छापण्याचें काम मुंबईस निर्णय सागर छापखान्याचे मालक रा. रा. जावजी दादाजी यांनीं शास्त्री लोकांच्या सहाय्यानें सुरू केलें आहे. व त्याच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या आहेत. आमच्या कडेही त्यांच्या कांहीं प्रती व ग्रंथाचा मासला आला आहे पुस्तक विकत घेण्याच्या इच्छेनें कोणास पहावयाचा असल्यास तो दाखविण्यात येईल. व बाहेर गावाहून अर्धा आणा आला असतां टपालांतून पाठविला जाईल. या पुस्तकाची किंमत अगाऊ आगष्ट आखेर देणारास दोन रुपये आहे. नोवेंबरांत पुस्तक छापून तयार होईल. त्याचे शेवटीं ग्राहकांची नावनिशी छापली जाईल. जावजीदादाजी यानीं मागें धर्मसिंधू ग्रथाचें असेंच भाषांतर छापविलें आहे तें बहुतांचे पहाण्यांत असेल. शूद्र लोकांनीं याचा संग्रह अवश्य करावा.

---

**प्रायश्चित्त**— कैलासवासी विष्णु शास्त्री पंडित पुनर्विवाहाभिमानी यांचे अल्पवयी चिरंजीव रा. रा. आत्माराम बावा हे हल्लीं पुण्यास आहेत. त्यांचा श्री. शंकराचार्यांच्या ठरावाप्रमाणें ब्राह्मण लोकांशीं अन्नव्यवहार बंद होता, त्याजबद्दल त्यांस व त्यांचे आप्तांस बरें न वाटून त्यांनीं सुमार १०० रुपये खर्च केला व गेल्या आठवड्यांत ते प्रायश्चित घेऊन शुद्ध झाले.

कै. विष्णु शास्त्री यांनीं आत्माराम पंडित यांची मुंज ते पुनर्विवाह पक्षांत असतांही केवढी टोलेजंग केली, व तिच्या कुंकुमपत्रिका कशा अर्ध्या हिंदुस्थानभर फडकल्या हें आमचे वाचकांतून कित्येकांस माहित असेल. त्यांचे लग्नही त्यांच्या सुदैवानें शास्त्री बावा जिवंत असते तर त्याच पक्षांत चांगलें गाजलें असतें, पण होणाऱ्या गोष्टीस उपाय नाहीं. आत्माराम पंडित यांनीं प्रायश्चित्त घेतलें याजबद्दल त्यांस दोष देणें रास्त नाहीं. कारण ज्यांचीं ध्रुवासारखीं अढळ मतें असे पुनर्विवाह पक्षाचे सप्त ऋषीप्रमाणें जे सप्त पंडित आरंभीं या कार्यास सज्ज झालेले त्यांपैकीं क्रमाक्रमानें बरेच गळाले. व पुढें शास्त्री बावाही निवर्तल्यामुळें तो पक्ष अत्यंत दुर्बळ झाला. तेव्हां अशा प्रसंगीं या लेकरानें आपले सर्व आप्त व इष्ट मित्र यांच्यांत मिसळण्याशिवाय दुसरें काय करावयाचें अवश्य होतें बरें ?

---

**प्रेसआक्ट** — हिंदुस्थानांत नेटिव वर्तमानपत्रांविषयीं जो नवीन आक्ट झाला आहे त्याजबद्दल विलायतेंत बरीच चर्चा सुरूं झाली आहे. पुण्याहून एक व कलकत्याहून एक असे दोन अर्ज या आक्टाविरुद्ध झालेले पार्लमेंट सभेपुढें मि. ग्ल्याडस्टन साहेब माजी मुख्य प्रधान ठेवणार आहेत व त्या संबंधानें भाषणही करणार आहेत. हिंदुस्थान सरकारचा व स्टेट सेक्रेटरीचा या संबंधी जो पत्रव्यवहार झाला त्याचाही कांहीं भाग प्रसिद्ध झाला आहे. व आणखी असें कळतें कीं, हा आक्ट झाल्यानंतर मे महिन्याचे ३१वे तारखेस स्टेट सेक्रेटरीनीं हिंदुस्थान सरकारास हुकूम पाठविला आहे कीं, वर्तमानपत्रकर्त्यांनीं प्रुफशीट पहाण्यास सरकारी कामदारांकडे देत जावें असें जें एक कलम सदर्हू आक्टांत आहे तें रद्द करावें. तसेंच सरकारी अधिकाऱ्यांच्या कामाच्या संबंधानें बरी वाईट टीका करण्याचा पत्रकर्त्यांचा अधिकार या आक्टानें काढून घेतल्यासारखें झालें आहे तो भाग गाळाऊ करावा. व रास्त आणि सभ्य रीतीनें टीका करण्याचा अधिकार त्यांच्याकडे ठेवावा असे विचार विलायतेंत निघाले असल्याचीं तारायंत्रांतून वर्तमानें आलीं आहेत. तेव्हां खरोखर या आक्टांत कांहीं फेरफार होईल असें वाटतें. पार्लमेन्ट सभेत ५वे तारखेस हा विषय निघणार होता तो १६वे तारखेपर्यंत तकूब राहिला आहे असें परवाचे दिवशींच्या तारेवरून कळतें.

---

**कानग्रेस**— तुर्कस्थानची व रशियाची लढाई झाली, नंतर इंग्लंडची वरशियाची लढाई सुरू होईल असा सुमार दिसला तेव्हां सर्व राजांच्या प्रधान मंडळींचें जर्मनी देशच्या राजधानी शहरांत कानग्रेस भरावें असें ठरलें. व त्याप्रमाणें सभा ह्मणजे कानग्रेस भरून त्यांत तीन आठवडे झाले वाटाघाटी चालल्या आहेत. इंग्लंड, आस्त्रिया, रशिया, टर्की वगैरेचे प्रधान जमले आहेत. व तुर्कस्थानांतील बल्गेरिया, रोमेलिया, बोसनिया, हरजीगोविना, सर्व्हिया वगैरे प्रांताची कशी व्यवस्था करावी याचा विचार चालू आहे. बल्गेरिया हें स्वतंत्र संस्थान करून तेथें एक प्रिन्स नेमावा, असें घाटत आहे. रोम्यालिया एथें तुर्कस्थानानें ख्रिस्ती गव्हर्नर नेमावा व तो सर्व राष्ट्रांनीं मान्य करावा असें ठरत आहे. आस्त्रियाला दोन प्रांत मिळावे असा इरादा आहे, इंग्लंड व रशिया यांची एक वाक्यता या सभेच्या पूर्वींच झालेली आहे. सर्व प्रकार गोड गोड दिसत आहे. व सर्वांस सर्व गोष्टी मानवतील असा रंग आहे. आतां लढाईचें कारण कांहीं रहाणार नाहीं व रशियाची फौज तुर्कस्थानांतून माघारी जाऊन सर्व स्वस्थता होईल असा भरवसा वाटत आहे. कानग्रसचें काम लवकरच पुरें होऊन तीन आठवडे बंद रहाणार आहे. नंतर मग आणखी एक वेळ भरून तहनामे व ठरावबंद यांजवर सह्या होणार आहेत.

---

**इराणचा शहा**— युरोप खंडांत हा राजा देशपर्यटणास गेला आहे हें आमचे वाचकांस माहीत असेल. तो प्रथम रशिया देशांत गेला. त्याचा तेथें उत्तम आदर सन्मान झाला. व त्या साठीं रशियाच्या बादशहानें चाळीस हजार रुपये खर्च केला. व शहा मास्को शहरीं असतां बादशहानें त्यास आपली सैन्याची गाडी नमावयास पाठविली होती. शहानें खुश होऊन रशियाच्या दोघा सरदारास मोठ्या सन्माननीय अशा पदव्या दिल्या.

---

## पुराण ग्रंथ शिमग्याच्या सणासारखे नीच नाहींत.

( Communicated. )

आमचे प्रसिद्धविद्वान्, शोधक व वक्ते राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख नाशिकचे जाइंट जडज यांणीं नुकतेंच 'ग्रंथ' या विषयावर एक व्याख्यान दिलें त्यात पुराणग्रंथाची साम्यता सणांतील शिमग्यासी केली आहे देशमुख हे मोठे माहितगार व शोधक आणि विद्वान आहेत हें जगप्रसिद्धच आहे. तेव्हां त्यांचे का-

टिक्रमसुद्धांतसेच विलक्षण असले पाहिजेत हें उघड आहे. आतां त्यांच्या व्याख्यानांतून एक एक शब्द किंवा वाक्य घेऊन त्यांतील गुणदोष निवडण्याचा आज आमचा हेतु नाहीं. व तें काम कांहींअंशीं मुंबईच्या सुबोधपत्रिकेनें बरेंच केलें आहे. व पत्रिकेचे विचार आह्मास बऱ्याच अंशीं मानवतात. आमचा हेतु आज इतकाच आहे कीं आमचे राव बहादुरांचा कोटिक्रम युक्ती व खरेपणा यांस किती सोडून गेला आहे हें थोडक्यात दाखवावें.

पुराणांनीं आह्मा लोकांस निर्लज्ज केलें ह्मणजे आमच्या लोकांची धर्मावरील व देवावरील श्रध्धा भ्रष्ट केली अशा मतलबाचें राव बहादुरांचें मत आहे, पण आह्मास ह्या ठिकाणीं शंका आहे. आमच्या धर्मावरील किंवा देवावरील आमच्या लोकांची श्रध्धा नाहींशी होण्यास कारण पुराणें झालीं किंवा परधर्मावलंबन व पराच्चारग्रहण हीं झालीं हें पाहिलें पाहिजे. आमच्या मतें परधर्म व पराचारावलंबन हें कारण झालें आहे. कां तर ज्यांचें पुराणश्रवण चालू आहे त्यांचे प्रातःस्नान, मूर्तिपूजन, देवदर्शन, हरिकीर्तन व धर्मपद्धतीप्रमाणें अन्नाहार आजपर्यंत कायम आहेत त्यांची पुराणाच्या योगानें धर्माविषयीं ची किंवा ईश्वराविषयींची पूज्यबुद्धी तिळमात्रही कमी झाली नाहीं व ज्यांनीं पुराणग्रंथ तुछ मानले त्यांचे मात्र प्रातःस्नानाऐवजी चहा मुर्तीपूजे ऐवजी बाजारांतील एकाद्या मोठ्या दिवाणखान्यांत स्टाकिंग, बूट, पाटलोन घालून डोळे लावून देवाची गाणी ह्मणणें, देवदर्शनाऐवजी हवा खाणें, पुराणश्रवणाऐवजी वर्तमानपत्रें व व्याख्यानें व हरिकीर्तनाऐवजी धर्मनिंदा आणि आपल्या नियक्रमाच्या अन्नाहाराऐवजी स्पिरिट सोडावाटर इत्यादि उत्तम उत्तम परकी पदार्थ हे त्यांच्या अंगवळणीं पडले आहेत, त्यांचीच काय ती धर्मावरील श्रध्दाही नाहींसी झाली असें आह्मीं पाहतों. व यास रावबहादूर सुद्धां नाकबूल जाणार नाहींत.

पुराणांत कित्येक देवतांच्या दुर्गुणाचें वर्णन केलें आहे यामुळें तीं पुराणें खोटीं असें आमचे राव बहादूर ह्मणतात कीं काय, हें कळत नाहीं. जर तसें त्यांचें ह्मणणें असेल तर त्यांस आमचें इतकेंच विच्यारणें आहे कीं, अशी खोटीं पुराणें रचण्यांत त्यांचा हेतु आमचे राव बहादूर काय कल्पितात? कोणतेंही कृत्य मुद्दाम करणें झाल्यास त्यास हेतु पाहिजे. जर आमच्या पुराणकर्त्यांचा हेतु धर्मावरील व देवावरील श्रद्धा कमी व्हावी ह्मणोन खोट्या गोष्टी त्यांत घालावयाच्या असा असता, तर पुराणें वाचून किंवा ऐकून श्रद्धा कमी झालेले गृहस्थ बहुत सापडते. पण तसें बिलकूल आढळत नाहीं. ह्मणून आह्मास वाटते कीं, तें तसें नाहीं. पुराणकर्त्याचा हेतु ईश्वराचे ठायीं अधिक भक्ति उत्पन्न होऊन त्याची सर्वांनीं आराधना करावी. असा होता व त्याकरितांच पुराणें झालीं आहेत हें निर्विवाद आहे. व असें असतां त्यांत देवादिकांच्या वाईट वागणुकी कां आणिल्या? असें जर रा. बहा. ह्मणतात तर त्याचें उत्तर इतकेंच आहे कीं, हल्लींच्या कित्येक देशकल्याणेच्छु लोकां प्रमाणें ते दांभिक किंवा कपटी नवते. त्यांनीं कित्येक देवतांचे जसे दोष दाखविले तसे त्यांचे शतपट गुण वर्णिले आहेत आणि याजवरून उलटें असें अनुमान होतें कीं ते खरे इतिहासकार होते. केवळ पडद्या पलीकडील पदार्थां पैकीं चांगलें तितकें बाहेर आणणारे नव्हते व वास्तविक चरित्र तेंच उत्तम कीं, ज्यांत गुण व दोष असतील ते सर्वच येत असावे.

आतां हें खरें आहे कीं पुराणांत कित्येक अतिशयोक्ति आहेत. परंतु त्या केवळ आपल्याच धर्मपुस्तकांत आहेत असें नाहीं. आह्मास वाटतें सर्व धर्मांची रीत हीच आहे. व हें आमचे राव बहादुरांस माहित नसावें असें नाहीं. तेव्हां एकंदर ह्या ग्रंथांचा मुद्दा धर्मभ्रष्ट न व्हावा हा आहे. व तसेंच अनुभवासही येत आहे. असो. शिमग्याचे सणा इतक्या निंद्यतेस आमचे पुराणग्रंथ आजपावेतो कोणी आणिले नव्हते पण आमचे राव बहादुरानीं त्याकरितां कंबर बांधिली यावरून हे स्वदेशीय ग्रंथांस जें उत्तेजन देणार तें कोणत्या प्रकारचें होईल याजविषयीं बरेंच अनुमान करतां येतें. आमचें ह्मणणें असें आहे कीं, आपल्या धर्मपुस्तकांत जें आहे तें सर्व एकत्र करून त्याजवरून निरपेक्ष बुद्धीनें जें अनुमान निघावयाचें तें न काढितां केवळ देवतांची[हल्लीं मानतात ह्मणून]अप्रयोजक कृत्यें मात्र घेऊन जर एकंदर ग्रंथांविषयीं मत देणें आहे तर ह्यापासून देशाचा काडीमात्र फायदा न होतां उलटें पाखंड मत वृद्धिंगत होऊन लोकांचा पुराणांविषयीं व देवांविषयीं खोटा ग्रह होईल. तेव्हां असें करणें राव बहादुरासारख्यांस प्रशस्त नाहीं. हे विचार एकाद्या सामान्य पुरुषाच्या तोंडचे ऐकिले असते तर आह्मी त्यांकडे विशेष लक्ष पुरविलें नसतें. परंतु जे स्वदेशीय ग्रंथांस उत्तेजन देऊन देश चांगल्या स्थितींत आणावयास झटतात त्यांचे हे विचार आहेत ह्मणून आह्मांस फार वाईट वाटतें.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत दोन दिवस पर्जन्य चांगला पडला व एक दोन दिवस बुरबुर बरीच आली. हवा स्वच्छ व रमणीय झाली आहे.

जुडिशियल कमिशनर साहेब वाशिमास गेले होते ते परत आले.

कमिशनर साहेब चिखलदऱ्याहून उमरावतीस आले आहेत व ते लवकरच अकोल्यास येतील असा सुमार आहे.

सातारा जिल्ह्यांतील कोरेगावचे मामलेदार खान बहादुर सयद शमसुदीन साहेब यास वऱ्हाडांत मि० मोफत साहेब यांचे जागीं आफिसियेटिंग असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेट नेमिल्याविषयीं हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

इलिचपुरचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. परशराम जगन्नाथ यांस सहा महिने हक्क ठेवून वाशिमास क्लार्क आफ धि कोर्ट याचे जाग्यावर पाठविलें व तेथील क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. परशराम गणेश यांस इलिचपुरास नेमिलें. त्याप्रमाणें उभयता ही गृहस्थ आप आपले जागीं जाऊन दाखल झाले. गुरुवारीं उभयतांही अकोल्यास होते व शुक्रवारीं एथून पुढें गेले.

हैदराबादेकडे दोन च्यार पाऊस चांगले पडले असें वर्तमान आलें आहे. नागपुराकडेही ९।४ पऊत चांगले झाले. याचप्रमाणें वाशीम, बुलढाणें, उमरावती व अकोलें या च्यारी जिल्ह्यांत पाऊस चांगला पडून पेरण्याचीं कामें सुरू झालीं आहेत असें तिकडून पत्र आल्यावरून समजतें.

येथील मिडल क्लास स्कुलावरील हेड मास्तर रा. रा. पांडुरंग दामोदर दवणकर खासगी कामाकरितां ८ दिवसांचे रजेवर मुंबईकडे गेले होते. त्यानीं आपली रजा आणखी एक महिना वाढविली.

वऱ्हाडांतील विद्याखात्याकडील शाळा पत्रक नामें मासिक पुस्तक पुण्यास ज्ञान प्रकाशांत छापत होतें तें आगष्ट महिन्यापासून इंदुप्रकाशांत छापत जाईल.

मे० अबदुल हक्क साहेब पीरजादे कर्नाळकर आपले स्वतांचे विवाहाकरितां हैदराबादेस गेले आहेत.

मि. स्टिवनसन साहेब खामगावचे पोलिस इन्स्पेक्टर यांनीं तीन महिन्यांची रजा घेतली. त्यांचे जाग्यावर एथून मि. स्याविय ल साहेब जाणार आहेत.

एथील तुरुंगांतील १० वर्षांचे शिक्षेचा एक कैदी बगीच्यांत काम करीत असतां शिपायांच्या पहाऱ्यांतून पळाला.

उमरावती हायस्कुलांतील असिस्टंट मास्तरची ६० रुपयांची जागा रा. रा. लक्ष्मण कृष्ण शास्त्री चिपळुणकर यांस मिळाली व त्यांची ५० रुपयांची जागा रा. रा. महादेव शास्त्री माटे बरूडचे मास्तर यांस मिळाली.

यवतमाळ जिल्ह्यांत वण तालुक्यांत कायरह्मणून गाव आहे तेथें जूनचे दुसरे तारखेस दिवसां दोन प्रहरां गंगप्या सावकार याचे घरास आग लागून ती पेटत पेटत गावांतील एकंदर सुमार सवादोनशें घरें जळालीं. व लोकांचें मोठें नुकसान झालें. तरी गावाला पाणी बरेंच होतें ह्मणून बाकीचीं घरें वाचलीं. नाहीं तर सर्व गावाचा वैश्वदेव झाला असता व लोकांचे उन्हा पावसांत अति हाल झाले असते असें आह्मांस एक पत्र आल्यावरून समजतें.

पांढरकवड्याकडून आह्मांस एक पत्र आलें आहे त्यांत तेथें हल्लीं आले असलेले पोस्ट मास्तर रा. रा. रंगनाथ महादेव यांचे हुशारीची, चापल्याची व कुलीनतेची तारीफ करून त्यांस तेथें कायम करावें असें लिहिलें आहे.

जळगावाहून पत्र आल्यावरून समजतें कीं, तेथील तहशिलदार मि० किशोरखा यांनीं खेडें एथील शाळेंत जाऊन परीक्षा घेतली. व शाळेला बिछाईत, घड्याळ, घंटा वगैरे असावी ह्मणून सुमार २८॥ रुपये वर्गणी जमविली. हे तहशिलदार जळगावच्या मोडकळीस आलेल्या लायब्ररीलाही पुन्हा तजेला आणितील अशी पत्र पाठविणारा उमेद बाळगतो.

मूर्तिजापुराहून गेल्या आठवड्याचे अखेरीस पत्र आलें त्यावरून समजतें कीं, तिकडे पाऊस बरा पडला, व कारंजास त्यापेक्षां चांगला पडला. व हवेचा उपद्रव गेल्या आठवड्यांत तिकडे सुरूं झाला आहे. दिग्रसहून एक गाडीवाला मुक्कामास स्टेशनावर आला. त्यापासून उपद्रवाची सुरुवात झाली. डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर कांहीं कामासाठीं त्या तालुक्यांत फिरावयास येऊन परत गेले. बंद असलेली मास्तर लोकांची सभा पुन्हा लवकर चालू होणार आहे.

तारीख ३ पर्यंतची पावसाविषयींची खबर खामगाव—या आठवड्यांत २ इंच ३२ दोकडे पाऊस पडला. शिगाव—२ इंच २७ दोकडे पडला. मूर्तिजापुर—३ इंच ९९ दोकडे पडला. उमरावती—४ इंच ११ दोकडे पडला. वर्धा—२ इंच ९७ दोकडे पडला. हैदराबाद ६ इंच ८दोकडे पाऊस पडला.

प्रेसआक्ट वऱ्हाडाला लागू केला. वर्तमानपत्रकर्त्यांनीं सावधगिरीनें व काळजीनें आपलीं कामें चालवावीं ह्मणून रेसिडेंट साहेबांकडून त्यांस सूचनापत्रें आलीं आहेत.

आह्मांस लिहिण्यास वाईट वाटतें कीं, अकोल्यास महामारीच्या उपद्रवाची सुरवात झाली आहे.

## वर्तमानसार.

स्पेनदेशची राणी मरण पावली.

माल्ट्याकडे गेलेले हिंदुस्थानचे फौजेची ड्यूक आफ केंब्रिज यांनीं कवाइत मेतलीबतिची उत्तम तयारी पाहून ते संतोष पावले. त्यानीं महाराणी साहेबास हें आनंदाचें वर्तमान अगत्य कळवूं असेंही ह्मटलें.

हिंदुस्थानांतील मिठावरील जकात काढून टाकावी व ते गोर गरीबांनां अगदीं स्वस्त दरानें मिळेसें करावें अशी विलायतेंत वाटाघाट चालू आहे.

इंग्लंड व रशिया यांचा गुप्त तह झालेला वर्तमान पत्रांतून बाहेर पडला ती बातमी फारेन आफिसच्या क्लार्कानें दिली असावी ह्मणून त्यावर फौजदारी मुकदमा करण्याविषयीं ठराव झाला.

विलायतेहून हिंदुस्थानापावेतो आगगाडी नेली असतां फायदा आहे अशा बद्दल सभांतून वगैरे पुन्हा वाटाघाट सुरू झाली आहे. एक गृहस्थ ह्मणतात कीं, त्रिपोलीहून इराणी आखाताकडून कराचीवर रेलवे आणावी. लंडन टाइम्स कर्त्याला हा रस्ता फायदेशीर होईल. असें वाटत नाहीं. त्यांनीं दुसरा एक मार्ग सूचविला आहे.

खानदेशांत जळगावास जी सुताची गिरणी व कापडाची गिरणी जळाली तिचा विमा उतरला होता सबब विमेवाल्या कंपनीकडून गिरणीच्या मालकास रुपये २,७०,००० मिळाले व त्यांनीं आतां नवीं यंत्रें मागविलीं आहेत तीं येऊन दिपवाळीचे सुमारास पुन्हा काम सुरू होईल.

बडोदा रेल्वे कंपनीला फसविल्याबद्दल चौघा पार्शी गृहस्थांवर मुंबईस एक फौजदारी मुकद्दमा चालला आहे. त्या कंपनीनें मुंबईहून सुरतेपावेतों व मधील स्टेशनांकरितां एक महिन्याच्या मुदतीचीं रिटर्न टिकिटें काढलेलीं आहेत. तीं टिकिटें घेऊन महिन्याच्या आंत जे लोक परत येत त्यांचीं टिकिटें हे गृहस्थ परत घेऊन पुन्हा दुसऱ्यानें उपयोगास येण्याकरितां गुप्त रीतीनें त्या त्या ठिकाणीं पाठवून लोकांस विकित. त्यां पार्शी गृहस्थांपैकीं एक मुंबईस टिकिटकलेक्टर असून एक क्लार्क आहे. यांचा हा धंदा बरेच दिवस चालत असलेला रेल्वे पोलिसानें पकडला आहे.

पुण्याजवळ देहू एथें विठोबाचें देवालय आहे त्यावर वीज पडून शिखराचें बरें च नुकसान झालें.

मि. डुई साहेब जी. आय. पी. रेल्वेकडील माजी गुड्स एजंट कैदेंत होते व माजिस्त्रेट त्यांस जामीनावर सोडीत नव्हते त्याबद्दल हाय कोर्टास अर्ज झाल्यावरून त्यांनीं त्यांस खुले सोडण्याचा हुकूम केला. जामीन २ हजाराचा व मुचलका २० हजारांचा ठरविला त्याप्रमाणें [illegible] डुई साहेब [illegible]केळे [illegible] होते. पण सेशनांत यांवरील एका मुकद्दम्याची चौकशी होऊन जुरीनें त्यास निरपराधी ह्मणून सोडून दिलें.

युवराज प्रिन्स आफ वेल्स यांनीं चक्रवर्तिनी साहेबांच्या वतीनें तिसरे तारखेस विलायतेस छोटा दरबार भरविला होता त्या वेळीं कित्येक युरोपियन लोक कुचबिहारचे राजे व पांच पार्शी गृहस्थ यांच्या भेटी झाल्या.

मि. कैखुशरू काब्राजी, रास्तगुफतारचे एडिटर यांस मुंबई सरकारानें अ. प्रेस कमिशनर नेमल्याचें मुंबई ग्याझेटांत लिहिलें आहे.

अमेरिकेंत युनैटेड स्टेट्समध्यें दरसाल १९,९७,९०,००,००० रुपयांची पिण्याची दारू खपते. हें उत्पन्न सरकारच्या परवानगीनें जीं दुकानें घातलीं आहेत त्यांतील झालें. शिवाय चोरा मारीनें खप होतो तो निराळाच.

गेल्या मार्च महिन्याचे अखेरीस हिंदुस्थान सरकारास ५,९६,६७,७०,३३० रुपये कर्ज होतें.

युनैटेड स्टेट्समध्यें बफेलो ह्मणून गांव आहे. या गावांतील एका गृहस्थानें समुद्रावर चालणारी गाडी तयार केली आहे. या गाडींत चार माणसांस बसतां येते. गाडी दर तासास सहा मैल चालते ह्मणून समजतें. ने. ओ.

## बुकविक्रीची जाहिरात.

आमचे छापखान्यांत खालीं लिहिलेलीं बुकें विक्रीस आहेत तीं रोख किमतीनें दिलीं जातील.

| बुकाचें नाव | किमत. |
|---|---|
| मुंबई इलाख्यांतील मुलकी स्क्युलरें | ४ |
| क्रिमिनल प्रोसिजर टिपांसहीत | ४ |
| पोलिसाचे रूळ.... .... .... .... .... | ०२ |
| वसंतमाला .... .................. | ०१० |
| रुक्मिणहिरण नाटक .. .... .... | १०४ |
| गोपीचंद-नाटक हिंदुस्थानी.... .... | ०१० |
| विराटपर्व नाटक........ .... .... | ०१० |
| हरिश्चंद्रसत्वदर्शन नाटक....... .... | ०१० |
| सुहास्यवदना:......................... | ०८ |
| बालीवध नाटक ....... .... .... .... | ०५ |
| मयूकृत मंत्ररामायण—.... ...... | १०४ |
| सर्वसंग्रह वेगवेगळ्या कवींचीं आख्यानें भाग दुसरा | ....०१२ |
| सर्व संग्रह वामन पंडित कृत भाग १ ला | ....०१० |
| ,, ,,भाग २ रा .. ............. | ०१० |
| चतुःश्लोकी भागवत ............ .... | ०६ |
| नलाख्यान मोरोपंती आर्या.............. | ०३ |
| सिंव्हासनबत्तिशी हिंदुस्थानी ........ | ०१२ |
| प्रायश्चित्तेंदुशेखर .................... | ०१० |
| रत्नमाला ............................ | ०५ |
| वेताळपंचविसी........................ | ०४ |
| ध्रुवाख्यान ....................... .... | ००६ |
| हिंदुस्थानच्या स्थितीवर निबंध........ | ०१ |
| चक्रव्यूह ....................... ... | ०१०६ |
| व्यंकटेशस्तोत्र........................ | ०१ |
| शिवसहस्त्रनामावली...................... | ०२ |
| विष्णुसहस्त्रनामावली .............. .... | ०२ |
| गायनप्रकाश ........................ | ०३ |
| रामनवमीकथा.......................... | ०१ |
| भूपाळ्या .............................. | ०१ |
| हरिपाठ................................ | ००९ |
| हावर्ड कृत इं० तिसरे बुकाचें मराठी भाषांतर | ....०१२ |
| धातुरूपावली ...................... .. | ०३ |
| बालकाकारितां पहिलें पुस्तक........ | ०१ |
| अंकलिपी.................................. | ००९ |
| व्यवहारोपयोगी तारतम्य ........ | ०३ |
| बालज्ञान ........................ | ०१०६ |
| हावर्ड कृत इं. १ले बुकाचे मराठी भाषांतर.................... | ०१०६ |
| प्राकृत आरत्या...... — ............ | ०१ |
| स्कूलडायलाग........................ | ०१ |
| काव्यमाधुर्य.............................. | ६ |
| सौभाग्यरत्न.... .... ................ | ०२ |
| नादारीचे नियम ...... ............ | ०८ |
| कामेडी आफ एर्र्स .............. | ०६ |
| वैद्यप्रकाश .... ........ .... ... | २०८ |

## नोटिसा

रा. रा. लालचंद नवरंगराय दुकान छावणी इंगोली यांस नोटिस देणार श्रीराम सालग्राम साहू दुकान खामगाव व हिवाटदार रुखबदास सवाईराम याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमची रकम तुह्माकडे घेणें रुपये ९८३ नऊशें त्र्यांशी मित्ती कार्तिक शुद्ध १ संवत् १९३४ पावेतों शिवाय व्याज असे मिळून ही रकम नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मुद्दल व व्याज आणि नोटिशीचा खर्च असे पाठवून देणें. तसें न केल्यास शिरस्तेप्रमाणें फिर्याद करून सदर्हू रकम व कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्च तुह्माजवळून घेऊं. कळावें. तारीख ३० माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) श्रीराम सालग्राम साहू
दुकान खामगाव.
दस्तुर रुखबदास सवाईराम

### नोटिस.

तुकाराम वल्लद मकरम जवंजाळ मौजे कान्हेरी तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं माझे खसगत नंतरांत खुशीनें तुला एक जोडीचा हिस्सा दिला असून हल्लीं तूं मजवर जबरी करूं पहातोस. तूं मुलकी दिवाणींत फिर्याद करून आपला हक्क शाबीद झाल्या नंतर आपली जोडी शेतांत आणावी इतक्यावर जबरदस्ती. कराल तर तुह्मावर फौजदारींत फिर्याद केली जाईल कळावे. तारीख २८ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) लक्ष्मण वल्लद हरी
जवंजाळ मौजे मजकूर
निशाणी हातची रेघ.

### नोटिस.

सुरजमल तिलोकचंद वहिवटदार मोतीलाल पुगल्या दुकान नागपुर यास हिरालाल मथुरादास दुकान पेठ तेल्हारें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं दर्याबाई राणी, यशवंतराव गुजर व मइसदास भोलासिंग नागपुरकर याजकडून आमची रकम तुमचे मार्फतची येणें होती ती रकम सदर्हू तिन्हीं इसमांकडून तुमचे एथें पटली असून आह्मास पाठविली नाहीं ती सदर्हू रकम व्याजासुद्धां आज तारखेपासून एक महिन्यांत आणून द्यावी. नाहीं पेक्षां योग्य कोर्टांत फिर्याद करून या नोटिसीचे खर्चासुद्धां सर्व रकम व्याजासमेत तुमचेकडून घेतली जाईल. कळावें, तारीख २७ जून सन १८७८ इसवी.

( सही ) हिरालाल मथुरादास
दस्तुर खुद.

### नोटिस.

मे० ट्राफिक म्यानेजर जी. आय. पी. रेल्वे मुक्काम मुंबई यांस गोवर्धनदास भजनलाल दुकान शिगाव जिल्हा अकोलें प्रांत वऱ्हाड याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, हिरालाल मथुरादास तेल्हारेकर याचा दाळीचा माल पोतीं १८ मी माझे नावानें नागपुरचे रेल्वे स्टेशनावर चढविलीं असोन याजबद्दलचा पास मजपाशीं आहे. त्या नंतर सदर्हू १८ पोत्यांचा महसूल शिगावचे स्टेशन मास्तर यांणीं मजपासून घेतला. परंतु माल मजला अद्याप पावेतों मिळाला नाहीं. सबब शिगाव स्टेशन मास्तर यांजलाही पत्रानें कळविलें असून आपणाकडेही रजिस्टर चिठी पाठविली होती. परंतु आजपर्यंत कांहीं जबाब मिळाला नाहीं. व मालही मिळत नाहीं. यांजकरितां ह्या नोटिसीनें तुह्माला कळविण्यांत येतें कीं, सदर्हू माल १८ पोतीं दाळीचीं किंवा त्याची किंमत २२५ दोनशें पंचवीस रुपये आजपासून आठ दिवसांचे आंत मिळावे. नाहींपेक्षां योग्य कोर्टांत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुध्धां तुमचेपासून घेतले जातील. कळावें. ता २६ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) गोवर्धनदास भजनलाल
मारवाडी द० खु०

### नोसिट.

गणू वल्लद उकर्डा पांडव जात तेली रहाणार मौजे दानापुर तालुके अकोट यास सोनी मर्द गणू पांडव हल्लीं वस्ती मौजे वाडी अदमपुर तालुके अकोट इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास सुमार १२ वर्षें झालीं पण या मुदतींत तूं मला घरीं नेऊन चांगले प्रकारें वागविलें नाहीं व सदैव खटखट चालू होतीच. त्यांत अलीकडे तीन वर्षांत तर मी सतत आपले आईबापांचे घरीं आहे. तूं मला नेलें नाहीं-व समाचारही घेतला नाहीं. गेले तीन महिने तर तूं दुर्वर्तनाचे योगानें कैदेंत होतास आतां असें मी किती दिवस आईबापाचे घरीं काढवेत ह्मणून मुद्दाम ही नोटिस दिली आहे, तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत मला वस्त्रप्रावर्णाबद्दल व अन्नखर्चाबद्दल दरसाल ५० रुपये प्रमाणें १५० रुपये खर्च झाला आहे ते आणून द्यावे व मला घेऊन जावें. अगर हें होत नसल्यास मला फारकत द्यावी. या दिलेल्या मुदतीचे आंत जर तूं कांहींच केलें नाहींस तर योग्य कोर्टांत फिर्याद करून तुझा लग्नाचा हक्क रद्द करण्याची तजवीज करीन. या नोटिशीचा खर्च तुजपासून भरून घेईन कळावें. तारीख २८ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) सोनी मर्द गणू जात तेली
इचे हातची निशाणी बांगडी.

### नोटिस.

रा. रा. काळुराम छेटुराम मारवाडी दुकान पिंप्री परगणें शिरपुर तालुके व जिल्हे वाशीम यास ठाकूरदास खेमराज मारवाडी दुकान मौजे आलेगाव तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचे गहू खंडी १ एक गत वर्षीं विकत घेतलेले येणें आहेत व त्याचे रुपये तुह्मास पोंचले आहेत. ते गहू तुह्मी वेळवार न दिल्यामुळें आमचा भाव निघून गेला करितां त्याची किंमत १८० रुपये व त्याचें व्याज दरमहा एक रुपया शेकडा प्रमाणें १८ रुपये एकूण १९८ एकशें अठ्याणव रुपये ही नोटिस पावल्यापासून १० दिवसांचे आंत आणून द्यावे. न दिल्यास मुदत संपतांच दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासह रुपये भरून घेऊं. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख २८ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) ठाकूरदास खेमराज
दस्तुर लछमनदास दुकान मौजे आलेगाव ता. बाळापुर.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ — अकोला, रविवार ता० १४ माहे जुलै सन १८७८ इसवी. — अंक २८

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फिरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १॥० |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामिडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे यांतील संविधानक फार मौजेचें असुन हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## NOTICE.

The effects of the late Colonel C. O. Mayne, late Deputy Commissioner of Akola, will be put up to Public Auction and sold with but few exceptions to the highest bidders, at the premises lately occupied by the deceased officer, at 1 P.M. on Saturday the 20th July 1878, by the *Under signed.*

The exceptions above referred to have reference only to a few guns and articles of plate, which are especially valuable and are moderately priced even at the reserved figures placed on them.

The effects comprise much valuable ornamental and useful property in the shape of furniture, plate, firearms, glass, crockery, housefittings, books, duplex table and wall lamps, oilmanstores, &c.

Terms of sale authorized:— To officers in the Berar Commission or the Military Service, payment on the issue of pay for July 1878. To all others *Cash* on delivery which will be made at the place of sale.

List of articles amongst the effects of the late Colonel Mayne, having reserved prices:—

1 Double-barrelled Express, Metford's pattern by G. Gibbs, with case complete.
1 Double-barrelled gun No. 12, by Holland, choke bore.
1 Single-barrelled breach loading duck gun, by Holland, with water-proof cover
1 Holland rook rifle —380
4 Richly plated round side dishes
1 ,, Ditto ,, tray — 27 × 20.
1 Ditto cruet-stand, complete with six bottles.
1 Ditto pickle-stand, with three bottles.
1 Ditto Egg-stand for four eggs, complete with spoons.
Ditto Table, dessert and tea spoons, forks &. fiddlethread and shell pattern.
1 Case containing twelve desert knives and forks.
1 Case containing twelve fish knives and forks.
1 Claret Jug, richly plated.
1 Saddle, by Davis.
1 Bridle ,, Ditto.
1 Ice Machine.

BOMONJEE OOKERJEE & Co. Auctioneers.

AKOLA THE 10th JULY 1878.

## जाहिरखबर.

उत्तम लोकवासी कर्नल मेन अकोल्याचे माजी डिपुटी कमिशनर यांची मालमिळकत त्यांचे रहाते बंगल्यावर तारीख २० माहे जुलै सन १८७८ इसवी रोज शनिवारीं दुपारी बारावर एक वाजतां खालीं सही करणाराकडून प्रसिद्ध लिलावानें विकण्यांत येईल.

कांहीं बंदुका व भोजनसंबंधी पात्रें मोठीं मोलवान आहेत त्यांवर किमतीचे आकडे चढविले आहेत त्या दरानें तीं दिलीं जातील. तरी त्या किमती सोयवार व स्वस्त अशाच लाविलेल्या आहेत.

खुर्च्या, टेबलें, बंदुका, कांचेचें सामान, मृन्मय पात्रें, गृहसंबंधी सामान, पुस्तकें तऱ्हतऱ्हेचे दिवे वगैरे पुष्कळ सामान या लिलावांत विकावयाचें आहे.

सामान विक्रीच्या पैशाबद्दल अशी व्यवस्था केली जाईल कीं सरकारी कामदारांच्या जुलै महिन्याच्या पगारावर त्यांजपासून पैसे घेण्यांत येतील, व इतर गृहस्थांकडून रोख पैसे घेऊन मग त्यांस सामान दिलें जाईल.

ठरावे किमतीनें जे सामान विकलें जाणार आहे त्याची यादी येणेंप्रमाणें:—

१ डबल ब्यारल्ड (दुनाली) एक्सप्रेस, गिब्ज साहेबांनीं केलेली मेटफोर्ड प्याटर्न पेटी सुद्धां सर्व संगीन.
१ जोडनळीची बंदुक नंबर १२ ची होलंड साहेबांनीं केलेली.
१ एकनाली ब्रीच लोडिंग डक गन होलंड साहेबानीं केलेली, वाटर प्रूफचे गवसणी सुद्धां.
१ होलंड रूक राइफल ३८०
४ वाटोळया आकाराच्या मोलवान रिकाबयाचे जोड.
१ सदहू (ट्रे) तबकडी घाटी २७×२०
१ कुरटस्यांड ६ बाटल्यांसुद्धां संगीन
१ पिकल स्यांड ३ बाटल्यांसुद्धां
१ एग स्यांड चार अंड्याचा. चमच्यासुध्धां संगीन.
१ सदहू टेबल, चमचे काट्यासुद्धां फिडल थ्रेड आणि शेलप्याटर्न,
१ बारा सुऱ्या व काटे यांची केस.
१ बारा फिश नाइव्ज आणि काटे यांची केस.
१ क्लारेटची सुरई नकशीदार.
१ खोगीर डेविसचे
१ लगाम सदहू.
१ बर्फाचें यंत्र

अकोला, तारीख १० जुलई १८७८इ०.

बमनजी उकडजी आणि कंपनी हरासवाले

## नोटिस

रा. रा. आपाजी शामराव वकील मुक्काम अकोला यांस रणछोडदास लछिमनदास साहू दुकान अकोला वहिवाटदार पारकजी याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आपणाकडेस कापडाबद्दल खातेबाकी ५५॥० पंचावन रुपये आठ आणे येणें आहे ती मागितली असतां देत नाहीं ह्मणून नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत बाकीचा उलगडा करावा नाहींपेक्षां कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल. व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें ता. ९ माहे जुलाई सन १८७८ इसवी.

(सही) रणछोडदास लछिमनदास साहू दुकान अकोलें वहिवाटदार पारकजी दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस;—

देऊळघाटाहून वि. वि. गेल्या आठवड्यांत पर्जन्यानें मोठी बहार केली. जिकडे तिकडे पाण्याची बंगाळी होऊन गेली. ऊष्ण काळीं पाण्याच्या दुर्भिक्षामुळें गुरें फार डबघाईस आलीं होतीं, तीं आतां डोंगरांत पाणी व चारा थोडा थोडा झाल्यामुळें हुशार होत चाललीं आहेत. परंतु पत्रकर्ते महाराज गुदस्त सालीं येथें बनचराई कडे जे नंबर होते त्यांपैकीं बहुतेक वाहिंतीस लागले. थोडे बहुत आहेत ते सालाबादप्रमाणें हरास होऊन लोकांनीं घेतले. ह्या नंबरांत गुरें चरावयास जाण्याची जी वाट आहे त्या वाटेवरून लोकांनीं शेती केली आहे. त्यामुळें गुरांस जाण्यास वाट नाहीं. सदहू इसमाच्या शेतांत जरा गुरूं फिरकलें न फिरकलें इतक्यांत त्यास कोंडवाड्याच्या दर्शनास जावें लागतें. एथें बनचराई बद्दल कांहीं नियम आहेत किंवा नाहींत याविषयीं कांहीं समजत नाहीं. एक वेळ हरास हस्तगत झाले कीं, मग काय गुरूं केवढें कां असेना सर्वांबद्दल चोपून सारखीच वर्गणी घेतली जाते.

गुरांबद्दल जे गरीब व ज्यांचे घरचे नंबर गुरें चारायास नाहींत, अशा लोकांस फार ताप झाल्यामुळें ज्यांच्या खेड्या पाड्यांनी सोई होत्या त्यांनीं तिकडे आपलीं गुरें नेऊन घातलीं. इतरांचे हाल आहेत. तर सरकार दयाळु होऊन अमक्या गुरांबद्दल बनचराई मक्तेदारांनीं पैसे अमुकच घ्यावे व जिकडे जिकडे बनचराईचे नंबर असतील तिकडे तिकडे गुरांस जाण्यास मार्ग असावा, असा ठराव करील तरच लोकांचा बचाव आहे.

पेरणीचीं कामें बहुतेक आटपलीं.

शेती लोक आतां फार आनंदांत आहेत. साल मजकुरी पावसाचे धोरण चांगले आहे असाच अखेर पर्यंत पुरवेल तर महरगतेचा डेरा उठेलसें वाटतें. आतांशी हवा फार बिघडली आहे आसपास महामारी आकाची पैरवी आहे चिखली, मेहकर, अमडापुर येथें तर अकाबाईची स्वारी बऱ्याच दिवसापासुन आहे. परतु हल्लीं खुद बुलढाण्यास तिचें अगमन झाल्याचें कळते.

ह्या गावांत स्वच्छता कमी आहे. जिकडे पहावें तिकडे कोंना कोंपऱ्यांनीं कचऱ्याचे ढीग आहेत एक फक्त मोठा रस्ता मात्र साधारण सफा असतो. रस्ते झाडण्याकरितां भंगी लोक आहेत असें ह्मणतात, परंतु रस्त्यावर कचरा असतोच. सन १८७५ सालांत मरी अकानें एथें बराच अमल गाजविला होता. असें असतही लोकांनां निर्मळपणा आवडत नाहीं. एथें मुसलमान लोकांची वस्ती फार आहे. त्याच्या योगानें हिंदुही फार गलिच्छ झाले आहेत. म्युनसिप्यालिटीचे अधिकारी होईल तितकी पराकाष्ठा या स्वच्छतेच्या कामांत करितात, परंतु सदहू स्थितीवरून त्याचें कांहीं चालत नाहींसें वाटतें.

पायखान्यास लोक रस्त्यावर रात्रीचे बसतात. नागले लोक अशा लोकांचे पाळतीस लागुन तांबे घेतात. परंतु तांब्या परत मिळाला ह्मणजे पूर्ववत प्रमाणें क्रम सुरू असतो. यासाठीं येथें कोर्ट देण्याची

वार्ता अइती खरी होऊन पोलिसचे ३४ वे कलमाचा अधिकार सुरू झाल्यास गांव चोख राहून लोकांची अरोग्यता चांगली रहाणार आहे.

सरकारानें इतर ठिकाणाप्रमाणें एथें बाजाराकारितां ओटे बांधले आहेत. त्या ओट्यावर जे बाजाराच्या वेळीं बसतील त्यानीं भाडें द्यावें हें कायदेशीर आहे. परंतु जे लोक दोन शेर दाणे अगर थोडी भाजी घेऊन बाजारास येतात व ओट्यापासून दूर बसतात त्यांच्यापासूनसुद्धा मक्तेदारानीं भाडें घ्यावें काय? या कामांत सरकार दृष्टी पोंचवून छापील नियम पाटील पांडे यांचे द्वारे बाजारकऱ्यांस उघडरीतीनें समजावील तर लोकांना फार सुख होणार आहे. व मक्तेवाल्यास पाहिजे तसें वागण्यास सापडणार नाहीं.

गेल्या आठवड्यांत एथें एक हरिदास आले होते. त्यांच्या बरोबर १२ मनुष्यें एक बैलांची गाडी वगैरे समारंभ होता. ते एथें श्रीबाला साहेबाचे मंदिरांत उतरले होते. त्यांचीं तीन चार कीर्तनें झालीं. त्यांच्या डौलावरून त्यांचे कीर्तनास फार दाम लागतील असें वाटत होतें परंतु दोन रुपयांवर कीर्तन केलें. व तें आमचे देऊळघाटकरांनीं चार चार आणे पट्टीवर केलें. मागाहून दोन तीन कीर्तनें झालीं. बुवाच्या मागें गाणारे दोन इसम चांगले होते. यामुळें कीर्तनास शोभा असे. बुवाविषयीं विचार केला तर त्यांच्या अंगीं वक्तृत्वशक्ती नाहीं. व अर्थज्ञानही वाखाणण्यासारखें नाहीं. संस्कृत तर बुवांना येत नाहींसें दिसलें. नकलांची मात्र समृद्धि असे.

येथें दीड वर्षापासून ब्रह्मवृंदामध्यें ग्रामण्य सुरू आहे. त्याचीं उत्पन्न होण्याचीं कारणें फार विलक्षण आहेत. त्यांचा थोडा विच्यार केला असतां सहज दिसून येईल कीं, अदावती मुळेंच हें ग्रामण्य उपस्थित झालें. यांत मोठे लोक बरेच आहेत. परंतु त्यांस जात्याभिमान नावलौकिकाची चाड, व यशाला दोष लागेल याची कांहीं पर्वा नाहीं. दुसऱ्या खेपेस याची हाकिकत आपणास सादर करीन. पत्र विस्ताराची माफी करावी हे विनंती.

एक देऊळघाटकर "क्ष"

---

### प्रायश्चित्त.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यासः—

वि. वि. आपल्या तारीख २३ जूनच्या वऱ्हाडसमाचारांत "एक पत्र वाचणार." या सहीचें पत्र मांजरखेडहून आलेलें छापिलें आहे त्यांत तेथील एका ब्राह्मणी स्त्रीनें अतिशूद्राचे धातुपात्रानें शौचविधी आटोपून हस्तपादादि प्रक्षालन केलें पण त्याच पात्रोदकानें चूळ भरली नाहीं तेव्हां याबद्दल प्रायश्चित्त काय आहे असें विच्यारण्याचा मुद्दा आहे. त्यावरून मी शास्त्रीय विषयांत निष्णात अशा विद्वान् लोकांचे एथें जाऊन माहिती मिळविली. त्या आधारानें आपणाकडे दोन ओळी पाठवितों त्यांस येत्या अंकीं जागा मिळेल अशी आशा आहे.

अतिशूद्राचे भांड्याचें पाणी जर पोटांत गेलें तर मात्र त्याला प्रायश्चित्तमयूखांत प्रायश्चित्त सांगितलें आहे. त्या व्यतिरिक्त फक्त शौचास गेल्यानें अगर हात पाय धुतल्यानें त्याकडे पतितत्व येत नाहीं. व वरील हकीकतींत तोंडांत पाणी घेतलें नाहीं असें आहे. तेव्हां हा दोषच ह्मणतां येत नाहीं व अर्थांत त्यास प्रायःश्चित्तही नाहीं, हें निर्विवाद आहे. आतां अनामिकाचे पात्राचा स्पर्श झाला असतां सचैल स्नान वगैरे करण्याची प्रवृत्ति आहे व ब्राह्मणचरणांगुष्ठ चें उदक सदैव पवित्र करणारें आहे ह्मणून व्यतिपात, द्वादशी, सोमवती, गजच्छाया इत्यादि पर्वणीस साधारणपणें तें घेतात त्यास अनुसरून अशा क्षुल्लक गोष्टीकरितांही विप्रचरणांगुष्ठ तीर्थ घेण्याचा परिपाठ आहे व याप्रमाणें तेथें घडलें असावें. आतां यांत ग्रामण्य वाढविण्याचें कारण इतकेंच असावें कीं, नदींतील विहिरीचे पाण्यानें हात पाय धुवून गुळणा करणें नाहींही गोष्ट संभवत नाहीं, व गुळणा केला तर नुसत्या स्नानानें पुरें होत नाहीं त्याला पंचगव्यादि प्रायश्चित्त शास्त्राधारानेंच दिलें गेलें पाहिजे. तशांतून प्रायश्चित्त घेण्याचा अधिकार सधवा स्त्रियांस नाहीं. ह्मणून त्यानीं जरी मोठें पातक केलें तरी त्याबद्दल प्रायश्चित्त त्यांच्या पतीनीं घेतलें पाहिजे, अशी शास्त्राची आज्ञा आहे. एतावतः त्या बाईनें मुखांत उदक घेतलें नाहीं तर स्नान करून मोकळी झाली यांत तिनें कांहीं वावगें केलें नाहीं. तिला कांहीं स्पर्शदोषाबद्दल तीर्थ घेण्याची जरूर नव्हती पण देशरिवाजा प्रमाणें घेतलें यांतही विशेष बिघडलें नाहीं; परंतु मुखांत उदक गेलें असून होळशाक झाली असल्यास चांगलें नाहीं. तथापि खऱ्या खोट्याचा दोष तें लपविणारावर राहील. या बद्दल इतरांनीं ग्रामण्य वाढविण्यांत हाशील नाहीं. कारण अशानें दोषाचा परिहार होतो असें तर नाहींच, पण उलट हट्टाला पेटून वैर वाढतें. ह्मणून होईल तोंवर ग्रामण्य मोडून ऐक्य वाढविण्यासाठीं सर्वांनीं निरंतर प्रयत्न करीत असावें. त्यांतच आपलें व आपल्या देशाचें हित आहे. पत्रविस्तारास्तव माफी मागतों कळावें. मिती आषाढ शुद्ध १० शके १८००

तुमचा दास
रामात्मज.

---

### कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आर्या.

कृष्णेच्या जनकें तें
शिंद्याचें मत न मानिलें लेश ॥
ह्मणु नि प्रवृत्त झाला
शिंदा द्याया तया महा क्लेश ॥ १४६ ॥

श्लोक.

तो सैन्य घेवोनि महा पराक्रमी ।
गरिष्ठ युद्धार्थ उदेपुरा क्रमी ॥
तें भीमसिंग प्रभुही न साहुनी ।
उठे समीकार्थ चमूस वाहुनी ॥ १४७ ॥

आर्या.

कन्यावरणासाठीं
पाठविलें सैन्य जें जगत्शिंगे ॥
तेंही साह्या आलें,
यच्छस्त्रें झळकतीं जशीं भिंगें ॥ १४८ ॥

श्लोक.

दोन्ही सेना लढति निकरें
दाविती स्वामिभक्ती ।
मोठी ज्यांची रणचतुरता
आणि उत्साहशक्ती ॥
कोणाच्याही विजय अथवा
भंग बुद्धीस ये ना ।
मध्यस्थत्वें निरखिति रणा
त्यांसही तर्कवेना ॥ १४९ ॥
शिंद्याचें परि सैन्य शात्रव बळा
जिंकी बळें आगळें ।
युद्धाचा परिणाम दूतवचनें
हा भीमसिंगा कळे ॥
तेव्हां तो वचके अशांत विजयी
शिंदा पुरासंनिध ।
स्वच्छंदें बहु सैनिकासह वसे
तच्छौर्य एवंविध ॥ १५० ॥

( पुढें चालू. )

---

## वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ शुद्ध १५ शके १८००

---

## पारशी लोकांचा पलटण भरण्याचा प्रयत्न.

मनुष्यास अवश्यक जे गुण पाहिजेत त्यांतच शूरत्व आणि धीटपणा पाहिजे आहे. यासाठीं युरोपियन लोकांत विद्या शिकविण्या बरोबर त्यास शौर्य येण्याचेंही अध्ययन देतात तेणेंकरून आपलेपेक्षां त्यांच्यांत शूर शिपाई अधिक निपजतात. कांहीं देशांत तर प्रत्येक पुरुष शिपायाची विद्या शिकलाच पाहिजे असा कायदा आहे. या योगानें प्रसंग विशेषी राजास लढाईचे कामीं या लोकांचा उपयोग करावयास सापडतो आणि प्रत्येक मनुष्यास स्वसंरक्षण हें एक उत्तम सहाय्य या शिपाईगिरीच्या योगानें येतें सबब आपलेही देशांत असा प्रघात पडला तर चांगलें होईल.

व्हालंटियर ह्मणुन पलटणी भरण्याची एक तऱ्हा आहे, ह्मणजे अनेक प्रकारचे धंदे व नोकऱ्या करणारे लोक एकत्र होऊन शिपाईगिरीचें कसब वाढविण्याकरितां व सरकारचे उपयोगी पडण्याकरितां सरकारचे पगारदार शिपाई न होतां पलटण उभारतात तिला व्हालंटियर असें ह्मणतात. युरोपियन लोकांच्या कित्येक व्हालंटियर पलटणी हिंदुस्थानांत उभारल्या आहेत. सरकार त्यांस पुष्कळ सहाय्य करिते. ही तऱ्हा पाहून आमचे पारशी लोकजे बहुत गोष्टींत युरोपियन लोकांचें अनुकरण करीत आहेत त्यांनीं आपले मंडळीची एक व्हालंटियर पलटण भरण्याचा विचार करून हिंदुस्थान सरकारास सहाय्य व परवानगी मागितली पण सरकारानें स्वतंत्र परवानगी त्यांस दिली नाहीं, युरोपियन लोकांच्या ज्या व्हालंटियर्स आहेत त्यांतच तुमच्या कंपन्या पाहिजे असल्यास भराव्या व सर्व प्रकारें त्यांचे नियम तुह्मी पाळावेत असा त्यास हुकुम झाला यावरून त्या उद्योगास लागलेले पार्शी लोक निराश झाले आहेत. आह्मी ह्मणतों कीं यांत त्यांस वाईट वाटण्याचें विशेष कारण नाहीं. शिपाईगिरींत तरबेज रहाण्याची विद्या व स्वसंरक्षण युरोपियन पलटणींतही मिसळण्यानें होत नाहीं असें नाहीं. पण त्यांची आणखी कांहीं कारणें असतील तर आह्मास ठाऊक नाहींत. पार्शी पलटण स्वतंत्रच भरून इंग्लिश सरकारच्या शत्रूवर स्वतंत्रपणें लढाईस जाऊन जय मिळवावा व स्वजातीची विशेष कीर्ति करावी असा त्यांचा हेतु असेल तर तो वाईट नाहीं. पण सरकारास तो न आवडेल तर उपाय काय ? आह्मी इच्छितों कीं आमचे हिंदु प्रतिष्ठित गृहस्थही असा एकोपा करून शौर्यसाधनास प्रवृत्त होतील तर ती एक विशेष गोष्ट होईल.

---

## इंदापुराकडे दुष्काळाचें भय.

भयंकर व देशाची नासाडी करणारा दुष्ट दुष्काळ आमच्या देशांत किती काल राहून आह्मास कोणत्या स्थितीस पोचविणार तें कळत नाहीं. दक्षिणेंत दोन वर्षे दुष्काळ पडून लोक जिग जिग झाले व अन्नास महाग झाले ते आता तरी चांगला विपुल पर्जन्य पडून सुखी होतील व लवकर पोटभर भाकरी खाऊं लागतील असें वाटत होतें. पण पुणें जिल्ह्यांतील इंदापुर तालुक्याच्या कपाळीं या वर्षीं हा लाभ आहे किंवा नाहीं तें समजत नाहीं. दोन वर्षें तेथें कडक दुष्काळ झाला व आतांही मृग, आर्द्रा व अर्ध्या पुनर्वसु अशीं अडीच नक्षत्रें कोरडीं ह्मणण्यासारखींच ह्मणजे पेरणीचा हंगाम न साधू देतां निघून गेलीं. तेणेंकरून सारा तालुका ओसाड पडण्याचा प्रसंग दिसुन लोक अतिशय घाबरून गेले आहेत. कित्येक गांवांतुन घरास कुलुपें घालून लोक परमुलखांत निघुन गेले. कित्येक उपासमारा करून पावसाची वाट पहात आहेत. हा पाऊस जर तिकडे चांगला पडला नाहीं तर आणखी १८ महिने तिकडे पीक होण्याची आशा नाहीं, व तसें झालें ह्मणजे त्या प्रांताला साडेतीन वर्षांचा दुष्काळ झाला. ह्मणजे दुर्गादेवीदुष्काळाचें लहानसें पिलूच झालें असें ह्मणावें लागेल ! व असें नुसतें तोंडानें ह्मणणें सलभ आहे; पण प्रसंग ज्यांजवर गुदरतो त्यांस किती कठीण आहे याचें मनन केलें ह्मणजे अंतःकरणास अत्यंत खेद होणार आहे तिकडील गरीब बिच्याऱ्या रयतेने किती दुःख सोसावें व कसा निर्वाह करावा ! परमेश्वरा, असा दुःखाचा प्रसंग कोणावर आणू नको. कठोरता आवर व दयामेघ त्या प्रांतावर त्वरित पाठव. केवळ तुझ्या इच्छेवर त्यांचें व सर्वांचें जीवन अवलंबून आहे सबब अंत पाहूं नको. आतांच सर

कारानें तलाव वगैरे खोदून उपाशी मरणारे लोकांस जगविण्याची सुरुवात केली. तीन हजार मजूर काम करूं लागले. व धर्मार्थ अन्न देण्याच्या सत्रांत ६००पर्यंत भरती झाली. ही पुढें किती वाढेल व त्यांचें कसें काय होईल तो भयंकर विच्यार आह्मी आतां न करितां कृपाळु परमेश्वराची या भागावर पर्जन्य पाठविण्याविषयीं पुन्हा प्रार्थना करून हा लेख आटोपतों.

### पावसाचा आहवाल.

धुळें— गेल्या आठवड्यांत १॥ इंच पर्जन्य पडला.

इंदापुर— पर्जन्याचा अतिशय बोभाटा झाला आहे. धर्मार्थ अन्नछत्रें, व दुष्काळसंबंधी मजूरकाम काढणें सुरू झालें आहे.

नगर— जिल्ह्यांत पाऊस सरासरी आहे.

ठाणें— एकसारखा पाऊस पडत असून शेतकीचीं कामें झपाट्यानें सुरू आहेत.

सोलापुर— हवा गार झाली आहे, बु[illegible] नित्य पडत असून एक दिवस चां[illegible]ला पाऊस पडला.

पंढरपुर— एके दिवशीं साडेतीन इंच पाऊस पडला.

मालवण— कोंकणांत मालवण एथें एक दिवसांत ९ इंच पाऊस पडला.

सातारा— मृग आर्द्राचा पाऊस चांगला झाला नाहीं.

पुणें— पर्जन्याची बुरबूर नित्य सुरू आहे व दोन तीन दिवस मोठा पाऊसही पडला.

मुंबई— या आठवड्यांत ६ दिवस सूर्यदर्शन नाहीं. विहिरी व तलाव तुडुम भरले.

कच्छभूज— एथें दोन दिवसांत १२ इंच पाऊस पडला.

बेळगाव— तीन दिवस सारखा भीज पाऊस पडला.

कोल्हापुर— पाऊस चांगला पडला व आणखी पडेल अशीं चिन्हें आहेत.

नाशिक— पर्जन्याची बुरबूर आहे. चांगले पाऊस ५।४ पडले पाहिजेत.

## वऱ्हाड.

हैदराबादेस ६ वे तारखेस निजाम सरकारचे आजीस काऊन आफ इंडियाचा किताब देण्याकरितां दरबार झाला.

अकोल्यास महामारीचा उपद्रव जोरावर आहे. गेल्या आठवड्यांपेक्षां या आठवड्यांत आजाऱ्यांची व मरणाऱ्यांची संख्या जास्ती आहे. ईश्वर कृपेनें पुढील आठवड्यांत शांतता होवो. रा. रा. रामभाऊ वैद्य सातारकर यांच्या गोळ्या ज्यांस ताबडतोब दिल्या जातात त्यांपैकीं बऱ्याच लोकांस चांगला गुण आल्याचें समजलें आहे हें ऐकून आह्मांस संतोष होतो. बुलढाणें एथेंही हा उपद्रव सुरू झाला असें पत्र आल्यावरून कळतें. उत्तम हवेच्या व रोगानिवारक जी जागा तेथेंही महामारी बाई आपला हल्ला चालविण्यास सोडीत नाहीं!

मि. बेनन साहेब पैनगंगाकडील सेकंड ग्रेड सुपरइंटेंडेंट यांस एप्रिलचे २८वे तारखेपासून फर्स्ट ग्रेड केलें.

विलायतेहून इंडिया आफिस मधून हुकूम आल्यावरून समजतें कीं मेजर हडलस्टन साहेब अकोल्याचे कायमचे डिपुटी कमिशनर यांनीं आपली रजा आणखी सहा महिने वाढविली.

सावनूर बंकापुराकडील एक मुसलमान गृहस्थ हसनखान नावाचे या आठवड्यांत एथें आले होते. त्यांच्यामध्यें असा गुण आहे कीं, ते अंगावर पांघरूण घेऊन वेगवेगळे दोन तऱ्हेचे शब्द काढितात. एक सवाल व त्यावर दुसरा जवाब. व तशा मतलबाचें मौजेचें एक भाषण त्यांनीं तयार करून ठेविलें आहे. दोन आवाज इतके वेगवेगळे व जलद निघतात कीं त्यांनीं खचीत कोणी दुसरा मनुष्य लपवून जवळ ठेविला असावा, असा भास होतो. शिवाय गुडगुडी ओढणें, मुलीचें रडणें, कोंबडा, मांजरें यांचें ओरडणें हुबेहूब ऐकवितात. रा. ब. नारायण भाई, व रा. रा. कृष्णाजी हरी कोलटकर यांजकडे यांचे हे चमत्कार झाले.

क्या. के जे एल मेकंजी इलिचपुरचे डिपुटी कमिशनर यांची २० वर्षे भरल्यावरून त्यांस मेजरची पदवी मिळाली.

सिकंदराबादेस मि. अबदुल रहमानखा यांस पोलिसचे आफिशियेटिंग चीफ इन्स्पेक्टर नेमिले होते त्यांस रेसिडेंट साहेबांनीं त्या जागेवर कायम केलें.

खानबहादुर नबाब महमद शाबुदीन अल्लाची मरण पावल्यानें जी अल्याचीची एक जागा रिकामी झाली ती मि. टी रंगराव यांस दिली, असें हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटवरून समजतें. नबाब साहेब आफिशियेटिंग असिस्टंट कमिशनरचें काम पहात होते ती जागा हैदराबादचे अल्लाची मि. यासिनखान यांस दिली.

नागपुराकडे पाऊस चांगला असल्याचें तिकडील पत्रावरून समजतें.

मि. हार्डेन साहेब उमरावतीचे डिपुटी कमिशनर यांनीं पेनशनाकरितां राजीनामा दिला त्यावरून त्यांस सालीना २५०० रुपये पेनशन ठरून शिवाय १२००० रुपये बक्षीस मिळालें. यांची नोकरी १७ वर्षांची होती. हलक्या नोकरीपासून हे वाढत गेले, म्हातारे झाले नव्हते, व कामास निरुपयोगी असें डाकटराचें सर्टिफिकेटही त्यांना नव्हतें असें असतां सरकारानें पेनशना शिवाय एवढें मोठें बक्षीस त्यांनां कशासाठीं दिलें ! अशी टाइम्स पत्रांत कुरकूर आहे. व ते ह्मणतात कीं पुढें दुसऱ्या आफिसरास हा आतां नमुना होईल.

क्या० लेन साहेब वऱ्हाडांतील पोलिसचे व जेलचे इन्स्पेक्टर जनरल यांस रेसिडेन्ट साहेबांनीं रेजिस्ट्रेशन खात्याचे इन्स्पेक्टर जनरल असाही अधिक हुद्दा दिला. व पहिलीं कामें सभांळून हेंही शिवाय काम त्यांनीं पहावें असें ठरविलें.

मि. क्रेग सा. अकोल्याचे एक्झक्युटिव इंजिनियर व मि. हिगिन्स सा. असिस्टंट इंजिनियर आपआपले कामावर येऊन रुजू झाले

मि. गणेश कृष्ण देवधर व मि. आबाजी परशराम जेजूरकर व मि. अनंत गणेश घाणेकर यांस प्रोबेशनरी सेकंड ग्रेड सब ओव्हरसियर नेमिले,

उमरावती— गेल्या आठवड्यांत पर्जन्य उत्तम पडला येणेंकरून सर्वांस आनंद वाटत आहे. आतां पेरण्याचीं कामें झपाट्यानें सुरूं झालीं आहेत.

मेजर लाटन साहेब रजेवरून उमरावतीस आपले कामावर आले.

मूर्तिजापुर— [illegible] पत्र आल्यावरून कळतें कीं, पाऊस चांगला पडला [illegible] पेरण्याचें काम झपाट्यानें सुरू आहे. स्टेशन[illegible] [illegible]चा उपद्रव होऊन ५।७ मनुष्यें मेलीं पण शहरांत त्याचा संसर्ग लागला नाहीं. मि० मुबारकअली तहशिलदार यांनीं सफाईवर उत्तम लक्ष्य पुरविलेलें आहे.

अकोल्यास खोलेश्वर देवळाजवळ एक प्रेत नदींत सापडलें. तें कोणा तरुण वैराग्याचें होतें. विशेष शोध लागला नाहीं.

मि. स्टिविन्सन साहेब खामगावचे पोलिस इन्स्पेक्टर यांनीं आपली रजा रद्द केली ह्मणून मि. स्याबियल साहेब खामगावास गेलेले परत आले.

उमरावतीस २४ वे तारखेस व यवतमाळास २९ वे तारखेस सेशनकोर्ट भरणार आहे.

सांगलीकर नाटकवाले दोन महिने एथे पडून राहिले आहेत त्यांचा काल एक खेळ झाला.

अकोल्याचे म्युनिसिप्यालिटीची १० वे तारखेस जनरल कमिटी भरली होती तींत एक दोन महत्वाचे ठराव झाले, टोल फड ह्मणजे नाकें दस्तुरी बसविण्याचा ठराव झाला. व बाळगलेल्या कुत्र्यांवर कर बसवावा असें ठरत होतें तें रहित झालें. नवीन कित्येक मेंबरांची निवड झाल्यानें कमिटीचीं कामें पूर्वींहून अधिक चांगलीं चालतील असें दिसतें. १० वे तारखेस रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान यांनीं एक दोन प्रकरणांत चांगला कोटिक्रम केला व त्यावरून कमिटीला मोठा तजेला दिसून आला. १५ वे तारखेस पुन्हा जनरल कमिटी आहे.

इलिचपुराकडे पर्जन्यानें गेले आठवड्यांत रेलचेल करून दिली. हल्लीं हवेंत गारवा उत्तम रीतीचा आला आहे. पेरणीचीं कामें झपाट्याने सुरूं आहेत व बाजार भाव मंदा आहे.

वऱ्हाडांतून सालोसाल कापसाचे गट्ठे बाहेर देशीं रवाना झाले त्याचें टिपण पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—

| सन | गट्ठे |
|---|---|
| १८७१ । ७२ | १४५,६०९ |
| १८७२ । ७३ | २०४,९२० |
| १८७३ । ७४ | २६२,९२० |
| १८७४ । ७५ | २७४,४११ |
| १८७५ । ७६ | २१५,५४२ |
| १८७६।७७ | २७६२४१ |
| १८७७।७८ | ३४५५७२ |

एकंदर वऱ्हाड व नागपुर मिळून सालोसाल माल तयार किती झाला त्याचें ठिपण पुढील प्रमाणें आहे.

| सन | गठ्ठे |
|---|---|
| १८६९ । ७० | २१२३२८ |
| १८७० । ७१ | २४६१०७ |
| १८७१।७२ | १९०५९५ |
| १८७२।७३ | २४४१८८ |
| १८७३।७४ | ३०३१०१ |
| १८७४।७५ | ३११३०९ |
| [illegible]५।७६ | २३५३९२ |
| [illegible]७७ | [illegible]११३१९ |

१८७६।[illegible]रलेल्या सालाची मार्चअखेर [illegible] [illegible]वा संख्या यांत नमूद झालेली नाहीं; तरी सदरील विक्रीस गेलेल्या मालाची संख्या सुमार साडेतीन लक्षांची आहे. व नागपुराकडील पाऊण लाखाची आहे. त्यावरून मागील आठ सालांपेक्षांही गुदस्त सालीं कापूस आमचे देशांत पुष्कळ झाला असें दिसून येऊन आह्मास संतोष होतो.

उमरावतीचे हल्लींचे डिपुटी कमिशनर लेफटिनेट कर्नल मॅकेंझि साहेब पूर्वी स्माल काज जडज व रेजिस्टर जनरल होते. व त्याबद्दल त्यांस १५०० रुपये पगार होता आणि हल्लीं थर्ड क्लास डिपुटी कमिशनर झाल्यानें त्या जागेचा पगार १३३३८५८४ आहे. तर त्यांचें नुकसान न व्हावें यासाठीं हिंदुस्थान सरकारानें त्यांनां पगाराशिवाय १५०० रु. चे भरतीला परसनल अलावन्स १६६८१०८८ देण्याचा स्पेशियल ठराव केला असें कळतें.

नवा दिवाणी कायदा— सन १८७७ चा आक्ट १० वा व मुदतीचा कायदा सन १८७७ चा १५ वा तारीख एक सप्तंबर सन १८७८ पासून वऱ्हाडास लागू करणार.

अडगाव एक्स्ट्रा असिस्टंट कोर्टाचे शिरस्तेदार रा. रा. रंगो जनार्दन यांस इलिचपुरास व इलिचपुरच्या एक्स्ट्रा असिस्टंट कोर्टाचे शिरस्तेदार रा. रा. रामराव व्यंकटेश यांस अडगावास नेमिलें.

## वर्तमानसार.

डेलीन्यूज पत्राचा कान्स्टांटिनोपल एथील बातमीदार लिहितो कीं, रशियन फौजेपैकीं सुमारें ३९,००० लोक तापानें आजारी असून तो जास्ती वाढत चालला आहे.

थोड्या दिवसांपूर्वीं सुरत एथें झालेला दंगा शांत करण्याचे कामीं मिरगुलामबाबाखान यांनीं सरकारास मदत केली यामुळें गव्हरनर जनरल यांनीं त्यांस खानबहादूर हा किताब दिल्याविषयीं हिंदुस्थानचे सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे. यांनीं मदत ह्मणून इतकीच केली होती कीं, ज्या दिवशीं दंगा झाला त्या दिवशीं हे व मुंबईचे प्रसिद्ध महमद अली रोगे हे गाडीतून बसून जात होते त्या वेळेस दंगेखोर लोकांस यांनीं दंगा न करितां घरोघर जाण्यास सांगितलें व दुसरे दिवशीं कांहीं दुकानदारांस त्यांनीं दुकानें लावलीं होतीं तीं उघडण्यास सांगितलें.

रशियाचे बादशहास आपणास कोणी गोळी घालील अगर सुरीनें भोसकील अशी मोठी भीति पडली आहे. ते बाहेर निघाले ह्मणजे पुष्कळ दूर पर्यंत पोलिस शिपायांचे पहारे वगैरे ठेवलेले असतात.

रशियामध्यें बंडखोर लोक इतके धीट झाले आहेत कीं, ते आपला बंड करण्याचा विचार धडधडीत उघड रीतीनें प्रदर्शित करतात. तेथील अधिकारी लोक उत्तम रीतीचा बंदोबस्त करीत असून रस्त्यांत गर्दी वगैरे होऊं न देण्याचा प्रयत्न करीत आहे.

[illegible] सा आलास्का एथें एक प्रकार[illegible] इंच असून तो फार चकचकीत व लठ्ठ असतो. तो मासा वाळवून नंतर शेपटीकडून पेटवितात व त्यापासून मेणबत्तीसारखा उजेड पडतो.

इराणचे शाह हे युरोपांत जाण्याकरितां निघाले त्या दिवशीं त्यांनीं तेहरानजवळ एक यात्रेचें ठिकाण आहे तेथें दर्शनाकरितां ते जात होते. वाटेंत इस्पाहान एथील पलटणीपैकीं ५० शिपायांनीं त्यांचे गाडीस वेढा घातला व त्यांस एक अर्ज दिला. शाहास ते वेळेस जाण्याची घाई असल्यामुळें त्यांचे बरोबर असलेल्या शिपायांनीं सदर्हू पलटणचे शिपायांस जाण्यास सांगितलें; परंतु ते ऐकेनात. तेव्हां दोघांत तंटा उपस्थित होऊन बरीच मारामारी झाली व पुष्कळ लोक जखमी झाले. नंतर कांहीं वेळानें दुसरे लोक येऊन त्यांनीं दंगेखोरांस कैद केलें व त्यांपैकीं दहांस फांशी दिलें व कांहींस फटके मारले व कांहींचे कान कापले.

गव्हरनर जनरलचे परवानगीशिवाय दुष्काळ पीडितांचे मदतीकरितां लोकांपासून वर्गणी घेऊं नये असें स्टेट सेक्रेटरीनीं आपलें मत प्रदर्शित केलें आहे.

ने. ओ.

---

## जंगल संरक्षणाविषयीं मुंबईच्या गव्हर्नर साहेबांचें मिनिट.

देशांत ज्या मानानें जंगल व वृक्ष संख्या कमजास्त असते त्या मानानें पर्जन्यवृष्टि कमजास्त होते असें कांहीं विद्वान् इंग्लिश लोकांचें ह्मणणें आहे. पूर्वींप्रमाणें इकडेस अलीकडे पाऊस पडत नाहीं हें दुष्काळांच नजरेखालीं आलें असेल. ही पावसाची कमताई झाडी कमी झाल्यामुळें झाली असें त्यांचें ह्मणणें आहे. आतां जंगल व पर्जन्यवृष्टि यांत परस्पर काय संबंध आहे हें अजून चांगलें कळत नाहीं; परंतु वृष्टि कमी होत असल्यानें दुष्काळ पडल्याखेरीज पांच वर्षें देखील जात नाहींत याचा मात्र चांगला अनुभव आला आहे. जंगल व झाडी यांचें संरक्षण करणें हा एक दुष्काळ न पडूं देण्याचा मार्ग आहे अशी सरकारची खात्री झाल्याचें दिसतें. हिंदुस्थान सरकारानें जंगलाचे बाबतींत थोड्या दिवसांपूर्वीं एक कायदा पास झाला, व कनिष्ट सरकारेंही आपल्या प्रांतांतून जंगलसंरक्षणाची तजवीज करीत आहेत. या बाबतींत गव्हर्नर साहेबांनीं आपला ठराव नुकताच प्रसिद्ध केला आहे. जंगलाचे संबधानें थोडासा चमत्कार वाटतो तो असा. सुमारें वीस पंचवीस वर्षांपूर्वीं या इलाख्यांत जंगल झाडी फार होती. या झाडीपासून तापाच्या सांती वगैरे फार उत्पन्न होतात अशा समजुतीनें त्या वेळच्या अधिकाऱ्यांनीं लोकांस उत्तेजन दे[illegible]न झाडी कापवली व तेव्हां[illegible]पासून जंगली ताप वगैरे किरक[illegible]ळ आजार कमी झाले असें पुष्क[illegible]ळ लोक समजतात. हल्लींचा समज निराळया प्रकारचा झाला आहे व तदनुसार वर्तन करण्याचा सरकारानें उपक्रम केला आहे. जंगल फार कमी झाल्यामुळें दुष्काळ पडूं लागले ह्मणोन तर जंगलखातें उपस्थित होऊन आज पंधरा वीस वर्षें झालीं, व या काळांत जंगलाचे संरक्षणाविषयीं या खात्याकडील अधिकाऱ्यांनीं पुष्कळ श्रम केले असतील; परंतु जंगल फार कापले गेल्यामुळें पर्जन्यवृष्टि कमी होऊं लागली अशी हल्लींची समजूत आहे. आमच्या सरकारानें या बाबतींत हल्लीं जो ठराव केला आहे त्याचा थोडा विचार करूं.

कोंकण व महाराष्ट्र देश यांत सह्याद्रि पर्वताची ओळ आहे. या पहाडाच्या शिखरांतुन कांहीं नद्या निघून पश्चिमेकडेस ह्मणजे कोंकणांतून वाहत जातात व कांहीं पूर्ववाहिनी ह्मणजे महाराष्ट्र देशांतून वाहतात. याच प्रमाणें नगर, नाशिक व खानदेश यांत पर्वताच्या ओळी आहेत त्यापासून त्या जिल्ह्यांतील नद्या निघाल्या आहेत. सह्याद्रीचे शिखराच्या पूर्वेकडील भागांतुन ज्य ज्या नद्यांचे उगम आहेत त्या त्या ठिकाणीं व नगर, नाशीक, व खानदेश या जिल्ह्यांतील डोंगरांतून ज्या नद्या निघतात त्यांच्या उगमाचे आसपास रानें वाढवावीत असें सरकारचें ह्मणणें आहे. असलीं रानें वाढविल्यानें उन्हाळ्यांत नद्या लवकर सुकणार नाहींत, बंधारे व पाटस्थळें यांस उन्हाळ्यांत खंड पडणार नाहीं व विशेषेंकरून पर्जन्य वृष्टि चांगली होत जाईल असें ठरावांत लिहिलें आहे. जंगल या शब्दांत सरकार झाडाचाच समावेश करतें असें नाहीं. गवताचाही समावेश करतें. जंगल संरक्षणार्थ नद्यांच्या उगमाचे आसपास जी शेती असेल तीही बंद करण्याचा सरकारचा विचार दिसतो. हा प्रकार मोठमोठ्या नद्यांच्या उगमा जवळील झाला. लहान लहान झरे व नाले ज्या ठिकाणाहून निघतात तेथेंही रानें राखण्याचा सरकारचा इरादा दिसत आहे. याप्रमाणें रानें राखण्याविषयीं सरकारानें ठरविलें आहे.

रानें राखल्यापासून अनावृष्टि कमी होईल हें जर खरें असेल तर सरकारास हातच्यानें रानें राखिलीं पाहिजे; परंतु वर सांगितलेला ठराव इतका कांहीं चमत्कारिक आहे कीं, सर्व डोंगराच्या पाळीभर रान ठेवण्याचें सरकार नें मनांत आणल्यास तसें होऊं शकणार आहे. डोंगराच्या बहुतेक पाळीभर लहान थोर झरे निघतात व ठरावांत मोठमोठ्या नद्यांचे उगम झरे व नाल्यांचे उगम या तिन्ही ठिकाणांच्या आसपास रानें राखावयाचीं आहेत असें लिहिलें आहे तेव्हां बहुतेक सर्व पहाड रानाकरितां सरकार राखणार असें होतें. सरकार, रानें ह्मणजे फक्त लहान थोर झाडेंच राखणार इतकेंच नाहीं. तर गवतासुद्धां रानें ह्मणते. तेव्हां असल्या सक्त नियमापासून गरीब शेतकऱ्यांस व इतर रयतेस किती त्रास होणार आहे याचें अनुमान करवत नाहीं. अलीकडेस या इलाख्यांत बहुतेक ठिकाणीं जमीनीची इतकी लागवड झाली आहे कीं, पडीत जमीन फार थोडी नजरेस पडते. प्रत्येक गांवास सरकारानें चराईचीं ठिकणें नेमून दिलीं आहेत; परंतु तीं इतकीं लहान आहेत कीं, वर्षांपैकीं बरेच दिवस गुरांस त्या ठिकाणांत कांहीं एक खावयास मिळत नाहीं. या दिवसांत शेतकरी व दुसरे लोक जनावरांचा निर्वाह पहाडांतील गवतावर करतात व ज्या वर्षीं पाऊस चांगला नसतो त्या सालीं लांब प्रदेशांतील गुरें देखील पहाडांत चरायास जातात. शेतकरी लोकांच्या जनावरांस शेतीपासून जी वैरण उत्पन्न होते तिचा कांहीं तरी आधार असतो; परंतु इकडेस शेतकरी नसणारे असे लोकही पुष्कळ गुरें बाळगतात व त्या गुरांचा बहुतेक निर्वाह पहाडांतील गवतावर होतो. असल्या ठरावापासून या लोकांस मोठी अडचण येणार आहे. दुसरें या ठरावापासुन जळाऊ लाकडांच्या संबधानें फारच अडचणी येणार आहेत. सर्व देशभर जमीनीची लागवड झाल्यामुळें डोंगराखेरीज रान बहुतेक राहिलें नाहीं व वर सांगितल्याप्रमाणें डोंगराचा बंदोबस्त झाला ह्मणजे जळाऊ लाकडांची फार पंचाईत पडेल. याविषयीं सरकारानें थोडा विचार केला पाहिजे. दुसरें पहाडांत नेहमीं रहाणारे भिल्ल व कोळी लोक यांस तर फारच अडचणी येणार आहेत. या लोकांची बहुतेक उपजीविका लांकडें तोडणें गवत कापणें, गेयशेल तेल काढणें, शिकार वगैरे धंद्यावर चालते. याशिवाय ते डोंगरावरून थोडी बहुत शेतीही करितात, परंतु शेतकी त्यांच्या उपजीविकेचें मुख्य साधन नाहीं. तेव्हां सरकारी ठरावा अन्वयें रानाचा बंदोबस्त झाला ह्मणजे त्यांची बहुतेक उपजीविका नाहींशी होऊन त्यांस उपाशीं मरण्याचा प्रसंग येणार आहे. पहाडाच्या संबधानें ठाणें वगैरे जिल्ह्यांत वतनदारीचे हक्क आहेत. या हक्काविषयीं सरकार काय तजवीज करणार? सरकार पहाडांतील शेती लोकांस शेती करितां दुसरी जागा देऊं ह्मणतें, व असें करणें रास्त आहे, परंतु ज्या लोकांस शेतकीची विशेष अभिरुची नसून त्यांचा निर्वाह केवळ लांकडाचे गवताचे व व्यापारावर व पारधीवर आहे हें सरकारासही माहित आहे. ज्या लोकांस असल्या रीतीनें कालक्रमण करण्याची परंपरा संवय आहे ते एकदम पहाड सोडून मैदानांत येऊन रहाण्यास कितपत खुषी होतील याचा आह्मास फार संशय आहे; दुसरें पहाडाच्या पाळीभर रानें वाढविल्यानें पहाडाचे पायथ्यास जे लोक रहातात त्यांस जनावरांची पूर्वींप्रमाणें भीति उत्पन्न होणार आहे. पूर्वीं लोकांजवळ हत्यारें असत त्यामुळें या भीतीचे त्यांस मोठें महात्म वाटत नसे परंतु शस्त्रासंबंधी अलीकडेस जे कायदे झाले व होत आहेत त्यामुळें लोकांजवळ हत्यारें अगदीं राहिलीं नाहींत, व रानें वाढलीं ह्मणजे क्रूर जनावरांपासून लोकांस आपला बचाव करतां येणार नाहीं. तरी हा ठराव अमलांत आणण्यापूर्वीं रयतेस कोणकोणच्या नडी येणार आहेत त्याचा सरकारानें योग्य विचार करावा. आतां असलीं रानें राखल्यापासून पुढें दुष्काळ पडतील न पडतील याचा अनुभव येईल तो खरा परंतु हीं रानें राखल्यापासून सरकारास सर्व प्रकारचीं लांकडें, गवत, वनस्पती वगैरे पासून उत्पन्नाची ही एक बाब होणार आहे. खाजगी रानांत देखील प्रसंगोपात सरकार हात घालणार असें दिसतें. तेव्हां सरकारानें या ठरावाचा प्रथम पूर्ण विचार करून मग तो अमलांत आणावा अशीं आह्मी पुनः सूचना करतों.

ने. ओ.

---

## महामारीवर रामबाण औषध.

या औषधाच्या गोळया सातारकर प्रसिद्ध वैद्य रा. रा. रामचंद्र भास्कर गोरे यांनीं केलेल्या एका मित्राकडून आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकडे विकण्यास आलेल्या आहेत. या एक रुपयास १६ दिल्या जातात, या मोठ्या गुणाकारी आहेत असें समजतें. यांच्या योगानें जुलाब व वांती एकंदम बंद न होतां आजाऱ्याची प्रकृती दुरुस्त होत जाती व पोट फुगत नाहीं. इतकें मात्र केलें पाहिजे कीं, या रोगाचा झटका समजल्या बरोबर औषधाची योजना झाली पाहिजे. दिरंगाई वर टाकतां उपयोगी नाहीं. औषध देण्याचा प्रकार व खाण्यापिण्याचे नियम या विषयींचा छापील कागद गोळयाबरोबर दिला जातो.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० २१ माहे जुलै सन १८७८ इसवी. अंक २९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| टांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामेडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.

### ग्रंथोत्तेजक मंडळीकडून.

"महादजी शिंदे यांचें चरित्र."

या विषयावर मराठी ग्रंथ, छापून सुमार २०० अष्टपत्री पृष्ठें होतील येवढा, नवीन तयार करून खालीं सही करणार याजकडे रवाना करावा. मंडळी मार्फत तपासनीस नेमले जातील. त्यांचे मतें जो ग्रंथ उत्तम ठरेल त्या ग्रंथाचे कर्त्यास बक्षीस रुपये ३०० चें दिलें जाईल.

सदर्हू ग्रंथांत सन १७६१ पासून सन १७८४ पावेतों घडलेल्या मराठ्यांचे इतिहासांतील ज्या ज्या गोष्टींशीं महादजी शिंदे यांचा संबंध असेल त्या सर्व गोष्टींचें यथार्थ व मनोवेधक वर्णन असावें.

हल्लीं या विषयाचे संबंधानें जे इंग्रजी ग्रंथ तयार झाले आहेत त्यांवरूनच केवळ ग्रंथ तयार करूं नये परंतु ज्या बखरींवरून किंवा सरकारी अथवा खासगी खलित्यांवरून अगर कागद पत्रांवरून सदर्हू ग्रंथ तयार झाले आहेत, ते व दुसरे खलितें व कागदपत्र अस्सल पाहून हा ग्रंथ तयार करावा. पृष्ठाचे खालीं टिपा देऊन सदर्हू कागद पत्राचे आधार दाखवावे. इंग्रजींत लार्ड मेकाले साहेबांनीं 'वारन् हेस्टिंग्स व 'क्लाइव्ह' यांचीं जशीं चरित्रें लिहिलीं आहेत त्या धर्तीवर हा ग्रंथ तयार व्हावा. महादजी शिंदे, हरिपंत फडके, नाना फडणीस, परशराम भाऊ, मल्हारराव व तुकोजी होळकर, अहिल्याबाई, मोरोबादादा फडणीस, सखाराम बापू वगैरे मुत्सद्दी व सरदार मंडळीचे गुणावगुणांचें विशेष स्वरूप लक्षांत येऊन मूर्तिमंत त्यांची कृति वाचणारांचे अंतःकरणांत उभी रहावी अशी ग्रंथाची पद्धत ठेवावी. मोगल बादशहा, रजपूत संस्थानिक व इंग्रज सरकार यांजे संबंधानें व पुण्यांतील नाना फडनवीस वगैरे मंडळीचे संबंधानें झालेले ..चकारणांची हकीकत होईल तितकी खुलासेवार निःपक्षपातानें स्पष्ट करावी. महादजी शिंदे यांनीं जे सैन्याचे कंपू तयार केले त्यांजविषयींही इत्थंभूत माहिती ग्रंथांत असावी.

ग्रंथ ता. १९ मार्च १८७९ चे आंत खालीं सही करणार यांजकडे येऊन पोंहोचला पाहिजे.

ग्रंथाबरोबर ग्रंथ करणारानें आपलें नाव कागदावर लिहून तो कागद लिफापांत घालून लिफाप बंद करून पाठवावें, त्यावर कांहीं खूण करावी, व तीच खूण आपले ग्रंथाचे आरंभींही करावी.

जो ग्रंथ पसंत होईल त्यावरील खुणेचें लिफाप उघडलें जाईल; इतर लिफाप व ग्रंथ ज्याचे त्यांस सांगितले पत्त्यावर परत केले जातील.

म. ग्रंथोत्तेजक मंडळीचें हेड आफिस पुणें, ता. ७।७।७८ } रावजी प्रभाकर भावे सेक्रेटरी ग्रंथोत्तेजक मंडळी पुणें.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

### वाहत्या गंगेंत हात धुवून घ्यावा.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. मनुष्यास कोणत्याही प्रकारचा अधिकार किंवा मोठेपणा प्राप्त झाला ह्मणजे मग पूर्वीची स्थिति कशी होती हें त्याचे लक्षांत रहात नाहीं, एवढेंच नाहीं; तर त्या स्थितींत तो होता कीं नव्हता हें ही त्यास बरोबर स्मरत नाहीं, याचें कारण काय असेल त्याचा विचार सध्यां नको, परंतु इतकें खरें आहे कीं चालत्या काळांत मनुष्य कांहीं विचार पहात नाहीं. जे दीर्घविचारी आहेत तेच मात्र सदोदित कोणत्याही स्थितींत, मग ती अनकूळ किंवा प्रातिकूळ असली तरी समाधानवृत्तीनें वागून परोपकाराकडे सर्वकाळ सारखें लक्ष देत असतात व तेणेंकरून त्यांचे हातून चांगलीं कामें घडून कित्येक गरीब व अनाथ यांचें कल्याण होत असतें.

चालत्या काळांत मनुष्य कांहीं विचार करून परमार्थाकडे यत्किंचित् जरी लक्ष पुरवील तरी त्याचे हातून सहज परोपकार होण्यासारखे असतात. आणि अशा वेळेस ह्या मनुष्यानें या गोष्टीकडे कांहींच लक्ष दिलें नाहीं तरी त्याचे मनाचा समज उलट न झाला तरी पुरे; परंतु या कलियुगामुळें ह्मणा किंवा कालांतरामुळें ह्मणा बहुतकरून तशा मनुष्याचा परोपकाराच्या उलट समज होतो. व त्यापासून बहुत अनर्थ व दुःखें प्राप्त होतात याचा विचार फार कठीण आहे. आतां असा उलट समज कां होतो व परमार्थाकडे लक्ष कां लागत नाहीं याचें कारण सर्व व्यापक असें सांगतां येत नाहीं तरी स्वार्थबुद्धि हें एक असून तिच्या अंगभूत नाना प्रकारचे मनांतील तरंग हे कारणभूत होतात. हे तरंग जों जों मनुष्याचा मोठेपणा वाढत जातो तों तों हेही त्याच्या प्रमाणें किंवा तितक्या पटीनें वाढत जात असतील असें वाटतें. तो मनुष्य मग सर्वथैव त्यांच्या अमलांत सर्वकाळ असतो असें नाहीं मनुष्य मात्र या मनोवृत्तीचे स्वाधीन आहेतच परंतु सदरील प्रकारच्या मनुष्यावर त्यांचा विशेष अमल असतो. याचें कारण उघड आहे त्या मनोवृत्तीच्या झपाट्यांतून कोणताही मनुष्य वाचला नाहीं परंतु पृथ्वीवर जे सत्पुरुष होऊन गेले किंवा हल्लीं कांहीं यशवंतराव महाराजासारखे जे आहेत ते मात्र त्या तडाक्यांत सांपडले नाहींत व त्यामुळेंच त्यांहीं इह पर लोकीं अक्षय सुखाचा मार्ग प्राप्त करून घेतला यांत संशय नाहीं. आतां या मनतरंगाच्या अमलांतून हेच कसे सुटले ह्मणाल तर त्यास कारण त्यांची धैर्यशीलबुद्धी आणि ती सतत निश्चलता हें होय. ईश्वरानें मोठेपणा द्यावा तर अशाच पुरुषांस द्यावा. परंतु चलतीच्या सद्दींत कधीं कधीं अन्यायकृत्य जरी केलें तरी तें चलतीमुळें चांगलें दिसतें इतकेंच नाहीं तर जनलोकसुद्धां तें चांगलें असें ह्मणतात. बरें किंवा वाईट ह्मणण्यास सर्वांसच अधिकार नाहीं, ज्यांच्या मध्यें सत्य, विद्वत्ता योग्यता, आणि सारासार विचार हे गुण आहेत त्यांत्यांसच तो अधिकार आहे असे गुणिजन या भूतळीं फारच थोडे. बाकीं होसीहो आणि नासी ना असें ह्मणणारे असंख्य आहेत. आतां चलतीमध्यें स्वार्थ तरी पूर्ण साधेल ही आशा नको. कारण स्वार्थ एकाच प्रकारचे आहेत असें नाहीं. मनामध्यें जे तरंग उत्पन्न होत जातात त्याप्रमाणें वर्तन करून मनाचे समाधान करून घेऊ ह्मटलें तर कधींही व्हावयाचें नाहीं. मन कसें आहे हें सर्वांस माहितच आहे परंतु त्याच्याविषयीं जे विचार करितात त्यांची विचार करितां करितां विचारशक्ती कुंठित होते परंतु ते अनिवार्य आहे. एक सत्पुरुषच त्यास आपले दास करून ठेवितात. कसीही चलती असली किंवा पृथ्वीपति जरी असला तरी त्याचें मन कधीं पूर्ण होणार नाहीं. मग स्वार्थ पूर्ण होत नाहीं व परमार्थही घडून येत नाहीं. मग असा मनुष्य प्राणी ऐलथडीचा ना पैलथडीचा असा होऊन मध्येंच वाहून जातो, याकरितां जर मोठेपणा प्राप्त झाला तर त्यानें वाहत्या गंगेंत हात धुवून घ्यावा या ह्मणीप्रमाणें कांहीं करावें हें उचित आहे.

मुक्काम मांजरखेड आपला सेवक

क्ष.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

बहु दिवस तो राहे
तेथें स्वकार्यपरें मनें ।
परम चतुर मानी
त्याला उदेपुर सेवनें ॥
सुखद वसती झाली
ती त्या चमूपति नायका
भुलति बघुनी ज्यातें
योद्धे, सुधी आणि नायका॥१५१॥

आर्या.

जयपुरपतिला कन्या,
अर्पावी हें उदेपुराधीशा ॥
तेव्हां न रूचे ऐशी
शिंद्याची भीति त्या सकल देशा॥१५२॥
विफलमनोरथ सेना,
जयपुरपतिची तयाकडे गेली ॥
ऐशीच भीमशिंगें
शिंद्याची अवकृपा लया नेली ॥१५३॥
मग भीमशिंग शिंदे
एकामेकांस भेटले दोघे ॥
ती भेट एकलिंग-
प्रासादीं होय पौरपुण्यौघें ॥ १५४ ॥

श्लोक.

आशाभंगज खेद तापावे जगत्-
शिंगा पुढीं पाकसा,
त्याहूनी अपमान तो अधिक त्या
जाळी वनाग्नी तसा ॥
या तापा शमवी न तोय अवघें,
हा मानशिंगाचिया,
अश्रूनींच शमेल, या जयपुर-
स्वामी धरी निश्चया ॥ १५५ ॥
जो जोतपूराधिप दुःखहेतू ।
त्याच्या वधाचाचि धरोनि हेतू ॥
उभारिले त्या स्वबळांत केतू ।
जे होत युद्धोदधि मानि सेतु ॥ १५६ ॥
हे वृत्त चार कथिती कृतकृत्य व्हाया ।
तो मानशिंगाहि उठे तवके लढाया ॥
झाली प्रवृत्त रणसाधनसाधनाला ।
दोन्ही बळें न इतर प्रियतन्मनाला १५७

आर्या.

जो जोतपूर जयपुर
राज्यांची ख्यात होय हो सीमा ॥

तेथें पर्वतशीर-
स्थळीं झाल्या आयका रणा भीमा १५८
तेथें येउनि दोही
सेनानीं तळ दिला रणोत्सुकता ॥
त्यांची पाहुनि सर्वचि
झाला तो देश भीतिनें मुकता ॥१५९॥
जळतृणधान्यविराजित
समान देशीं विशाल शिबिरें तीं ॥
केलीं, जेथें नाहीं
कंटक, पाषाण, दुष्ट कृमि, रेती ॥१६०॥
शिबिरांच्या भोंताले
खंदक केले अगाध जलपूर्ण ॥
सेनापतिनीं रक्षक
ठायीं ठायीं नियोजिले तूर्ण ॥ १६१॥

श्लोक.

अन्नपान परिपूर्ण ज्यांमधी ।
न्यून नाहिं तृण काष्ठही कधीं ॥
राहुट्या रुचिर शुभ्र कनाथा ।
जिंकिती निजगुणें उडुनाथा ॥ १६२ ॥
ऐशीं तीं शिबिरें प्रसन्न दिसतीं
वीरव्रताची स्थिती ।
तेथें स्पष्ट असे गजाश्व सजुनी
नीराजनें अर्चिती ॥
सेनानायक चार वैरिचरितें
शोधूनिया सांगती ।
भूपा शिल्पिगणा विराम न मिळे
शिल्पें जरी भागतीं ॥ १६३ ॥
शिकल करिति कोणी प्रासखड्गादिकांची
निरखिति रथकार व्यंगता स्यंदनाची ॥
घाडिति नवनवास्त्रें युक्तिनें लोहकार
अणिकहि बहु होती साधनांचे प्रकार
॥ १६४ ॥
ज्यांची भूत भविष्य सत्य समजे
योगें ग्रहांच्या मती ।
ज्योतिःशास्त्रविचारदक्ष बुध ते
त्या त्या ग्रहा वेधिती ॥
शारीरज्ञ तसेचि वैद्य अवघ्या
शस्त्रौषधप्रक्रिया ।
ज्यांला वश्य, जपोनि तेहि करिती
शस्त्रौषधाची क्रिया ॥ १६५ ॥
कोठें गाड्या सहस्त्रावधि असति पट-
द्रव्य धान्यादिकांच्या
कोठें ताणोनि पालें स्थळ धरि बुणगे
घालमेली तयांच्या
होतीं नानाप्रकारें इतर तृण दही
दूध तेथें विकाया
येती, व्यापार त्यांचे सफल घडाति ते
नाहिं कांहींच वाया १६६

( पुढें चालू. )

---

**वऱ्हाडसमाचार**

मिति आषाढ वद्य ७ शके १८००

---

## धुळयास गवरनर साहेबांची स्वारी.

खानदेशचें मुख्य शहर धुळें, एथें मुंबईचे नामदार सर रिचर्ड टेंपल साहेब बहादूर गवरनर हे गेल्या शनवारच्या मागील शनवारीं गेले होते. धुळयास गवरनर साहेबांचें हें अवल इंग्रजांपासून पहिलेंच आगमन ह्मणून सरकारी अधिकाऱ्यांनीं व म्युनिसिप्यालिटीनें शहर मोठ्या थाट माटानें शृंगारलें होतें. मोठमोठाल्या कमानींचे शोभायमान दोन दरवाजे केले होते व जागोजाग चित्रविचित्र बाहुटे लाविले होते. गवरनर साहेब शुक्रवारीं संध्याकाळीं मुंबईहून निघून पाहाटे साडेतीन वाजतां चाळीसगावास आले. व तेथून ६॥ वाजतां सकाळीं टांग्यांत बसून निघाले ते १७ कोस धुळयास ११ वाजतां गेले. वाटेंत गिरणा नदी लागते ती हत्तीवर बसून उतरले. शहरा बाहेर बरेंच लांब कलेक्टर साहेब, जडज साहेब, असिस्टंट कलेक्टर इत्यादि सामोरे गेले होते. नंतर कलेक्टर साहेबांचे गाडींत बसून आग्रारोड व चाळीसगाव रोड यांचे मिलाफाचे ठिकाणीं कमानीचा दरवाजा होता तेथपर्यंत आले; मग नेटिव अधिकारी व गावांतील सभ्य लोक यांच्या तेथें भेटी झाल्या व हळू हळू थाटानें स्वारी शहरांतून गेली. चावडीजवळ दुसरा दरवाजा केला होता तो ओलांडतांच पलटणीची सलामी झाली व भिल पलटणीवरील नेटिव आफिसर यांच्या भेटी झाल्या. नंतर उतरावयाचे ठिकाणीं जाऊन सायंकाळीं साहेब बहादूर पुन्हा बाहेर निघाले ते सिविल आस्पितळ; तुरुंग व कचेऱ्या पाहून धुळभेटीचे समारंभाकरितां शाळागृहांत गेले. तेथें सर्व युरोपियन व सुमार १००० नेटिव गृहस्थ यांच्या भेटी झाल्या. त्याचप्रसंगीं म्युनिसिप्यालिटीनें व मुलांनीं त्यांस अड्रेस दिला व त्याचें त्यांनीं समर्पक उत्तर दिलें.

---

## पुराण ग्रंथ शिमग्या सारखे नीच नाहींत.

( Communicated. )

राव बहादूर गोपाळराव हरी देशमुख यानीं कांहीं दिवसांपूर्वीं नाशकास ग्रंथ या विषयावर एक सुरस व्याख्यान दिलें त्यांत पुराणांची व्यर्थ निंदा अतिशय केली तें पाहून ठाण्याच्या अरुणोदय पत्रानें व मुंबईच्या सुबोधपत्रिकेनें आणि आह्मी त्यांचे पुराण ग्रंथाविषयींचें तें मत अशुद्ध आहे असे आपले अभिप्राय दिले. ते सर्वांचे पहाण्यांत आलेच असतील. त्यावरून आह्मी समजत होतों कीं, राव बहादूर या गोष्टीचा विच्यार करून असलीं धर्मनिंदक मतें सोडून देतील परंतु तसें न होतां तेथील ह्मणजे नाशीकच्याच वर्तमानपत्रांत रा. ब. च्या मताचें मंडण व त्यांच्या व्याख्यानावर दोष देणारांवर टीका (लिहून आलेल्या मजकुराखालीं) लांबलचक आली आहे. व अकोल्यास तें नाशीकवृत्त वर्तमानपत्र कधीं येत नसतां सदहू मजकूर ज्यांत आहे तें मुद्दाम आलेलें आहे ह्मणून तें वाचून पहातां पुन्हा हा विषय एकवार हातीं घेण्याची जरूर वाटली- त्याप्रमाणें दोन ओळी लिहिल्या आहेत.

नाशीकवृत्तांतील लिहिणारे सर्वांस राव ब० चा वास्तवीक हेतू सांगून पुराण ग्रंथ खरोखरच निंद्य आहेत व रा. ब. चें ह्मणणें अगदीं रास्त आहे असें ह्मणतात. एवढेंच नव्हें, तर आणखी ते शंकराचार्य, बुध्ध, तुकाराम, येशुख्रिस्त, महमद पैगंबर, लूथर, विकलीफ, ग्यालिलियो यांच्या माळिकेंत रा. बहादूरांनां नेऊन बसवितात; परंतु त्याजबद्दल आह्माला कांहीं विशेष वाटत नाहीं. कारण असल्या पोकळ स्तावक लेखावरून रा. बहादूरांच्या मनांवर कांहीं परिणाम होईल असें नाहीं; तरी उगीच एकाद्यास असें चढवून लोकांत त्याचे हसें करोंवे हें त्या लिहिणारांस बरें नव्हतें. वास्तवीक कोणी शंकराचार्य बौद्ध, तुकाराम, याप्रमाणें धर्म व भक्तिमार्ग यांची संस्थापना करणारा नवीन ईश्वराचा लाल उत्पन्न होईल तर त्यास त्या सदात्म्यांच्या पंक्तीस बसविल्यास हरकत काय?

वर्तमानपत्रांतून असल्या धर्म विषयाची चर्चा चालविणें जरा अप्रयोजक आहे व ती चालवावी अशी आमची इच्छा नव्हती परंतु कोणी दुराभिमानानें आपली जी चुकी तोच गुण असें समजत असेल तर त्याची नीट समजूत घालून द्यावी हें सर्वांचें कर्तव्यकर्म आहे असें समजून पुन्हा एकवार हा विषय आह्मी हातीं घेतला आहे. या पुढें आतां वादविवाद चालविणार नाहीं. आमचा हेतू कोणत्याही व्यक्तीस अनुलक्षुन टीका करण्याचा नाहीं; व त्यांत विशेषेंकरून राव बहादूर देशमुख यांविषयीं तर नाहीच. त्यांच्या ठायीं आमची मोठी पूज्यबुद्धि आहे. तसेंच त्यांचे उद्योग, श्रम, माहिती, व्याख्यानें, निबंध, पुस्तकें, व त्या संबंधाचा त्यांचा खर्च, देशहितार्थ झटणे व तत्संबंधी काळजी इत्यादिं प्रकार तारीफ करण्या जोगे आहेत व ते बहुतेक आह्मी पसंत करितों व दुसऱ्या थोर व विद्वान लोकांनीं त्यांचा नमुना घ्यावा असें ह्मणतों. हल्लींचा वाद फक्त पुराण ग्रंथाविषयीं प्रसिद्ध झालेलें विच्यार कितपत खरे व उपयोगी आहेत ते लोकांपुढें ठेवण्याचा आहे.

नाशीकवृत्तांतील लेख असा आहे कीं "राव बहादुरानीं प्रतिपादन केलें हें केवळ नास्तिकपणास अथवा आपल्या धर्माच्या भ्रष्टतेस कारण आहे असें बिलकूल कोणी न समजतां सत्यतेनें शोधून काढलेलीं पुराणांतील निंद्य तत्वें लोकांनां त्याज्य आहेत एवढेंच सांगण्याचा रा. ब. चा उद्देश होता." बरें. ठीक आहे. आतां तत्व ह्मणजे काय? सर्व ग्रंथांतील बऱ्या वाईट गोष्टी एकत्र करून जें ग्रंथांचें रूप होईल तें "तत्व" ह्मणावें, किंवा कांहीं ग्रंथांतून हजारों चांगल्या गोष्टी वर खालीं असतां त्या सोडून देऊन त्यांत एकादि दुसरी वाईट असेल तेवढीच वेंचून घेऊन तिची विदारणा केली ह्मणजे तिला तत्व ह्मणावें, हें नाशीकच्या निबंधकारांनीं आह्मांस स्पष्ट सांगितलें असतें तर बरें झालें असतें. चंद्र, इंद्र, कृष्ण, सांब इत्यादि कांचीं जीं कृत्यें राव बहादूरानीं दाखविलीं तीं त्या पुराण ग्रंथाचीं तत्वें आहेत, किंवा त्या त्या व्यक्तीच्या इतिहासांत त्यांची वागणूक दाखविली पाहिजे, ती वागणूक आहे, हें आह्मी विच्यारितों. व आह्मी असें ह्मणतों कीं, हीं कृत्यें त्या त्या व्यक्तीच्या खऱ्या इतिहासांत अवश्य पाहिजेत व त्यांपासून पुढील लोकांवर कांहीं परिणाम व्हावयाचा होता तर तो नीतीचा व्हावयाचा होता व तसा झाला आहे. एकाद्याचें वाईट वर्तन व त्यापासून त्याला भोगावीं लागलेलीं संकटें जर वर्णन केलीं तर ऐकणारांस नीतीच कळेल यांत काडी मात्र संशय नाहीं.

"रावबहादुरानीं भागवताचा उल्लेख केला ही गोष्ट जरी खरी, तर त्यांनीं इतर चांगल्या गोष्टी ज्या सुबोधपत्रिका चांगल्या ह्मणते त्या त्याज्य आहेत असें ह्मटलें नाहीं. तेव्हां अर्थात त्या ग्राह्य आहेत असें समजावयाचें व यावरून पत्रिकेनें हा विचार करावयाचा कीं रावबहादुरानीं उच्चारिलेल्या पुराणांतील निंद्य कथा शिवाय पुराणांतील भक्तिमार्गाचें प्रतिपादन करणाऱ्या इतर गोष्टी त्यांस मान्यच आहेत. परंतु दीर्घ तर्क काढून त्या त्यास अमान्य आहेत अथवा त्यांची ते निंदा करितात हें तत्व सुबोधपत्रिकेनें कोठून काढलें असेल तें कळे." असें नाशिकवृत्ताचा लिहिणारा ह्मणत आहे. आतां पुराणांत अतिशयोक्ती नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं. अतिशयोक्ति आहे व ती दुर्लक्ष करण्याजोगी आहे तथापि इंद्र, चंद्र, ब्रह्मदेव, शंकर इत्यादिकांचीं जीं कृत्यें पुराणात दाखविलीं गेलीं हीं खोटीं आहेत असें रावबहादुर ह्मणतात कीं काय? व खोटीं ह्मणत असल्यास तीं पुराणांत घालण्याचा त्यांचा उद्देश काय? तसेंच तीं कृत्यें खरीं असल्यास त्यांपासून लोकांचे मनावर त्या त्या देवतेविषयीं अश्रध्धा उत्पन्न झाली कीं काय? निदान अनीतिपर परिणाम तरी झाला कीं काय? हें पाहिलें पाहिजे, आमचें मत आहे कीं हीं कृत्यें खोटीं नसावींत, खोटीं असतीं तर पुराणांत आलीं नसतीं; कारण पुराणांचा हेतू धर्म व ईश्वर यांच्या ठिकाणीं लोकांची भक्ति अधिक बसावी असा होता. व ह्या कृत्यापासून पुढें परिणाम धर्मसंबंधानें तरी निदान कांहीं वाईट झाला नाहीं. ज्यांनीं पुराण वाचलें व हीं कृत्यें ऐकिलीं त्यांनीं पुराण ग्रंथ नदींत बुडवून त्या त्या देवतेस धोंडे मारले नाहींत. किंवा पुराणांत इंद्रानें चंद्रानें अनीतीपर वर्तन केलें ह्मणुन त्या त्याप्रमाणें करण्यास आपणास प्रवृत्त करून घेतलें नाहीं.

नाशिकवृत्ताचें ह्मणणें "रावबहादुर पुराणांतील सर्वच गोष्टी निंद्य आहेत असें प्रतिपादन करीत नाहींत. ज्या चांगल्या त्या ग्राह्यच कारितात ह्मणून त्यांची ते निंदा करितात हें पत्रिकेचें लिहिणें अप्रमाण" आतां ह्या ठिकाणीं आह्मी आपले पदरचे शद्ब कांहीं न घालतां व्याख्यान सारांशांतीलच रावबहादुरांचे शद्ब घेतो. "पुढें पुढें जशीं पुराणें उत्पन्न झालीं तसें लोकांत अनेक प्रकारचें अज्ञान शिरलें" "इतर सर्व ग्रंथ आणि हे अज्ञानजनक पुराण ग्रंथ सर्व क्रमानें मांडले तर ह्यांची मांडणी आपणा हिंदू लोकांचे सणा सारखी होईल असें आमचे मत आहे" "आणि शेवटीं शिमग्याच्या सणावर पुराण ग्रंथांची

योनना करू" "तद्वत् या पुराणांनीं एकही देवतेस छळल्यावाचून × × ठेविलें नाहीं." "ह्यावरून पुराणांस लवमात्र तरी धर्माभिमान आहे काय? " "सारांशानें पाहिलें तर आह्मास अनेक उपयुक्त ग्रंथ आपल्या पूर्वजांनीं करून ठेविले आहेत परंतु त्यांत धर्म संबंधानें आह्मास निर्लज्य व निरभिमान असें या पुराणांनीं केलें. व सर्वत्र शिमगा माजविला" "आह्मास आमच्या ग्रंथांवरून मोठा अभिमान आहे परंतु पुराणापर्यंत आलों ह्मणजे सर्व ग्रंथांची घाण केलेली पाहून फार वाईट वाटतें." "तद्वत् ह्या पुराणांनीं जो आमच्या धर्मांत व्यामोह उत्पन्न करून सर्वांस भ्रांत व धर्मच्युत केलें आहे हा काळ लवकरच जाऊन आपण आपल्या खऱ्या वैदिक धर्मावर येऊ ही पूर्ण आशा आहे."

ह्या सर्व वाक्यांवरून वाचकांनींच आतां विचार करावा. रावबहादुर सर्व पुराण ग्रंथ वाईट ह्मणतात किंवा नाहीं ? सर्व पुराण ग्रंथांचें मंथन करून "तत्व" तितकें दाखवितात काय? आणि अज्ञ लोकांस शंकराचार्य, तुकाराम, येशुख्रिस्त, महमद पैगंबर याप्रमाणें हे कांहीं सद्बोध करितात कीं काय?

रावबहादुर जर सर्व पुराण ग्रंथांतील तत्व काढून लोकांस दाखविते तर आह्मी फार खुष झालों असतों. व तसें त्यांनीं केलें नाहीं ह्मणून फार दिलगीर आहोंत. व वेदोक्त धर्म आतां स्थापन होणार तो हल्लींच्या धर्मापरता कांहीं निराळा नाहीं. व पुराणांनीं जे वर्णिलें त्यास वेद आणि शास्त्रें यांचें कांहींच संमत नाहीं असें नाहीं. वेदांत गुह्य आहे तें स्पष्ट व्हावें ह्मणून शास्त्रें झालीं व त्यांच्या मागून पुराणें झालीं, मिळून सर्वांचा हेतु हाच कीं धर्म व ईश्वर याजवर लोकांची श्रद्धा रहावी. परंतु आपणांतीलच थोर थोर ह्मणविणाऱ्या लोकांकडूनच जर आपल्या ग्रंथाचा असा विचका होऊं लागला तर इतर धर्मांचे लोक उघडच टाळ्या पिटतील व त्यांत हसावयास मार्ग होईल, या एवढ्याच चर्चेनें आपल्या ज्ञानोदय ख्रिस्ती बंधूनीं कसें लिहिलें आहे तें सर्वांचे पहाण्यांत आलेंच असेल. ते ह्मणतात पुराणें फार वाईट ठरतातच, व वेदांत वाईट गोष्टी आहेत असें सुबोध पत्रिकाकर्ते ह्मणतात तेव्हां हिंदूला निर्दोष व ईश्वरप्रणित धर्म पुस्तक नाहीं याजकरितां सर्वांनीं ख्रिस्ती धर्माचा अंगिकार करावा ! वा: ! ही तुमच्या बंधूनीं तापल्या तव्यावर चटदिशी भाकर भाजून घेतली, पाहिलीतना ? असो. ते हिंदूच ख्रिस्ती झालेले आहेत. व त्यांच्या पत्राचा बाणा ख्रिस्ती धर्मप्रसार हा आहे तेव्हां त्यास काय हसावयाचें आहे?इतकेंच कीं, यावरून आपल्या लोकांनीं मात्र पुढें जपावें अशी त्यांस विनंती करून हा लेख पुरा करितों.

## वऱ्हाड.

सगळ्या आठवड्यांत पर्जन्य विशेष पडला नाहीं पण काल त्यानें खूप बहार केली. दिवसा दोन सरी मोठाल्या पडून सारी रात्र भीज पाऊस पडला.

हवा स्वच्छ आहे. पण महामारीचें पाऊल मागें ह्मणण्या सारखें नाहीं. तुरळक तुरळक उपद्रव चालू आहे. डा० इव्हस स्यानिटरी कमिशनरचें मत शहरांत स्वच्छता चांगली आहे, व रोगाला जोर नाहीं असें आहे. आमचे चारिटेबल डिस्पेन्सरी वरील डाक्टर मि० अप्पा कलु यांचेंही मत आहे कीं, महामारीचा आजार फार लवकर संपेल. तथास्तु.

मृग, आर्द्रा, व पुनर्वसु या तीन नक्षत्रांचे तीनच पाऊस पडतील व खरिपाचे पिकास ते उपयोगी होणार नाहींत अशा अर्थाचें भाविष्य फत्तेखेलड्याचे चीफ कानस्टेबल रा. रा. लोचन सुकूल यांनीं सांगितलें होतें तें खोटें झालें व ५।४ पाऊस त्या नक्षत्रांचे चांगले पडले अशा अर्थाचीं कित्येक ठिकाणाहून आह्मांस पत्रें आलीं आहेत. खरेंच, आह्मांस ही वाटतें कीं, लोकांस उगीच काळजींत पाडण्या जोगें असलें भाविष्य आमचे चीफ साहेब न सांगते तर बरें होतें. तें खरें ठरलें नाहीं ही फार उत्तम गोष्ट झाली; व खरें ठरतें तर साऱ्या देशास दुःख व काळजी, तेव्हां असले ठोकताळे काय कामाच? खरें भाविष्य एक ईश्वर जाणतो. बाकी सर्व कल्पना, अनुमान, व भ्रम आहेत.

देऊळगावचे राजे पानाशिंग हे औरंगाबादेस या महिन्याचे ६ वे तारखेस मरण पावले असें वर्तमान आलें आहे..यांचे वय २२ वर्षांचें होतें.यांच्या राणी साहेब कोलापुरास आहेत.

क्या. बुलक साहेब यांची येथील डिपुटी कमिशनरच्या जागेवर नेमणूक झाल्या प्रमाणें ते ता. १९ रोजीं एथें आले, आतां मि. फ्यारर साहेब वाशिमास जातील.

माजी डिपुटी कमिशनर मेनसाहेब यांचें सामानाचा कालरोजीं लिलाव झाला.

मि. हेर साहेब असिस्टंट कमिशनर यांस अकोलें म्युनिसिप्यालिटीचे व्हाइस प्रेसिडेंट नेमिलें.

रा. रा. सी. भिमराव उमरावतीचे अल्याची अकोल्यास येणार असें वर्तमान आहे. हे हुशार व साधे असून मोठे लोकप्रिय आहेत.

मि. डेविस साहेब व मि. अबदुलहक्क सा. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस असिस्टंट कमिशनर नेमणार असें प्रमोदसिंधूंत लिहिलें आहे.

शिगावचे आरोपी खंडू कडताजी पाटील व त्याचे तिघे बंधु यांवर जीव घेण्याच्या इरादाचा खटला पुष्कळ दिवस चालू होता त्याचा मि० डेविस साहेब एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं निकाल करून १८वे तारखेस सर्व आरोपीस निर्दोषी ठरवून सोडून दिलें. या कामीं फिर्यादी मारुती धाराजी हे होते. एप्रिल महिन्यांत खामगावचे तहशिलदाराकडे या मुकद्दम्याची चौकशी सुरूं होऊन सुमार १५ दिवस चालली व त्यांनीं पि० कोड कलम १४८ प्रमाणें अपराध समजून डिपुटी कमिशनर साहेबाकडे मुकदमा ट्रान्सफर केला. व त्यांनीं मि० डेविस साहेब यांकडे तो सोंपविला त्याप्रमाणें त्यांनीं त्यांत पूर्ण मन घालून तारीख १२ जूनपासून तारीख १८ जुलै पावेतों चवकशी केली. या मुकद्दम्यांत फिर्यादीतर्फे रा. रा. सदाशिव नारायण, आपाजी शामराव, वामन लक्ष्मण व केशव घनःशाम हे वकील होते. अड्रेस सदाशिव नारायण यांनीं दिला. आरोपि तर्फे वकील रा. रा. देवराव विनायक होते त्यांनीं एक सारा दिवस डिफेन्स दिला. मुकद्दमा फार भानगडीचा व महत्वाचा होता. कधीं कधीं चार चार तास काम चालून एक किंवा दोन जबान्या होत असत. डेविस साहेबांनीं अव्वल पासून अखेर पावेतों मोठ्या गंभिरतेनें व निष्पक्षपातानें काम चालविलें व कोणत्याही पक्षाची तक्रार ऐकिल्या वाचून त्यांनीं ठेविली नाहीं. पक्षकारास न्याय मिळावा ह्मणून मोठ्या उत्सुकतेनें त्यांनीं मेहेनत घेतली. पांच दिवस तर ते फैसल लिहित होते. फैसल फार मोठा व उत्तम लिहिला आहे. साक्षीदारांच्या बोलण्याचें वजन व पुराव्याची जुळणी त्यांनीं मोठ्या चातुर्यानें केली आहे. याबद्दल आह्मी त्यांची तारिफ करितों. सवड झाल्यास हा फैसल पुढील आठवड्यांत आह्मी साग्र लिहू.

मि० कालिन्स साहेब उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटीचे माजी सेक्रेटरी व पेनशनर डाक्टर यांस हैदराबादेस दिवाण साहेबानीं पलटणींत सरजनची जागा दिली असें समजतें-

रेलवे स्टेशनावरून चोऱ्या फार होतात व त्या पोलिसाकडून धरल्या जात नाहींत ह्मणून वऱ्हाड पोलिसाचें बदनाम होत आहे असें टाइम्समध्यें कोणी लिहिलें आहे.

सिविल खात्यांतील युरोपियन आफिसरानीं आपले आपले जिल्ह्यांतील नेटिव लोकांकडून कर्ज घेऊं नये असा हिंदुस्थान सरकारचा ठराव असतां तो वऱ्हाडांत रद्दीसारखा झाला आहे असें वाटतें. व याविषयीं मनाईची लवकर कांहीं तजवीज झाली नाहीं, तर वऱ्हाडांत सरकारच्या न्यायावर लोकांचा भरंवसा रहाणार नाहीं ह्मणजे भाडभिडेनें न्यायास व्यत्यय येऊं लागेल. कोणी गृहस्थानीं अशा बाबदींत कमिशनर साहेबाकडे कांहीं परिस्फुटता केली आहे, असें टाइम्स पत्रांत लिहिलें आहे.

## वर्तमानसार.

नेटिव फौजा— हिंदुस्थानांत ज्यांजवळ १०००० किंवा त्याहून अधिक फौज आहे असे ८ संस्थानीक आहेत. त्यांत पहिला नंबर निजाम सरकारकारचा आहे. त्यांजवळ ७००० घोडेस्वार, ३७००० पायदळ , व ७२५ तोफा आहेत. निजामाचे खालीं काश्मीर, उदेपुर, बडोदे, जयपुर, ग्वालेर, जोतपुर आणि भरतपुर हीं उतरत्या क्रमानें बाकीची संस्थानें आहेत. ज्यांस फौजा बाळगण्याचा आधिकार आहे असे एकंदर राजे सत्तर ऐशी आहेत, त्यांत शेवटचा नंबर पंजाबांतील बशरच्या राजाचा आहे. त्याजवळ सर्व प्रकारचे मिळून १६० लोक आहेत. यांत आमच्या निजाम सरकारचें वैभव हिंदुस्थानांतील इतर सर्व राजां पेक्षां श्रेष्ठ आहे हें पाहून आह्मास संतोष होतो.

घोंड मनमाड रेलवे— नोवेंबर महिन्याचे पाहिले तारखेपासून पुन्हा चालू होणार. व तोपर्यंत लाडिस चालू रहाणार. मैलास एक आणा घेऊन लारिसांतून पाहिजे त्यास बसऊन न्यावें असा एका पारशानें मक्ता घेतला आहे व कालपासून लारिस सुरू होणार होतें.

पंढरपुरची आषाढी यात्रा— या वर्षी गुदस्त सालाप्रमाणें गर्दी नव्हती. दर्शनाचा बंदोबस्त चांगला होता. मात्र रात्री ९ वाजल्या पुढें दरवाजे बंद ठेवीत स्त्रिया व पुरुष यांनां वेगवेगळ्या दरवाज्यानें सोडीत. शहर सफाईचा व पोलिसाचा बंदोबस्त चांगला होता. महामारीनें दोन अडीचशें मनुष्यें मेलीं, त्यामुळें जत्रा लवकर माघारी उलटली. जत्रेचा मक्ता ११५०० रुपयांचा होता. हाच गुदस्त सालीं १८००० रुपयाचा होता.

ह्मैसूरच्या माजी नबाबांच्या घराण्यांतील कांहीं पुरुष सरकारानें कलकत्त्यास ठेवले आहेत. यांपैकीं प्रिन्स वालामर यानें आपल्या आजीसी दगलबाजी करून ११,५०० रुपये उपटल्याचा त्याच्यावर खटला कलकत्ता एथें सुरू आहे.

ह्मैसूर प्रांतांत इतके टोळ झाले आहेत कीं, त्यांच्या ओझ्यानें मोठमोठे वृक्ष मोडून पडले.

तारीख ८ जून रोजीं रात्रीं सूर्या एवढा तारा तुटलेला आस्त्रालिआंत दिसला. हा ज्या दिशेनें खालीं आला त्या दिशेंत आति धूर झाला होता. तारा पडतांना भूमीकंपासारखा आवाज झाला.

स्पेन देशचे बादशाह व इंग्लंडच्या राणी साहेब इताली देश पहाण्याकरितां थोड्या दिवसांत जाणार ह्मणून कळतें.

ह्मैसूरपासून बंगलोरपर्यंत रेलवेचा रस्ता बांधण्याकरितां दहा लक्ष रुपये कर्जाऊ द्यावे ह्मणून ह्मैसूरचे चीफ कमिशनर यांनीं हिंदुस्थान सरकारास विचारलें आहे. ने. ओ.

सन १८७६।७७ सालच्या बडोदें संस्थानच्या रिपोर्टावर अभिप्राय देतांना स्टेट सेक्रेटरींनीं बडोद्याच्या कारभारांत सुधारणा झाल्याविषयीं आपलें समाधान प्रदर्शित करून दिवाण साहेबांची तारीफ केली आहे.

चालू सालाचीं भावी शुभाशुभ चिन्हें— श्रावण शुद्ध १५ स ग्रहण आहे. खरीप वृष्टि थोडथोडी व्हावयाची. ता. २३ जुलैस पश्चिमेस बुधोदय होणार, त्या दिवसा

पासून पर्जन्य पडावा असें आहे. तारीख २९ जुलैत मंगळ मघानक्षत्रीं येणार, तेव्हांही पाऊस कांहीं ठिकाणीं होईल. ता. ४ आगष्टास मघानक्षत्रीं शुक्र येणार, तेव्हां पर्जन्य सर्व देशभर होईल. रबीचा पाऊस पुष्कळ होईल. पिकेंही उत्तम प्रकारें येतील. टोळाचा उपद्रव एक महिना उपरांत नाश पावेल. भाद्रपदपर्यंत महर्घता राहून व्यापाराची गर्दी होईल. त्यापुढें स्वस्ताई होईल. हें भविष्य कागद जवळ ठेऊन दाखले पटतात किंवा कसें हें पाहण्याविषयीं भविष्यवादी वाचकांस सुचवितात.

## होणारा दिवाणी कायदा व रयत.

सन १८७७ च्या १० व्या नव्या दिवाणी कायद्यांत फेरफार करून नवा कायदा करण्याची बाटाघाट चालू असून त्याचा एक मसूदा हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलापुढें आला आहे व त्याचा लवकरच कायदा बनेल असें दिसतें. हा नवा मसुदा मुंबई सरकारच्या ग्याझिटांत प्रसिद्ध झाला पण तो आह्मी अद्याप वाचला नाहीं, तरीं त्याविषयींची जी कांहीं माहिती इंग्रजी पत्रांतून बाहेर आली तिजवरून त्या कायद्यांत एक विलक्षण प्रकारचा फेरफार होणार आहे असें समजतें. दक्षिण महाराष्ट्र देशांतील रयतेनें थोड्या दिवसांपूर्वीं जो सावकारांविरुध्ध दंगा केला त्या दंग्यापासून रयतेची स्थिति सुधारण्याकडे बऱ्याच राज्यकर्त्यांचें लक्ष्य लागलें आहे असें दिसतें, पण त्याकरतां त्यांचे जे उद्योग चालू आहेत ते अयोग्य प्रकारचे आहेत असें दिसतें. सावकारांच्या जरब व्याजाच्या कारणानें दक्षिणेंतील रयत अगदीं कंगाल झाली आहे असें समजून रयतेची सावकारांच्या हातून सुटका करण्याच्या हेतूनें हल्लींच्या चालू दिवाणी कायद्यांत, कर्जाबद्दल शेतकीचीं हत्यारें, गुरें, वगैरे जप्त होऊं नयेत व त्यांची विक्री होऊं नये असा ठराव केला व आतां जो नवा दिवाणी कायदा होत आहे त्यांत सावकाराच्या कर्जाकरितां रयतेची जमीन विकली जाऊं नये असा ठराव होणार आहे. सावकारांच्या कारणानें रयत फार दरिद्री झाली अशी बऱ्याच लोकांची समजूत झालेली असल्यामुळें त्यांस हे वरील ठराव प्रथमदर्शनीं पसंत वाटतील, पण रयतेची स्थिति व या ठरावांचा परिणाम यांचा विचार केला ह्मणजे हे ठराव रयतेच्या हिताचे नसून उलट रयतेचें फारच मोठें नुकसान करणारे आहेत असें ठरतें. शेती करणाऱ्या रयतेची स्थिति आज इतकी निकृष्ट झाली आहे कीं, शेतकी करणाऱ्या ५०० घरांची तपासणी केली तर ज्यास कर्ज नाहीं अशीं शेकडा ५ घरें निघण्याचीही पंचाईत पडेल इतकेंच नव्हे तर ज्यांच्या घरांत पांच पैसे शिलक असून शेतकीचीं हत्यारें, गुरेंढोरें, जमीन व लहानसें खोपट या वाचून दुसरी कांहीं मिळकत आहे अशीं शेकडा दोन घरें तरी निघतील किंवा नाहीं याची शंकाच आहे.

आज रयतेची अशी स्थिती असतां सरकारची सर्व जमीन लागवड होऊन सालोसाल सरकारचा सर्व धारा वसूल होत आहे याचें सर्व कारण सावकार आहेत. कोणत्याही एका गावांतून सावकारांस आज अर्जी हाकून लावेंल तर एकदम जमीनीची लागवड होणें बंद होऊन सरकारचा धारा वसूल होणे बंद पडेल. आज रयतेची अशी स्थिती असतां त्यांच्या जवळ असणारीं शेतकीचीं हत्यारें व जमीन ही मिळकत कर्जाकरितां विकली जाणारा नाहीं असा ठराव करून तो अमलांत आणल्यास त्याचा परिणाम काय होईल हें पाहूं लागल्यास शेतकऱ्यांस कोणी पांच रुपयेही देणार नाहीं असा या ठरावाचा परिणाम होईल असेंच ह्मणावें लागतें. आमचे शेतकरी कर्जबाजारी असावेत अशी आमची मुळींच इच्छा नाहीं व ते सुखी होण्याकरितां सावकारांस हद्दपार करून हाकून लावणेंही चांगलें असें आमचें मत आहे, पण तें व्हावें कसें व हल्लींच्या स्थितींत सावकारांवाचून शेतकऱ्यांचें चालावें कसें हें समजत नाहीं. राज्यरीतीकडे पाहिलें ह्मणजे जमीनीचें जें पीक आणखी चार महिन्यांनीं तयार व्हावयाचें त्या पिकाबद्दलचा सरकारी धारा सरकार आज रयतेपाशीं मागणार आणि तो देण्यास रयतेकडुन क्षणभर विलंब लागल्यास सरकार आपल्या धाऱ्याची रकम नोटिस, फी, दंड, वगैरेच्या कारणानें वाढविणार आणि लागलीच रयतेची जंगम मिळकत विकून जमीन विकण्यासही तयार होणार. रयतेच्या घरांत पांच पैसे शिलक नसतां तिला आपली जमीन लागवड करण्याचा खर्च सोसून पीक हातीं येण्यापूर्वीं सरकारचा धाराही देणें भाग होणार आणि इकडे कोणी सावकार पांच रुपये कर्ज देण्यासही धजत नाहीं तव्हां यावरून रयतेची वाट काय होणार व त्यांच्या जमीनी त्यांच्या हातांत कशा रहाणार याचा विचार कायदेकारांनीं करणें जरूर आहे. आह्मास वाटतें कीं, नवीन होणाऱ्या कायद्यांतील वरील ठराव अमलांत आल्यावर पांच चार वर्षांच्या आंतच सर्व शेतजमीन शेतकरी लोकांच्या हातांतून निघून श्रीमान व सधन लोकांच्या हातांत जाईल व आमचे हल्लींचे सर्व शेतकरी केवळ पोटाकरितां खपणारे अगर डाहाणू उंबरगावाकडील दुबळ्या लोकांप्रभाणें गुलामांच्या स्थितींत येऊन पोचतील. आमच्या राज्य कर्त्यांस व कायदे करणाऱ्यांस आपल्या रयतेची ही स्थिती पसंत होईल काय!

अ. द.

## नोटिसा

उमदाबाई मर्द हुसेनखा चवकीदार मौजे पिंपळगाव ( खंडेबाचें ) परगणे पिंजर तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडुन नोटिस देण्यांत येतें कीं आमचे रुपये तुह्माकडे आज मित्तीपर्यंत व्याजासुद्धां दहा रुपये येणें आहेत ते रुपये तुह्मांस पुष्कळ वेळा मागितले तुह्मी देतों देतों ह्मणतां पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत रुपये आणून द्यावे न दिल्यास फिर्याद करून रुपये घेऊ तेणेंकरून कोर्ट खर्च ही तुह्मावर बसेल कळावें. तारीख ५ जुलै १८७८ इसवी.

( सही ) सुंदरलाल बिजेलाल मारवाडी
पाटखेडा तालुके अकोलें
दस्तुर खुद.

---

नोटिस.

सोनी मर्द गणू पाडव तेलीण कसबे दानापुर प्रगणे अडगाव तालुके अकोट हल्लीं वस्ती मौजे वाडी अदमपुर तालुके अकोट इला गणू वल्लद उकर्डा तेली पाडव वस्ती कसबे दानापुर प्रगणे अडगाव तालुके अकोट याजकडुन नोटिस देण्यांत येतें कीं तूं माझी लग्नाची बायको असून तूं तारीख २८ माहे जून सन १८७८ इसवीची नोटिस दिली ती तारीख १० जुलै सन १८७८ इसवी रोजीं पोहचली तींत तूं लिहितेस कीं, लग्नास बारा वर्षें झालीं पण मजला घरीं नेऊन चांगलें वागविलें नाहीं- त्यास माझे बाप व भाऊ यांजध्यें रहाण्याची तुझी खुशी नसून तुझे ह्मणण्यावर निराळें घर बांधून तूं व मी रहात होतों. तेथेंही तुझें लक्ष बरोबर लागलें नसून आपले आई बापाचे एथें मजला सोडून गेलीस. नंतर मीही तुझेपासी येऊन दोन वर्षें घालविलीं. तुजला माझे पोटच्या दोन मुली आहेत त्यां एक च्यार वर्षांची असून तूं मुलीचें लग्न जातिहीन तेल्यापासून २०० रुपये घेऊन केलेस तेव्हां त्या मुलीचा मी अधिकारी नव्हतों कीं काय? व तूं १५० रुपये खर्च केल्याचें लिहितेस. तूं व मी मजुरी करून पोट भरीत होतों मी कांहीं तुजला हाकून दिलें नाहीं. हल्लीं तूं मजला फारकती मागतेस तर मी फारकती देत नाहीं. तूंच मुलीचा पैसा घेऊन खाल्ला याजबद्दलची तजवीज पुढें करीन. तूं माझे जवळ येऊन रहावेंस कळावें. तारीख १४ माहे जुलै सन १८७८ इसवी.

( सही ) गणु वल्लद उकर्डा तेली
पाडव कसबे दानापुर
निशाणी खुद्द हातची.

---

नोटिस.

रा. रा. साहेबराम आलमचंद मारवाडी साहु दुकान बाळापुर यासी खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची आमची माटरगाव एथें दुकानांत शीर संवत् १९१८ पासून संवत १९३२ पर्यंत होती ती दुकानदारी संवत १९३२ मिती वैशाख शुद्ध १५ मेस तुमची आमची आपसांत सफाई होऊन दुकानदारी आमचे कडेस लागली. तुमचे देणें रुपये ५६४१ पांच हजार साहाशे एकेचाळीस निघाले त्याचा दस्तएवज संवत् १९३३ सालीं तुह्मास करून दिला. दरसाल रुपये ७०५= सातशें पांच रुपये दोन आणे ठराव करून दस्तैवज करून दिला. दुकानदारीच्या फारकती तुह्मी आह्मास व आह्मी तुह्मास आठ आठ रुपयांचे कागदावर करून दिल्या घेतल्या. जी फारकती तुह्मी आह्मास दुकानदारीबद्दल करून दिली होती ती साल गुदस्त संवत १९३३ च्या सालीं आह्मी खामगावचे कोर्टांत पट्टीचे माफीकारितां तहशिलदाराकडे घेऊन गेलों होतों तेथून दाखवून परत घेऊन आलों तो दस्तैवज ह्मणजे फारकती आह्मी खलत्यांत ठेविली होती. तो खलता तुमचा दुकानदार पीकदान यांणें माटरगाव एथून आह्मापासून मागून नेला. त्यास त्या फारकतीचा दस्तैवज त्या खलत्यांत राहिला असुन तो खलता फारकतीसह पीकदान यांनें रस्त्यानें गमावला. त्यांत फारकतीही गेली. त्याबद्दल खामगाव तहशिल कोर्टांत तारीख २० माहे दिसेंबर सन १८७८ इसवी रोजीं आह्मी अर्जी दिली होती. त्या दिवसापासून आह्मी तुह्मास दुसरी फारकती करून देण्याविषयीं ह्मणतों आणि स्टांपाचे रुपये ८ आठ खर्चावयासही आह्मी तयार आहों. त्यास तुह्मी लिहून देतो लिहून देतो असें ह्मणतां पण लिहून देत नाहीं. हल्लीं सालची सालबंदी आह्माकडेस आली आहे त्यास तुह्मी आह्मास फारकतीचा दस्तैवज लिहून द्यावा आणि तुमची सालाची रकम घेऊन जावी. फारकती लिहुन न देतां त्या सालबंदीच रकमेकरितां आह्मावर तुह्मी फिर्याद कराल तर आह्मी त्या रकमेच्या व्याजाचे व कोर्ट खर्चांच देनाल होणार नाहीं. ही नोटिस पावल्यापसून १५ दिवसांचे आंत आह्मांस फारकती लिहून द्यावी व सालबंदीचे रुपये घेऊन जावें. तुमच्या सालबंदीचे रुपये आह्मी खामगावास श्रीराम शालिग्राम यांचे दुकानावर ठेविले आहेत तुह्मास कळावें. तारीख १६ माहे जुलै सन १८७८ इसवी.

[ सही ] शिवलाल हिंमतराम
मारवाडी दुकान माटर गाव
दस्तूर खुद.

नोटिस.

गंगादीन धनीदीन कलाल जामीनदार टिकाराम धनीदीन कलाल वारशीटाकळीकर हल्लीं मक्तेदार सेलू बाजारची तालुके वाशीम व रहाते घर पातूर शेखबाबू तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडुन समन्स देण्यांत येतें कीं, आमची रकम तुह्माकडून घेणें आहे रुपये ७००० सात हजार शिवाय व्याज घेणें आहे तर करार गुजरून गेला. परंतु कांहीं निकाल केला नाहीं. हल्लीं या नोटिसीनें समन्स देण्यांत आली आहे कीं, आज मितीपासून पंध्रा रोजांत अदाई करावी. नाहीं तर रीतीप्रमाणे तजवीज केली जाईल. कळावें. मिती आषाढ शुद्ध ९ तारीख ८ माहे जुलै सन १८७८ इसवी.

( सही ) मानकचंद नानकराम व
मोहोनलाल मानकचंदजी
साहु दस्तुर खुद

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० २८ माहे जुलै सन १८७८ इसवी. अंक ३०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षांचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामिडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्प्रियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमच छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्ध आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## महामारीवर रामबाण औषध.

या औषधाच्या गोळ्या सातारकर प्रसिद्ध वैद्य रा. ग. रामचंद्र भास्कर गोरे यांणीं केलेल्या एका मित्राकडून आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्याकडे विकण्यास आलेल्या आहेत. या एक रुपयास १६ दिल्या जातात. या मोठ्या गुणाकारी आहेत असें समजतें. यांच्या योगानें जुलाब व वांती एकदम बंद न होतां आजाऱ्याची प्रकृती दुरुस्त होत जाती व पोट फुगत नाहीं. इतकें मात्र केलें पाहिजे कीं या रोगाचा झटका समजल्या बरोबर औषधाची योजना झाली पाहिजे. दिरंगाईवर टाकतां उपयोगी नाहीं. औषध देण्याचा प्रकार व खाण्यापिण्याचे नियम या विषयींचा छापील कागद गोळ्या बरोबर दिला जातो.

व. स. चे मालक.

## पत्रव्यवहार

या सदरीखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

हिंगणघाटाहून— वि० वि० एथें मागें हवेचा उपद्रव झाला होता पण आलीकडे एक महिना अगदी बंद झाला असून पुन्हा त्याचा उद्भव पुष्कळ झाला आहे. नाशिककर बिच्याऱ्या एका हरदासाचें तर अगदी घर बसलें. नाशिकाकडे महर्घता फार झाली ह्मणून हरदास बुवा सर्व खटल्यानिशीं एथें आले होते. प्रथम त्यांच्या भावाच्या बायकोस उपद्रव झाला. नंतर दुसरे दिवशीं त्याची दुसरी भावजय विधवा होती ती आजारी झाली व तिच्या मागून भावाची मुलगी होती तिला गाठलें. पाठीमागून खुद्द हरदास बुवा आजारी होऊन दोन प्रहरांत स्वर्गस्थ झाले. व त्यांचे तिसरे दिवशीं मुलगी मरण पावली. व मुलाची बायको आजारी झाली आणि तिसरे प्रहरीं पार झाली. तेव्हां हिची व्यवस्था लावून मुलगा व मुलगी इलिचपुरास आपले मातुलाकडे जाण्याकरितां एथून निघालीं तों उमरावतीस त्या मुलास उपद्रव होऊन तो मरण पावला. व त्याच दिवशीं एथें बुवांच्या भावाची बायको मेली. अशी त्यांची ६ दिवसांत ६ मनुष्यें मेलीं. तबलजीसही उपद्रव झाला होता परंतु तो मुलाबाळांस भेटण्याकरितां येथून जिवंत निघून गेला. हा असा ईश्वराचा अतिक्षोभ झाल्याचा प्रकार एथें कोणाचेही पहाण्यांत नसून त्याविषयीं सर्व गाव हळहळ करित आहे. एथील तहशिलदार रा. रा. अण्णाजी केशव व आणखी कांहीं मंडळी यांणीं परोपकार बुद्धीनें खटपट करून शंभर सवाशें रुपये जमवून त्याच्या भावास दिले व त्यास उमरावतीस पाठविलें. कळावें हे विनंती.

एक स्नेही.

रा. रा. वऱ्हाडसमारकर्ते यांस:—

चांदोळाहून वि. वि. इकडील हवावगैरे तूर्त बरी आहे. दोनच्यार पाऊस फार चांगले झाले. पेरणी सुरू आहे. बाजार भावांत कांहीं अंतर नाहीं. आसपास महामारीचा उपद्रव तुरळक चालू आहे. नवीन आलेले तहशिलदार मि. सादत मीर खा तालुक्यांत गवती लिलावाकरितां फिरत आहेत. यांची काम करण्याची शैली आणि ताब्यांतील रयतेशीं वागण्याची खुबी वर्णनीय आहे. कर्नल निंबार्ड सा. माजी कमिशनर यांणीं इकडून जातांनां मुंबईहुन यांस एक सर्टिफिकीट पाठविलें होतें. व त्यांत यांची फार तारीफ केली होती तें आपले वाचकांस ठाऊक असेल. शाळांकडे यांचें फार लक्ष्य आहे. तेणेंकरून या तालुक्यांतील शाळा आतां लवकरच सुधारतील असें वाटतें. येथील शाळेची परीक्षा घेऊन हे फार संतुष्ट झाले. आणि मुलें वाढवून देण्याकरितां मुद्दाम आह्मी एक शिपाई कांहीं दिवसपर्यंत येथें ठेवू असें ह्मणाले.

गांवांतील स्वच्छता पाहून खुष झाले. प्रत्येक गावीं एक इन्स्पेक्शन बूक असावें अशी नवीन तजवीज हे लवकरच अमलांत अणणार आहेत. असें असणें फार चांगलें असें ~~लोकास वाटते.~~—

इकडे पुणेंकराचें एक नाटक आलें आहे. बुलढाणें, चिखली वगैरे ठिकाणीं यांचे बरेच खेळ झाले. येथें त्यांचे पांच खेळ झाले. नाटककार मंडळी आपल्या कसबांत बरीच निपूण दिसते. हल्लीं ते मासरूळ धाड वगैरेकडे फिरण्यास गेले आहेत. कळावें ता. २० माहे जुलै १८७८

आपला एक

फिरस्ता.

रा. रा. वऱ्हाडसमारकर्ते यांस:—

धुळ्याहून:— वि. वि. येथील नदीस गेले आठवड्यांत मोठा पूर आला होता तेणेंकरून तिगस्तांप्रमाणें जलप्रलय होतो कीं काय? अशी बहुतांस धास्ती पडली होती पण परमेश्वरानें कृपा केली.

नामदार गवरनर साहेबांची स्वारी एथें आली होती तो समारंभ मोठाच झाला. रा. रा. शामराव बापुसाहेब गरूड यांनीं त्यांनां पानसुपारी केली. हायस्कुलांतील मुलांनीं गवरनर साहेबांस अड्रेस दिला. तो त्यांनीं संतोषपूर्वक ग्रहण करून मुलांस बुद्धिवाद केला कीं तुह्मी इंग्लिश अभ्यास करितां ही गोष्ट चांगली आहे परंतु त्यामुळें तुह्मी स्वभाषा व संस्कृत भाषा यांजकडे दुर्लक्ष्य करू नये. मुलांच्या कसरती गवरनर साहेबांनीं पाहिल्या व मोठें आश्चर्यजनक समाधान मानिलें.

धुळ्याला रेलवेची सोय नाहीं तिजबद्दल गवरनर साहेबानीं आपलें भाषणांत असें सांगितलें कीं चाळीसगावाहून धुळ्यापर्यंत रेलवे करण्याविषयीं एक व भुसावळे जवळून तापीच्या बाजूनें सुरतेपर्यंत रेलवे करण्याविषयीं एक अशीं दोन प्रकरणें सरकारापुढें आलीं आहेत त्यांचा विच्यार होऊन काय ठरेल तें लवकरच बाहेर पडेल. हे शद्ब खुद्द गवरनर साहेबांच्या तोंडचे असल्यावरून धुळ्याला रेलवेचा लाभ लवकरच होईल असें खास वाटतें.

हे गवरनर सा. एवढे मोठे कामदार असून यांच्या मेहेनतीची व प्रसंगीं कष्ट भोगण्याची पराकाष्ठा आहे. पुणें जिल्ह्यांतील यांची एक गोष्ट अशी ऐकिली आहे कीं, नदीच्या उगमाजवळ हे जंगल पहाण्यास गेले होते तेथें पावसानें यांस खूप झोडिलें. तें इतकें कीं मुक्कामावर जाण्याची सोय नाहीं. मग हे एका खेड्यावर गेले. व सर्व भिजलेल्या वस्त्रांनिशी यांनीं जमीनीवर निजून सारी रात्र काढिली. गवरनरी सारख्या मोठ्या पदवीच्या मनुष्यानें असे कष्ट सोसिल्याची ही गोष्ट अपूर्व असावी.

आतां पत्रविस्तार झाला ह्मणून पुरें करितों. कळावें हे विनंती.

एक

वाचणारा.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

कोठें वाणी दुकानें पसरुनि बसती
वाणसौदा कराया ।
येती तेथें जन स्वव्यय न गणिति ते
इछिलें वस्तु घ्याया ॥
कोठें कोठें समानव्यसनजन अफू
भांग वाटोनि घेती ।
कोणी गांजा सुरा वा पिउनि रिपुयशः-
प्राशना सज्ज होती ॥ १६७ ॥

आर्या.

कोणी धरुनि रण मनीं
गर्जति बहु उग्र सिंह नादानीं
जे वीर हृष्ट पुष्ट
स्वशिराच्याहि न भिती रणीं दानीं १६८
कोणी अश्व गजातें
माजविती गुणज्ञ ते मसाल्यानीं ॥
होउनि उद्दाम जसे
न शिणाति मोठ्याहि ते कसाल्यानीं १६९

श्लोक.

हस्ती गर्जति मेघसे दशदिशा
नादें तया कोंदती ।
शुंडेनें दशनास वेष्टुनि दुजे
अभ्राकडे पाहती ॥
घेईनात रतीब माहुत जरी
दीनापरी प्रार्थिती ।
दर्पानें न गणोनि अन्य पशुला
सिंव्हासि जे स्पर्धिती ॥ १७० ॥
वारंवार मदांत अश्व हिसती
अत्युच्च दीर्घ स्वरें ।
त्याचा चेतवितो दणाण समरा
जो भी तयाही खरें ॥
टापा हाणुनि नाचती पदगुणा
तोडू पहाती परी ।
स्वाराला वश होत ते गुरुजना
सच्छिष्य जे त्यांपरी ॥ १७१ ॥
कोठें उष्ट्रसहस्त्र तें खुटविलें
जिव्हा बचेळीमधें ।
घेवोनी सुर काढिंत बडबडा
नाहीं कधीं जे सुधें ॥
यद्गुंधिस सारवानचि सदा
साहे न शक्ती परा
वेगें जे पवनासही हटवितें
वाहोनि मोठ्या भरा ॥१७२॥

आर्या.

दोहीं तळांत ऐसा
निर्भर युद्धीं प्रकाशतां राजे ॥
वदति "छद्या रण" तेव्हां
रण वाद्यांचा ध्वनी नभीं गाजे ॥१७३ ॥

कृष्णाकुमारीकेच्या

अभिलषि हा प्रसंग हलयाचा ॥
जाणुनि मध्यस्थ असे
व्यर्थीच ह्मणती प्रयत्न सलयाचा ॥ १७४
एका मिषाभिलाचें
बहुवार जगांत मातले द्वेष ॥
सामादि या न शमविति
ह्मणुनी युद्धाचि उपाय हा शेष ॥ १७५ ॥

( पुढें चालू. )

---

## जाहिरात.

तमाम लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं खालीं लिहिल्याप्रमाणें मेहेतरपट्टी व सविण्याचा अकोले म्युनिसिप्यालिटीचा इरादा आहे.

१ ज्याचें उत्पन्न सालीना ५०० रुपये अगर ५०० रुपयांहून ज्यास्त असेल त्यास दर इसमास दरमहा ८= प्रमाणें

२ ज्याचें उत्पन्न सालीना ९७ रुपयापासून ५०० पर्यंत असेल त्याजपासून दर इसमास ८– प्रमाणें.

३ बाकी सर्वत्र लोकांपासून दर इसमास दरमहा ८८६ प्रमाणें.

बारा वर्षांहून कमी वयाचीं मुलें व खरोखर भीक मागणारे हे शिवाय करून अकोले एथील सर्व रहिवाशापासून हा कर घेतला जाईल. ज्याची ह्या करास हरकत असेल त्यांनीं ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आंत कमेटीचे प्रेसिडेट साहेब यांजकडे लेखीं अर्ज करावा, कळावें तारीख २६ माहे जुलै सन १८७८ इसवी.

R. D. Hare
व्हाइस प्रेसिडेंट म्युनिसिपाल कामिटी अकोला.

---

## जाहिरात.

तमाम लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं खालीं लिहिल्याप्रमाणें टोल, ह्मणजे म्युनिसिप्यालिटीचे हद्दांत येणाऱ्या किंवा हद्दींतून बाहेर जाणाऱ्या गाड्यांवर कर बसविण्याचा अकोले म्युनिसिप्यालिटीचा इरादा आहे.

१ मालानें भरलेल्या दरगाडीस दर दिवसास ८१ प्रमाणें.

२ रिकाम्या अथवा स्वारीच्या प्रत्येक गाडीस दर रोज ८८६ प्रमाणें.

सदर्हू बद्दल ज्याची हरकत असेल त्यानीं नोटिस प्रसिद्ध झाल्या दिवसापासून १५ दिवसांचे आंत कामिटीचे प्रेसिडेन्ट साहेब याजकडेस लेखी अर्ज करावा कळावें. तारीख २६ जुलै सन १८७८ इसवी

R. D. Hare
व्हाइस प्रेसिडेन्ट म्युनिसिप्यालिटी अकोलें.

---

वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ वद्य १४ शके १८००

## गीतातत्व.

आमचे प्रसिद्ध विद्वान, नेटिवांतील विशेष महत्पदाधिकारी, परम उद्योगी, अनेक ग्रंथकार, वक्‍त्याख्यानकार, ज्यांनीं लोकहितवादी या नामविशेषानें लहान मोठे पांच पंचवीस ग्रंथ केले आहेत त्यांनींच "गीतातत्व" या नावाचा एक नवीन ग्रंथ केला व तो नासिकवृत्त छापखान्यांत नुकताच छापिला त्याची एक प्रत त्यांनीं आह्मांस पाठविली ती अत्यादर पूर्वक स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितों.

हा ग्रंथ नवा नाहीं, ह्मणजे लोकहितवादीचा स्वकृत नाहीं, भारतांत श्री कृष्णानीं अर्जुनास हा गीता सांगितलेली आहे. तिचे अठरा अध्याय आहेत. त्यांचेच निराळ्या रीतीनें या ग्रंथकारांनीं हें फेरिस्त लाविलें आहे व अठरा अध्याया प्रमाणेंयाचीं अठरा प्रकरणें केलीं आहेत. तीं येणेंप्रमाणें:—

१ ईश्वर एकच आहे त्यावाचून मोक्ष देणारा कोणी नाहीं. २ ईश्वराची सत्ता. ३ ईश्वराची सर्व जीवांवर समदृष्टी. ४ जीव आणि ईश्वर वेगवेगळाले आहेत. ५ ईश्वराची प्राप्ती होण्याचा मार्ग. ६ ऐहिक दुःखनिवारण आणि परमार्थकल्याण हीं ईश्वर भक्तीनें होतात. ७ मरण कालीं ईश्वराचें स्मरण केलें असतां फळ. ८ लोकांनीं साधारण आणि वर्णभेदानें कसें वागावें तें. ९ चांगला व वाईट स्वभाव. आणि स्वाभाविक गुणभेदानें मनुष्यें वेगळालीं वर्तणूक करितात तें. १० विच्यारी मनुष्याचीं लक्षणें. ११ संन्यासाचें तात्पर्य व संन्यासी आणि संसारि यांची गती एकच आहे याविषयीं. १२ कोणीही मनुष्य अगदीं कर्मत्याग करूं शकत नाहीं तें. १३ कर्मकांडी लोकांस अल्प सुख आणि ईश्वर भक्तांस मोक्ष होतो तें. १४ ज्ञानाची अति श्रेष्ठता. १५ अळशाची निंदा. १६ आत्मा देहाबरोबर मरत नाहीं तें. १७ ईश्वर सदाचारी भक्तांचें रक्षण करितो तें. आणि १८ वें प्रकरण ईश्वर पाप्यास दंड करितो तें.

हें गीतातत्व संस्कृत मूळ श्लोकांनीं एके बाजूस व त्याचेच वामनी समश्लोकी भाषांतराचे प्राकृत श्लोक दुसरे बाजूस लिहिले आहेत. व याची मोठी प्रस्तावना आहे तीही संस्कृतांत व मराठींत लिहिलेली आहे. या अठरा प्रकरणांचे निवडक श्लोक १२१ आहेत. हे गीतेच्या ७०० श्लोकांचें सार आहे. व हें लोकहितवादीनीं स्वबुद्धीनें निवडिलें आहे व तें फार उत्तम असून सर्व धर्मजिज्ञासु लोकांस समजून घेण्यास अतिउपयोगी असें आहे. गीतेवर आजपावेतों अनेकांच्या अनेक टीका झाल्या; परंतु याप्रमाणें त्यांतील विषयांची निवड आजपावेतों कोणी केली नव्हती, ती या ग्रंथकारांनीं केली ती पाहून आह्मास संतोष होतो.

गीतेंत सातशें श्लोक आहेत त्यांत धृतराष्ट्राचा १, दुर्योधनाचे ९, संजयाचे ३२, अर्जुनाचे ८४, व श्रीकृष्ण भगवान यांचे ५७४ आहेत. गीतेंत आर्यधर्माचें सार आहे. व हा ग्रंथ केवळ मतदर्शकच नसल्या मुळें शैव वैष्णव इत्यादि सर्वांस मान्य आहे. यांत सांख्य ह्मणजे त्यागप्रतिपादन व योग ह्मणजे कर्मप्रतिपादन यांची संगती अशी घातली आहे कीं कर्में ईश्वरार्पण केलीं असतां तीं ईश्वरनिष्ठाप्राबल्यानें बाधक होत नसून मोक्ष देणारीं होतात. हें गीतेचें तात्पर्य आहे. याविषयीं प्रस्तावनेंत ग्रंथकारनीं सविस्तर सांगून शेवटास लिहिलें आहे कीं, ईश्वराच्या आज्ञा काय आहेत व कोठें आहेत असें जे विच्यारितात त्यांसाठीं हीं आह्मी गीतेंतून निवड केली आहे व या अठरा सिद्धांतांचें ज्यास ज्ञान होईल तो सदाचारी, भक्त, व ज्ञानी होईल. व यांत धर्मसंबंधी ज्ञान पूर्ण आहे.

आमचेंही मत याप्रमाणेंच आहे व सर्व धर्मजिज्ञासु लोकांनीं या पुस्तकाचा संग्रह करावा अशी आमची इच्छा आहे. व लोकहितवादीनीं हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे द्वारें लोकांवर मोठा उपकार केला असें आह्मी मानितों. या ग्रंथाची चतुष्पत्री साच्याची ५९ पृष्ठें असून किंमत ८४ च्यार आणे आहे.

---

## प्रेस आक्ट होते वेळचीं अधिकाऱ्यांचीं मतें.

**रेसिडेंट साहेब.**— एतद्देशीय वर्तमान पत्रें बंधनांत ठेवण्याकरितां चांगली तजवीज सरकारानें योजिली पाहिजे ह्याविषयीं माझ्या मतें अगदीं संशय नाहीं. तरी तजवीज काय करावी हें वादाचें स्थळ आहे. हें काम मोठ्या अडचणीचें व नाजूक आहे. ह्याचें कारण मुख्यत्वें हें कीं, आजपर्यंत सरकारानें ह्याविषयीं कांहीएक मनांत आणलें नाहीं. आणि एतद्देशीय वर्तमानपत्रें तर वर्षानुवर्ष अधिकाधिक बेताल होत चाललीं आहेत. एतद्देशीय लोकांनीं काढलेलीं इंग्रजी किंवा इंग्रजी आणि एतद्देशीय भाषेंतील वर्तमानपत्रें ह्यांत जो मजकूर येतो तो नुसता एतद्देशीय वर्तमान पत्रांतील मजकुराइतका जरी नाहीं तरी कांहींसा तितकाच दूषणार्ह असतो. ह्मणून ह्या पत्रांनांही योजिलेला कायदा पुढें लागूं करणें भाग पडेल. ही विषादाची गोष्ट आहे कीं, इंग्रजी वर्तमानपत्रकर्ते यांस ह्या बाबतींत कित्ता घालून देतात. कारण त्यांतून मधून मधून जे मजकूर येतात त्यांचें भाषांवर करून एतद्देशीय पत्रांत घातलें तर एतद्देशीय पत्रांतील मजकुरा इतकेच बहुतेक प्रसंगीं ते दोषार्ह होतील.

**कमिशनर साहेब**— मिनिटामध्यें ज्या तजविजी योजिल्या आहेत त्यांत आणखी एक योजना असावी असें माझें मत आहे. आणि हें थोडेसें चमत्कारिकसें वाटेल. तें हें कीं— सरकाराविरुद्ध लेख येऊं नयेत ह्मणून सरकाराला योजलेल्या कायद्यामुळें अधिकार मिळणार तेच एत्तद्देशीय राजांविरुद्ध लेख लिहिले असतां सरकारास असले पाहिजेत. ही माझी सूचना मुख्यत्वें इंग्रजी वर्तमानपत्रांच्या संबधानें आहे. आणि ती जर मान्य झाली तर एत्तद्देशीय वर्तमान पत्रांचे विरुद्ध जो कायदा होणार आहे त्यामुळें एत्तद्देशीय लोकांकरितां कायदा एक आणि इंग्रजी वर्तमानपत्रांनां एक असा जो लोकांचा समज होणारच आहे तो कमी होईल. मुख्य इंग्रजी वर्तमानपत्रांतून असे लेख दाखविण्याला फारशी पंचाइत पडणार नाहीं कीं, ज्यापासून माझ्या मतें एत्तद्देशीय वर्तमान पत्रांच्या अगदीं वाईट लेखांपासून आपल्या राज्याला धक्का बसण्याचा संभव आहे त्यापेक्षांही ह्या लेखांपासून धक्का बसण्याचा विशेष संभव आहे. एत्तद्देशीय संस्थानिक राजनिष्ठ नाहींत किंवा ब्रिटिश सरकारच्या हितार्थ त्यांच्या विरुद्ध सरकारानें कांहीं तजवीज केलीच पाहिजे अशा तऱ्हेचे लेख पाहून त्यांस वाईट वाटलें पाहिजे आणि वाटतेंच. इंग्रजी पत्रांतून चटकदार लेख असणें फारसें वाईट नाहीं परंतु शस्त्र उचलण्याची जी तीं मुभा घेतात तिजपासून माझ्या मतें मोठा खरोखर अपाय होण्यासारखा आहे. कायद्यानें जरी आपल्या कोर्टामध्यें नेटिव राजास वर्तमानपत्रांवर फिर्याद करण्याची मोकळीक मिळाली तरी ते तसे करतील असें वाटत नाहीं. ह्मणून ह्यांचा बचाव करण्याचें काम इंग्रज सरकारच्या आंगांवर पडतें. आणि तशांत सार्वभौम या नात्यानें राजभक्ति दाखविली पाहिजे, असें अक्षयीं ब्रिटिश सरकार ज्या अर्थी ह्मणतें त्याअर्थी तर हें काम त्यांनीं केलेंच पाहिजे. नेटिव पत्रें जर राहू देणें आहेत तर हरएक कायदेशीर रीतीचें उत्तेजन त्यांस दिलें पाहिजे, त्यांस राहू देणें आणि त्यांच्या विरुद्ध वागणें हें गुळपुळीतपणाचें लक्षण आहे. हिंदुस्थानांत डेलीटेलिग्राफ सारखीं पत्रें जर निघालीं तर त्यांच्या कर्त्यांपैकीं कांहींकांस सी. एस. आय. असा किताब दिला तर काय परिणाम होईल हें पहाण्याची माझी इच्छा आहे. आणि मी तर सरकारी कामगारांस असें सांगेन कीं ज्या मनुष्यांच्या अंगीं वर्तमानपत्रें चालविण्याची पुरी हिंमत आणि शक्ति आहे त्या मनुष्यास सरकारानें आपल्या हिताकरितां मान दिला पाहिजे. माझ्या अनुभवाची मी गोष्ट सांगतो कीं वर्तमानपत्रकर्त्यांवर थोडासा भरंवसा ठेवला ह्मणजे त्यांचें तोंड जसें बंद होतें तसें दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें होत नाहीं. हे सर्वांशीं वाईट नसतात, आणि माझी खात्री आहे कीं त्यांतून पुष्कळ लोकांच्या हिताच्या कळवळ्यानेंच हा धंदा करितात. ही सद्‍बुद्धी आहे तशी त्यांच्यांत असद्‍बुद्धीही असते ह्यांत संशय नाहीं. परंतु त्यांपासून चांगला जर उपयोग करून घ्यावयाचा आहे तर त्यांची योग्यता आपण राखली पाहिजे. आणि जोंपर्यंत खात्रीनें त्यांचे हेतू दुष्ट ठरले नाहींत तोंपर्यंत ते चांगले आहेत असें आपण मानलें पाहिजे. सारांश कायदा कडक असावा असें जरी माझें मत आहे तरी ज्यांस तो चालू करावयाचा त्यांशीं अधिक स्नेहभावानें आणि त्यांचा मान राखून आपण वागावें अशी माझी सूचना आहे. आतां एत्तद्देशीय वर्तमानपत्रकर्त्यांनां सरकारच्या विरुद्ध लिहिण्याला जितकी संधी सांपडते तितकी सापडणार नाहीं असा काळ पुढें येईल अशाविषयीं फारशी जरी नाहीं तरी थोडीशी आशा आपण धरूं. आमची सत्ता कशी वाढली हें लोक बरेच विसरतील असें आपण समजूं या, ज्या बा

जेवी दोन मुद्यावर सरकारच्या विरुद्ध एत्तद्देशीय पत्रांतून लेख येतात ह्मणजे एत्तद्देशीय लोकांनां मोठाल्या जागा न देणें आणि नेटिव आणि युरोपियन यांमध्यें भेद राखणें ह्या दोन मुद्यांच्या संबंधानें एत्तद्देशीय पत्रांच्या एडिटरांच्या लपाल्यांतून सुटण्याबद्दल सध्या सरकार बराच झटून यत्न करीत आहे.

**जुडिशियल कमिशनर** — सामान्य रीतीनें पाहिलें असतां मला असें वाटतें कीं, एतद्देशीय वर्तमानपत्रांस विनहरकत लिहिण्याची जी मुभा आहे ती मुभा बंद करण्याकरितां सरकार जे उपाय योजील ते बहुतेक नेटिव्ह लोकांस व शिकलेल्या व समजूतदार एतद्देशीय वर्तमानपत्राच्या मालकास मान्य पडतील. प्र. सिं.

## वऱ्हाड.

पर्जन्य या आठवड्यांत फार उत्तम पडला. चार पांच दिवस संततधार असल्या सारखी आहे. सूर्यदर्शन क्वचित् होतें. शुक्रवारीं मोठाले पाऊसही एक दोन पडले. साऱ्या वऱ्हाडांत पावसाविषयीं कोठें बोभाटा नाहीं, अशी परमेश्वरानें मोठी मौज करून दिली. शेतकरी लोक या आठवड्यांत कांहीं कामें चालत नाहींत ह्मणून बसून राहिले. आतां कांहीं दिवस उघाडी पडल्यास चांगलें होईल.

या आठवड्यांत शहरांतील रस्ते किती शोभायमान झाले आहेत व त्यांवरून चालणारांस कसें सौख्य होतें हें आमच्या म्युनिसिप्यालिटीतील मुख्य मुख्य अधिकारी प्रेसिडेंट, व्हाइस प्रेसिडेंट, इंजिनियर वगैरे येऊन पहातील तर लोकांचा कांहीं उपयोग झाल्यास होईल.

मि० हाबसन साहेब असिस्टंट पोलिस सुपरइंटेंडेंट सिकदराबादेहून आले त्यांस उमरावतीस नेमिलें. व सिकंदराबादेस साताऱ्याकडील मामलेदार खान बहादर सय्यद शमसुद्दीन अली यांस नेमिलें.

मेडिकल खात्यांत नवीन शिरणाऱ्या उमेदवारांची आगष्टचे पहिले तारखेस सिकंदराबादेस, अकोल्यास व उमरावतीस परीक्षा होणार आहे.

खामगावचे वकील रा. रा. बाळाजी नारायण यांनीं कोर्टाची बेअदबी केली. अशाबद्दल मि० दस्तुर बहिमनजी साहेब स्माल काज जडज यांनीं त्यांस ६० रुपये दंड केला असें ऐकतों.

एथील म्युनिसिप्यालिटीकडुन टोलफंड व भंगीपट्टी यांचे कराबद्दल जाहिराती प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या वाचून सर्व लोकांनीं त्याविषयीं विच्यार करावा. व पंध्रा दिवसांत त्यांत न्यूनाधिक होण्याविषयींचें आपलें ह्मणणें असेल तें कमिटीस कळवावें. पुढें कांहीं एकलें जाणार नाहीं. व कमिटींत घाटत असल्याप्रमाणें कर बसले जातील.

मि० फ्यारर साहेब वाशिमास डिपुटी कमिशनरचे जागेवर रुजू होण्याकरितां ता. २१ रोजीं रविवारीं गेले.

जुडिशियल कमिशनर साहेब मंगळवारीं उमरावतीस गेले होते तिकडून काल यवतमाळास न जातां एथें परत आले.

मि० बाकरअली पुसदचे थर्डक्लास अ‍ॅक्टिंग तहशिलदार यांस रेसिडेन्ट साहेबांनीं कायम केलें.

मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, महामारीनें दिवसानुदिवस अधिक प्रळय मांडिला आहे. इतका चांगला पाऊस पडला तरी तिचा उपद्रव कांहीं कमी नाहीं. अकोल्यास या आठवड्यांत प्रत्यहीं १०।१५ माणसें आजारी होत आहेत व त्यांतून निमी मरत आहेत. साऱ्या शहरांत काळजी व औदासिन्य उत्पन्न झालें आहे औषधोपाय पुष्कळ करितात व बरेही तेणेंकरून किल्येक होतात तरी शहरांतून रोगाचें निर्मूळ होत नाहीं. व बाहेर प्रांतांतूनही पुष्कळ बोभाट आहे. राजेश्वरीं अरिष्टशमनार्थ कांहीं धर्मकृत्य सुरू करण्याची तजवीज चालू आहे. सर्व लोक गायीसारखे होऊन गेले आहेत. कृपाळु परमेश्वर महामारीचाच प्रयोग महामारीवर आणून तिला ताडफाड आपले जवळ घेऊन जावो व सर्वांस निर्भय व दुःखविमुक्त करो ह्मणून आह्मी मनोभावें त्याची प्रार्थना करितों.

वाशीम [ मित्राकडून ] तारीख २५ माहे जुलै सन १८७८.

मेहेरबान बुलक साहेब बहादूर डे० कमिशनर यांची बदली अकोल्यास झाल्या कारणानें या ठिकाणीं बराच समारंभ झाला. प्रथम तारीख १७ व १८ रोजीं घोड्यांच्या व मनुष्यांच्या शर्यती होऊन उड्या मारणें वगैरे कसरतीचे खेळ झाले, व सर्वांत प्रत्येक कामीं जे उत्तम ठरले त्यांस इनामें दिलीं. नंतर साहेब बहादूर यांचे सन्मानार्थ मेहेरबान खान बहादूर ताजुद्दीन हुसेन साहेब असिस्टंट कमिशनर यांनीं उत्तम प्रकारचे भोज्य पदार्थ मुंबईहून आणवून बडा खाना दिला. ह्या प्रसंगीं मि० पोप साहेब एक्झिक्युटिव इंजिनियर मि० लॉब साहेब असिस्टंट इंजिनियर मि० प्रोव्होस्ट साहेब असिस्टंट कान्सरव्हेटर फारेस्ट, मि० क्रिश्चन साहेब पोलिस सुपरिंटेंडेंट, मि० डकवर्थ साहेब सिव्हिल सरजन हे असून आणखी एक दोन युरोपियन गृहस्थ इंगोलीहून आले होते. याप्रमाणें युरोपियन आफिसर्स व लेडीज यांचा बराच समाज जमला होता. खाना तारीख १८ मिनहूंचे रात्रीं होऊन साहेब बहादूर ता० रोजीं अकोल्याकडे रवाना झाले. यांचे जागीं मेहेरबान फ्यारर साहेब बहादूर येऊन त्यांनीं ता० २२ सोमवार रोजीं कामाचा च्यार्ज घेतला.

या ठिकाणीं पाऊस चांगला पडून पेरणीचीं कामें झपाट्यानें सुरू आहेत. शहरांत महामारीचा उपद्रव चालू आहे. गेल्या दोन महिन्यांत सर्व वाशीम जिल्ह्यांत एकंदर १४००० मनुष्यें ह्या उपद्रवानें आजारी होऊन ८००० वर यमसदनास गेलीं. अद्यापही ह्या रोगाचा उपशम झाला नाहीं. हें असें कोठपर्यंत चालणार हें कळत नाहीं. गतवर्षीं दक्षिण महाराष्ट्रप्रदेशीं दुष्काळ पडून व यंदा ह्या प्रांतीं महामारीचा उपद्रव होऊन मनुष्यांचा अनिर्वाच्य नाश झाला व होत आहे ह्यावरून हें हिंदुस्थान देशाचें नष्टचर्यच उद्भवलें असें समजलें पाहिजे.

## पटकीवर औषध देण्याची आणि उपाय करण्याची पद्धति.

१ प्रथम कापुराचें पाणी करावें. तें असें कीं, दहा शेर पाण्यांत दोन तोळे कापूर घालून तो कापूर पाण्यांत चोळून तें पाणी रोग्याचे घरीं सर्व घरांत शिंपावें, आणि जेथें रोगी असेल तेथेंही दारांत, बारींत व खिडकींत शिंपावें ह्मणजे कापुराचा वास चालू होतो तेणेंकरून हवा स्वच्छ होते, आणि ज्या भागांत अथवा गांवांत हा रोग असेल त्यांणीं कापुराचे पाणी शिंपल्या पासून त्या घरांत हा रोग होणार नाहीं ह्मणून हा प्रथम प्रयत्न करावा-

२ दुसरें- हरबऱ्याची आंब उर्फ ( खाटी ) ही मनुष्याचें बल पाहून दर एक मनुष्यास एक तोळा आंब व एक तोळा पाणी घालून एकत्र करून प्यावयास देणें. लहान पांच वर्षांचे आंत मूल असेल तर अर्ध तोळा देणें. मोठें मनुष्य असेल तर दीड तोळा देणें. खावयास भात अगर तांदुळांची पेज ऊर्फ कणी देणें.

३ तिसरें. जुलाब अगर वांती होतांच ( गोडे ) तेल व पाणी एकत्र करून प्यावयास देणें, ह्मणजे रोगी जाया होत नाहीं. आंब देऊन गुण येतो. न आला तर एक घटकेनें तेल पाणी आंब इतकेंच वजन व समान पाणी घालून देणें गुण येईल. त्याणें गुण न आला तर औषध देणें तें:—

४ चवथें. फासफोरस औषधाच्या गोळ्या एका कलाकांत चार वेळा देणें. दरवेळेस गोळ्या तीनप्रमाणें एका कलाकांत चार वेळां देणें. गोळ्या जिभेवर ठेऊन वर थंड पाणी दोन तोळे देणें. लहान मूल किंवा रोगी अशक्त असेल तर दर वेळेस दोन दोन प्रमाणें देणें. जुलाब बंद होईल व खालीं दुसरीं औषधें आहेत तीं देण्याची रीति: —

५ फेणयुक्त रक्तयुक्त हिरवे पिवळे थोडे थोडे परसाकडे होईल तर सल्फर देणें.

६ ओकारी वांति बंद होण्यास [ इपीकाक ] देणें.

७ रोग्यास तहान फार लागेल तर अर्सेनिकम देणें.

८ जर रोग्याची लघवी बंद झाली असेल तर शेकावें आणि ( कांथरीस ) देणें. याप्रमाणें औषधें देऊन प्राण वांचवावयाच्या तजविजींचा प्रयत्न आहे-

ने. ओ.

## वर्तमानसार.

संधिवायूचा विकार झाला असल्यास ज्या ठिकाणीं संधि धरले असतील त्या ठिकाणीं मधमाशा चावविल्या असतां रोग दूर होतो ह्मणून एका युरोपियन पत्रांत छापलें आहे. हा उपाय तिकडील एक शेतकऱ्यानें शोधून काढल्याचें कळतें.

उत्तर हिंदुस्थानांत वाहाबी लोकांनीं जाहिरनामे काढून व ठिकठिकाणीं भाषणें करून गेल्या ता० ११ जुलै रोजीं सूर्य पश्चिमेस उगवून पृथ्वी लयास जाणार असें ठरविलें होतें परंतु असें कांहीं झालें नाहीं. ने. ओ.

## वेद आणि पुराणें.

रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख यांणीं पुराणाविषयी जो आपला अभिप्राय प्रदर्शित केला होता त्यासंबंधानें कांहीं गोष्टी आह्मी मागील एका अंकांत लिहिल्या होत्या; त्यावरून थोडीशी कांहीं वर्तमान पत्रांत चर्चा चालली आहे पुराणांमध्यें अमुक एक चांगला अंश आहे असें आह्मी दर्शविलें होतें तो रावबहादूर यांसही ग्राह्य आहे, त्याज्य नाहीं असें आमचे नासिककर बंधु ह्मणतात- हें ऐकून आह्मास फार आनंद झाला आहे. कारण रावबहादुरांच्या लेखाचें तात्पर्य तर सणांत शिमगा जसा निंद्य त्याप्रमाणें ग्रंथांमध्यें पुराणें निंद्य आणि भागवतांतील वेदांताशिवाय त्याजमध्यें दुसरें ग्राह्य कांहीं नाहीं ह्मणून तीं सोडून देऊन वेदांचें अवलंबन करावें असें होतें; आणि आमचें तर मत आहे कीं रामायण, भारत, विष्णुपुराण इत्यादि ग्रंथांमध्यें धर्म, नीति, उपदेशपर व मनोरंजक कथा व कवित्व यांच्या संबंधानें त्याज्य अंशापेक्षां ग्राह्य अंश पुष्कळच आहे- बऱ्याच पुराणांमध्यें अशा प्राचीन कथा आहेत कीं त्या जरी सर्वांशीं खऱ्या नाहींत तथापि आपल्या देशाच्या इतिहासाचीं बीजें त्यांजमध्यें आहेत. कांहीं पुराणांमध्यें तर ज्या ज्या विषयांचें ज्ञान प्राचीन आर्यांनीं संपादन केलें होतें त्या त्या विषयाची बरीच माहिती दिलेली आढळते. उदाहरण, अग्निपुराणामध्यें, राजधर्म, व्यवहार, धनुर्विद्या, वैद्यक अथवा चिकित्साशास्त्र, अश्वचिकित्सा, गजचिकित्सा, साहित्य शास्त्र ह्मणजे ( ज्यामध्यें काव्य नाटक इत्यादिकांचीं लक्षणें, गुण, व अलंकार आणि रस यांचें निरूपण केलेलें असतें, ) व्याकरण शास्त्र, शब्दकोश, इत्यादि अनेक प्रकरणें आहेत. पुष्कळ पुराणांमध्यें भरत खंडाचा भुगोल आणि कलियुगांतील राज्यांच्या वंशावळी दिल्या आहेत. त्यांतील सर्व अंश तथ्य आहे आणि भरत खंडाच्या प्राचीन इतिहासाचे जे आधुनिक शोधक आहेत त्यांस हीं प्रकरणें फारच उपयोगीं पडतात. असो; निंद्य अंशही पुराणांमध्ये पुष्कळ आहे. देश व काल ह्यासंबंधीं अतिशयोक्ति, नानावृत्तें व त्यासंबंधीं एकेक निरस कथा, व त्यांच्या महत्वाविषयीं अतिशय पाल्हाळ, अनेक तिर्थें त्या प्रत्येकांत स्नान केलें असतां मोक्षप्राप्ती, ना:

ना जप, नाना मंत्र, नाना देवता, अशा पुष्कळ प्रकार कांहीं पुराणांमध्यें आहे. पण विष्णु पुराणासारख्या ग्रंथांत पृथ्वीचीं सात द्वीपें, चार युगें ह्यासंबंधीं जी अतिशयोक्ति तिजशिवाय असला दुसरा प्रकार फारसा आळढत नाहीं, सर्वच पुराणांत सारखे विषय असतात असें नाहीं.

आतां आमचे नासिककर मित्र 'न भूतो न भविष्यति' अशा प्रकारची आह्मी वेदाची निंदा केली आहे असें ह्मणतात. त्यांजला असें वाटत असेल तर वाटो परंतु आह्मी कांहीं निंदा केली नाहीं. आमच्या देशांतील जे सर्व ग्रंथ आहेत त्यांविषयीं आमची सारखी पूज्यबुद्धि आहे. परंतु ज्यापेक्षां परमेश्वरानें आह्मांस सदसद्विवेचनाविषयीं सामर्थ्य दिलें आहे, त्यापेक्षां त्या सामर्थ्याचा उपयोग करणें हें आमचें कर्तव्य आहे. जाणून बुजून क्षुधेच्या समयीं कोणी विषाचा गोळा आणून दिला असतां तो तोंडांत टाकून आह्मी गिळूं असें नाहीं. यास्तव वेदांपासून तों पुराणांपर्यंत सर्व ग्रंथांमध्यें सत्य जें आहे तें वडिलोपार्जित जिनगीप्रमाणें मानून, त्याजविषयीं अभिमान बाळगून त्याचें मोठ्या प्रयत्नानें रक्षण करूं. आणि आपल्या ग्रंथांमध्यें विशेषेकरून उपनिषद्, भगवद्गीता आणि भारतामधील दुसरीं कांहीं प्रकरणें, कांहीं पुराणें, व तुकाराम बावासारिख्या साधूचे प्राकृत ग्रंथ यांजमध्यें परमेश्वराचे अनत अचिंतनीय, आनंदमय, परम शुद्ध असें स्वरूप; नीतीचें व इंद्रियनिग्रहाचें माहात्म्य, अनन्य भक्तीची अवश्यकता, निष्काम पणें आपलीं कर्तव्यें केल्यापासून होणारें श्रेय हीं अशा योग्य रीतीनें वर्णिलीं आहेत, व धर्मसंबंधीं आणि नीतीसंबधी असे प्रौढ विचार त्यांत आहेत कीं, या संबंधानें अन्यदेशीय धर्मग्रंथांशीं ह्यांची तुलना केली असतां हे मागे पडणार नाहींत इतकेंच नाहीं, तर पुष्कळ अंशीं ह्यांचें वर्चस्व स्पष्ट दिसून येईल. परंतु सोनें आणि माती ह्यांची मिसळ झाली आहे. कोणताही एक ग्रंथ सर्वांशीं प्रमाण व त्यांत जें कांहीं आहे तें सर्व खरें असें आमच्या ...स वाटत नाहीं. ह्मणून त्यांत असत्याचा जो अंश आहे तो असत्यच आह्मी ह्मणूं, भलताच दुराग्रह धरून वाईट तें वाईट नव्हे बरेंच आहे असें कदापि ह्मणणार नाहीं, अशा बुद्धीनें वेदामध्येंही जो वाईट अंश आहे त्याची देखील एक दोन उदाहरणें आह्मी दिलीं होतीं. त्यांविषयीं आमच्या बंधूस संशय वाटत असेल तर त्या गोष्टी कोठें आहेत तेंही सांगतों. ऋग्वेद संहितेच्या सहाव्या मंडलांतील ५५ व्या सूक्ताच्या पांचव्या ऋचेंत पूषा ह्मणून जो सूर्याचा अंशभूत असा देव आहे त्यास आपल्या मातेचा दिधिषु ( दुसरा पति ) व बहिणीचा जार असें ह्मटलें आहे. सुब्रह्मण्या ह्मणून एक देवांस बलाविण्याचा मंत्र आहे. तो शतपथ ब्राह्मणाच्या तिसऱ्या पंचिकेंतील तिसऱ्या अध्यायाच्या चौथ्या खंडांत व तैत्तिरीय आरण्यकाच्या प्रथम प्रपाठकाच्या बाराव्या अनुवाकांत दिला आहे. त्यांत 'अहल्येचा जार' असें इंद्रास विशेषण दिलें आहे, त्याचप्रमाणें प्रजापतीनें आपल्या कन्येशीं दुर्व्यवहार केला ही गोष्ट शतपथ ब्राह्मणाच्या प्रथम कांडांतील सातव्या अध्यायाच्या चौथ्या खंडांत आहे. त्यांत ती सर्व गोष्ट स्पष्ट रीतीनें सांगितली आहे. व त्याच अर्थाची ऋग्वद संहितेच्या दहाव्या मंडलांतील ६१ व्या सूक्ताची ७ वी ऋचा दिली आहे. हीं सर्व वाक्यें ह्या ठिकाणीं उतरून घेऊन त्याचा अर्थ आह्मी स्पष्ट लिहिला असता परंतु असल्या असभ्य गोष्टींचे उच्चारण करूं नये ह्मणून तसें करीत नाहीं. तेव्हां पुराणांत अमुक गोष्टी वाईट ह्मणून राव बहदुरांनीं ज्या काढल्या आहेत त्याप्रमाणेंच त्यांच्या मतें सर्वोत्तम असा जो वेद त्यांतही आहेत. आतां आह्मांस ह्या वाक्याचा अर्थ समजत नाहीं, आर्यपत्रिका कर्त्यास समजतो असें नासिककर ह्मगतात तर ह्मणोत ; आर्यपत्रिकेस समजतो आणि दयानंद स्वामीस समजतो. त्याचप्रमाणें पुराणाचा अभिमानी जो आहे तो ह्मणेल कीं, इंद्राच्या व प्रजापतीच्या जार कर्माच्या गोष्टींतील शब्दांचा राव बहादुरांस अर्थ कळला नाहीं तर अशी लटपट चालवून 'खोटें' या शब्दाचा अर्थ 'खरें' 'वर' या शब्दाचा अर्थ 'खालीं' असा दुराग्रह धरून रूढि, कोश, व्याकरण सोडून देऊन सर्व वेदाचें भाष्य ह्या न्यायानें करण्याविषयीं प्रवृत्त होणें यापासून सत्य तर कधींच सांपडावयाचें नाहीं; दुराग्रह आणि कुमति मात्र वाढतील आणि अशा अर्थावर कोणा सभ्य, तत्वबुभुत्सु, व सत्याभिमानी पुरुषाचा विश्वास बसणार नाहीं तेव्हां हा दुराग्रह सोडुन आपल्या सर्व ग्रंथांत जें चांगलें आहे तें खऱ्या भावानें निवडून काढून जें वाईट आहे त्यास निर्भयपणें वाईट ह्मणून तें टाकावें. असत्यरूप मृत्तिका विवेकाग्नीच्या योगें जाळून टाकून जें सुवर्ण रूप सत्य वेदांमध्यें, स्मृतींमध्यें, पुराणांमध्यें, आणि प्राकृत ग्रंथांमध्यें परिपूर्ण रूपानें आहे त्याचें दृढ निष्ठेनें कशाचीही भीति न बाळगितां ग्रहण करणें हेंच विवेकी पुरुषांस योग्य आणि यांतच आपली उन्नति व कल्याण आहे.

सु. प.

---

## नोटिसा

रा. धोंडू वल्लद हणमंता डफळ रहाणार मौजे मालेगाव प्रगणे रिसवड तालुके वाशीम जिल्हे मजकूर यांस नारायण वल्लद हावसाजी धनगर बरेकर रहाणार माटगाव प्रगणें रिसवड तालुके वाशीम जिल्हे वाशीम यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे तीर्थरूप हणमंता डफळ यांजकडे आमचे कर्जाऊ रुपये असल्याबद्दल त्यांणीं रिसवड एथें पंचमतें सदर्हू कर्जांत त्यांणीं आपले नावें खातें असलेले नंबर मौजे खरपखेड प्रगणें रिसवड तालुके वाशीम जिल्हे मजकूर एथील सर्वे नंबर २ एकर २३ गुंठे ३८ आकार ९ व दुसरा सर्वे नंबर १६ एकर १६ गुंठे १९ आकार ११ या दोनी नंबरची मालकी आह्मास देऊन आमचे नावें सदर्हू नंबरचें खातें करून द्यावें आणि त्याचे नावचे दस्तैवज आमचेपासून परत घ्यावे असा ठराव करून सदर्हू नंबर आमचे कबज्यांत दिले. हल्लीं तुमचे बाप मयत होऊन सदर्हू जमीनीचें खातें तुमचें नावें होणार व तुह्मी आपले चुलत्याचे नावें करून देणार ह्मणून आह्मी ऐकतों करितां तुह्मास कळविण्यांत येते कीं तुमचे बापानें पंचमार्फत ठराव केला त्याप्रमाणें सदर्हू जमीनीचें खातें आमचे नावें ही नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत करून द्यावें तसें तुह्मी न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें तारीख २० माहे जुलै सन १८७८ इसवी.

( सही ) नारायण वल्लद हावसाजी धनगर निशाणी खुद्द.

---

नोटिस,

बाहादर मुसलमान रहाणार दहीहांडे तालुके अकोट यास राणोजी वल्लद जानजी देशमुख मौजे कटार तालुके अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, ७।८ महिने झाले तुह्मी आह्मापासून जोंधळ्याचें एक पेव ७० रुपयांचे भावानें घेण्याचा सवदा करून कांहीं रकम अगाऊ दिली व पेव खोलून माप घेऊन जातो. असें ह्मणाला त्यास बहुत दिवस झाले. जोंधळ्याचें माप घेतलें नाहीं व आमचा पैसा दिला नाहीं. दोन तीन वेळां तुह्मांस जताविलें असतां तुह्मी माल नेत नाहीं. याजकरितां तुह्मांस ही नोटिस दिली आहे तर नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांचे आंत पेवांतील माल घेऊन जाऊन आमचे रुपये चुकते करून द्यावे. या पुढें तुह्मी न आल्यास तुमची अगाऊ दिलेली रकम बुडेल व तुह्मी फिर्याद वगैरे केल्यास आह्मी तिचे जबाबदार होणार नाहीं. कळावें. तारीख २३ माहे जुलै सन १८७८ इसवी.

( सही ) राणोजी वल्लद जानजी देशमुख रहाणार कटार ता. आकोलें निशाणी रेघ.

---

नोटिस.

बाळिराम व सदु वल्लद सूर्यभान पाटोल वस्ती बिलखेड तालुके अकोट यांस गुलाबचंद बोहरा मारवाडी दुकान बिलखेड याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, दोणअप्पा वल्लद मारुती आप्पा वाणी याची घरें धावीं २ आमचे जवळ गहाण रुपये ३०० वर होती त्याजवर आमचा हक्क राहून त्या धावीं घराचा तारीख ११ माहे जुलै सन १८७८ इसवी रोजीं हरास झाला त्या हरासांत घरें दोन्ही तुह्मी घेतलीं त्याजबद्दल व रुपये ३०० व्याजाबद्दल ३६ एकून रुपये ३३६ तुह्माकडेस येणें आहेत ते रुपये अद्याप दिले नाहींत करितां पंध्रा दिवसांचे आंत या नोटिसीचे खर्चासुद्धां रुपये आणून द्यावे. मुदतीप्रमाणें न दिल्यास कायद्याप्रमाणें तुह्मांवर फिर्याद करून कोर्टाचे खर्चासुद्धां रुपये तुह्मांपासून भरून घेतले जातील कळावें ता० २० माहे जुलै सन १८७८ इसवी.

(सही) गुलाबचंद बोहोरा दस्तुर खुद्द.

---

# जाहिरात.

## ग्रंथोत्तेजक मंडळीकडून.

"महादजी शिंदे यांचें चरित्र."

या विषयावर मराठी ग्रंथ, छापून सुमार २०० अष्टपत्री पृष्ठें होतील येवढा, नवीन तयार करून खालीं सही करणार याजकडे रवाना करावा. मंडळी मार्फत तपासनीस नेमले जातील. त्यांचे मतें जो ग्रंथ उत्तम ठरेल त्या ग्रंथाचे कर्त्यास बक्षीस रुपये ३०० चें दिलें जाईल.

सदर्हू ग्रंथांत सन १७६१ पासून सन १७८४ पावेतों घडलेल्या मराठ्यांचे इतिहासांतील ज्या ज्या गोष्टींशीं महादजी शिंदे यांचा संबंध असेल त्या सर्व गोष्टींचें यथार्थ व मनोवेधक वर्णन असावें.

हल्लीं या विषयाचे संबंधानें जे इंग्रजी ग्रंथ तयार झाले आहेत त्यांवरूनच केवळ ग्रंथ तयार करूं नये परंतु ज्या बखरींवरून किंवा सरकारी अथवा खासगी खलित्यावरून अगर कागद पत्रांवरून सदर्हू ग्रंथ तयार झाले आहेत, ते व दुसरे खलिते व कागदपत्र अस्सल पाहून हा ग्रंथ तयार करावा. पृष्ठाचे खालीं टिपा देऊन सदर्हू कागद पत्राचे आधार दाखवावें. इंग्रजींत लार्ड मेकाले साहेबांनीं 'वारन् हेस्टिंग्स व 'क्लाइव्ह' यांचीं जशीं चरित्रें लिहिलीं आहेत त्या धर्तीवर हा ग्रंथ तयार व्हावा. महादजी शिंदे, हरिपंत फडके, नाना फडणीस, परशराम भाऊ, मल्हारराव व तुकोजी होळकर, अहिल्याबाई, मोरोबादादा फडणीस, सखाराम बापू वगैरे मुत्सद्दी व सरदार मंडळींचे गुणावगुणांचें विशेष स्वरूप लक्षांत येऊन मूर्तिमंत त्यांची कृति वाचणारांचे अंतःकरणांत उभी रहावी अशी ग्रंथाची पद्धत ठेवावी. मोगल बादशहा, रजपूत संस्थानिक व इंग्रज सरकार यांचे संबंधानें व पुण्यांतील नाना फडनवीस वगैरे मंडळीचे संबंधानें झालेले राजकारणांची हकीकत होईल तितकी खुलासेवार निःपक्षपातानें स्पष्ट करावी. महादजी शिंदे यांनीं जे सैन्याचे कंपू तयार केले त्यांजविषयींही इत्थंभूत माहिती ग्रंथांत असावी.

ग्रंथ ता. १५ मार्च १८७९ चे आंत खालीं सही करणार, यांजकडे येऊन पोहोचला पाहिजे.

ग्रंथाबरोबर ग्रंथ करणारानें आपले नाव कागदावर लिहून तो कागद लिफाप्यांत घालून लिफाप बंद करून पाठवावें, त्यावर कांहीं खूण करावी, व तीच खूण आपले ग्रंथाचे आरंभींही करावी.

जो ग्रंथ पसंत होईल त्यावरील खुणेचें लिफाप उघडलें जाईल; इतर लिफाप व ग्रंथ ज्याचे त्यांस सांगितले पत्त्यावर परत केले जातील.

म. ग्रंथोत्तेजक मंडळीचें हेड आफिस पुणें. ता. ७।७।७८ } रावजी प्रभाकर भावे सेक्रेटरी ग्रंथोत्तेजक मंडळी पुणें.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.